
# महाराष्ट्राचे शिल्पकार गोविंदभाई श्रॉफ



विजय दिवाण

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# संतभूमीचा योद्धा
# गोविंदभाई श्रॉफ

## विजय दिवाण

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : मे २००४
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. २२

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४ ५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : रु. ४५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणत: शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती ''महाराष्ट्राचे शिल्पकार'' योजनेअंतर्गत पुस्तकरुपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील ''गोविंदभाई श्रॉफ'' हा बावीसावा चरित्रग्रंथ आहे.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्या व्यक्तींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे त्या व्यक्तींच्या कार्याची मराठी माणसांना ओळख व्हावी, हे जसं ''महाराष्ट्राचे शिल्पकार'' या चरित्रग्रंथमालेत मंडळाला अपेक्षित आहे त्याचप्रमाणं त्या व्यक्तींचं व्यक्तीगत जीवन, कौटुंबिक जीवन, त्या व्यक्तींच्या अवतीभवतीचं अनुकूल - प्रतिकूल वातावरण, या वातावरणाच्या अनुषंगाने त्याच्या व्यक्तीगत जीवनात घडलेल्या घटना याचं चित्रणही या चरित्रग्रंथात अपेक्षित आहे. परंतु ''महाराष्ट्राचे शिल्पकार - गोविंदभाई श्रॉफ'' या चरित्रग्रंथात अशा प्रकारचं चित्रण अभावानेच जाणवते. त्याचे कारणही अर्थातच स्पष्ट आहे. गोविंदभाईंना व्यक्तीगत जीवन आहे किंवा नाही असे जाणवावं असं त्यांचं जगणं होतं.

भाईचं वास्तव्य औरंगाबादला. १९९१ पासून माझंही वास्तव्य औरंगाबादला. त्यांना ऐकण्या-बघण्याचा मला नेहमीच योग यायचा. खादीच्या जाड्या-भरड्या कपड्यात हा महामानव ठराविक वेळी गुलमंडी औरंगपुरामार्गे सरस्वती भवन शिक्षण संस्थेच्या कार्यालयाकडे खाली मान घालून पायी जाताना हमखास दिसायचा. हातात एक साधी पिशवी असायची. भाई परगावी असले तरच त्यांचा

हा जाण्यायेण्याचा फेरा चुकायचा.

भाईंच्या माझ्या काही भेटीही झालेल्या आहेत. त्यांच्याशी बोलण्याचाही मला योग लाभलेला आहे. पण त्यांच्या सहवासाचा योग मला लाभलेला नाही. त्याचे कारण अर्थातच उघड आहे. त्यांच्या सहवासासाठी कृती हे एकच माध्यम होतं. त्यांनी अंगिकारलेली कृती माझ्या स्वभावाला मानवण्यासारखी, झेपण्यासारखी नव्हती. त्यांच्या कृतीविषयी अर्थातच मला आदर होता.

गोविंदभाईंचा कृती इतकाच उक्तीवर भर होता. आपल्या कृतीला पोषक असे वातावरण निर्माण करायचं असेल, आपली कृती लोकांच्या मनावर बिंबवायची असेल, आपण अंगिकारलेल्या कार्यात लोकांचा सहभाग मिळवायचा असेल, कार्यकर्ते तयार करावयाचे असतील तर त्यासाठी उक्ती आवश्यक आहे, ही त्यांची या संदर्भातली भूमिका असावी आणि म्हणूनच अनेक कार्यक्रमात त्यांचा सहभाग असे. या कार्यक्रमात आपल्या व्याख्यानातून ते विचारांची मांडणी करीत. त्यांच्या या विचारांना कुठेही पुस्तकी ज्ञानाचा स्पर्श झालेला नसे. भाईंना प्रभावी वक्तृत्व अवगत नव्हतं. ते काहीसे संथ बोलत. पण विचारांच्या सूत्रापासून किंचितही ढळत नसत. सभासंमेलनातून, उद्बोधन वर्गातून त्यांनी मांडलेले विचार संकलित स्वरुपात आज उपलब्ध आहेत किंवा कसे याची मला माहिती नाही; पण ते तसे असणे मला निकडीचे वाटते. त्याशिवाय त्यांच्या कृतीचं महत्त्व उमगणार नाही.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या माझ्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या चरित्रग्रंथमालेअंतर्गत अद्यापही मराठवाड्यातील काही संकल्पित व्यक्तींवर चरित्रग्रंथ लिहून घेऊन ते प्रकाशित करण्याचा आमचा संकल्प आहे. या चरित्रग्रंथांचे लेखनही सुरू आहे. येत्या महिन्याभरात हे चरित्रग्रंथ लिहून आले तरच आमचा हा संकल्प सिद्धीला जाईल.

श्री. विजय दिवाण यांनी गोविंदभाईंच्या या चरित्रग्रंथांचे अतिशय निष्ठेने, प्रामाणिकपणे लेखन केलेले आहे. समाजकार्याविषयी आवड असणाऱ्या वाचकांना ते निश्चितच प्रेरणादायी होईल, असा मला विश्वास वाटतो.

**रा. रं. बोराडे**

अध्यक्ष

मुंबई महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

दिनांक : २८ एप्रिल, २००४

*वरि पडलिया आकाश।*
*बुद्धीचे डोळे मानस।*
*झांकी ना तें परियेस।*
*धैर्य जेथे।।*

आकाश कोसळले तरी
मनाने बुद्धीचे डोळे
झाकून टाकले नाहीत
तर ते खरे धैर्य होय
(ज्ञानेश्वरी : अध्याय अठरावा, ओवी ८६१)

# लेखकाचे निवेदन

१५ ऑगस्ट १९४७ रोजी इंग्रजांच्या राजवटीतून सुटका होऊन भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यापूर्वीच्या हिंदुस्तानात छोटी मोठी अशी ५६५ संस्थाने होती. त्यापैकी ५६२ संस्थाने स्वातंत्र्योत्तर स्थापन झालेल्या भारतीय संघराज्यात विलीन झाली. परंतु देश स्वतंत्र झाला तरी दक्षिणेतील हैदराबाद आणि उत्तरेकडील काश्मीर व जुनागढ ही तीन संस्थाने तशीच शिल्लक राहिली. जुन्या हैदराबाद संस्थानात 'मीर उस्मानअली खान बहादुर निजामुद्दौला निजाम-उल-मुल्क' उर्फ सातवा निजाम याचे राज्य होते. आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागाचे पाच जिल्हे, कर्नाटकाचे तीन जिल्हे आणि तेलंगणाचे आठ जिल्हे असे एकूण सोळा जिल्हे त्या जुन्या हैदराबाद संस्थानात होते. हे सर्व जिल्हे आणि संतांची भूमी म्हणून ओळखला जाणारा मराठवाडा विभाग हा संपूर्ण प्रदेश दीर्घकाळच्या सरंजामशाही राज्यपद्धतीने अफाट गरिबी, निरक्षरता, अज्ञान आणि अंधश्रद्धा यांच्या खाईत लोटला गेलेला होता. सरकारी अधिकाऱ्यांची दडपशाहीची वृत्ती आणि लोकांबद्दलची अनास्था यामुळे सामान्य जनतेच्या पदरी गुलामगिरीचे जिणे आलेले होते. आणि ते जनतेच्या अंगवळणीही पडले होते. लोकांना आचार आणि विचाराचे स्वातंत्र्य तर कुठे दृष्टिपथातही नव्हते. त्यातच भर म्हणून जात्यंध इत्तेहादुल मुसलमीन संघटना आणि अत्याचारी रझाकार यांनी रयतेचा छळ सुरू केलेला होता. म्हणूनच स्वामी रामानंदतीर्थ नावाच्या एका क्रांतिकारी तपस्व्याने हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठाच्या प्रांगणात एके दिवशी निजामाच्या गुलामगिरीतून तेथील जनतेची मुक्तता करण्याची प्रतिज्ञा केली आणि पुढे घडणाऱ्या हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे बीज पेरले. स्वामीजींच्या नेतृत्वाखाली हैदराबाद संस्थानात

स्वातंत्र्याची जी प्रदीर्घ चळवळ झाली तिचे वर्णन उच्च नैतिक मूल्यांच्या नेत्यांनी चालवलेले लोकआंदोलन असे करावे लागेल. हे आंदोलन जरी संपूर्ण संस्थानभर चालले तरी त्यात मराठवाडा हा सर्वात आघाडीवर होता. स्वामी रामानंदतीर्थ यांच्याकडून प्रेरणा घेऊन मराठवाड्यातील ज्या कार्यकर्त्यांनी हैदराबाद मुक्तिलढ्याची धुरा आपल्या खांद्यावर वाहिली त्यामध्ये गोविंदराव नानल, श्रीनिवासराव बोरीकर, मुकुंदराव पेडगांवकर, शामराव बोधनकर, गोपाळशास्त्री देव, भगवानराव गांजवे, आ. कृ. वाघमारे, गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, भाऊसाहेब वैशंपायन, राघवेंद्रराव दिवाण, दिगंबरराव बिंदू, काशीनाथराव जाधव, हनुमंतराव वैष्णव, विनायकराव चारठाणकर हे अग्रभागी होते. त्यापैकी गोविंदभाई श्रॉफ हे तर स्वातंत्र्यानंतरही पन्नास वर्षे मराठवाडा विभागाच्या विकासासाठी संघर्षमय चळवळ करीत राहिले. स्वातंत्र्यसैनिक म्हणून ज्यांचा उल्लेख करताना अभिमानाने ऊर खरोखरच भरून यावा अशा काही मोजक्या, बावन्नकशी कार्यकर्त्यांपैकी गोविंदभाई हे एक होते. हैदराबाद मुक्तिसंग्रामातील 'संतभूमीचा योद्धा' असा त्यांचा उल्लेख करणे हे अगदी योग्य ठरेल.

१९३६ पासून १९४८ पर्यंतच्या काळात हैदराबादचा हा मुक्तिसंग्राम झाला. १३ सप्टेंबर १९४८ रोजी स्वतंत्र भारताचे सैन्यदल त्या लढ्यातील सत्याग्रही स्वातंत्र्यसैनिकांच्या मदतीला धावून गेले. आणि १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थानाची निजामाच्या राजवटीतून मुक्तता होऊन ते स्वतंत्र भारतात सामील करण्यात आले. पुढे १९५६ साली भारतात भाषावार प्रांतरचना अंमलात आली आणि जुन्या हैदराबाद संस्थानातील कानडी भाषिक जिल्हे कर्नाटकास, तेलंगणाचे जिल्हे आंध्रप्रदेशास आणि मराठवाड्याचे तत्कालीन पाच जिल्हे महाराष्ट्र राज्यास जोडण्यात आले. हैदराबादच्या स्वातंत्र्यलढ्याचे हे महापर्व संपले, मात्र त्या पुढील पन्नास वर्षांच्या काळात गोविंदभाईंनी मराठवाड्याच्या विकासाचा, शिक्षणाचा आणि सामाजिक सुधारणांचा पाठपुरावा पूर्वीइतक्याच निष्ठेने आणि व्रतस्थ वृत्तीने केला. ''आम्ही ज्यासाठी लढा दिला त्या स्वातंत्र्याचा अर्थ हा केवळ एका जुलमी सरंजामशाही सत्तेपासून सुटका एवढाच नव्हता तर लोकशाही स्वातंत्र्य मिळवणे हा होता'' असे ते आवर्जून सांगत असत, लोकांचे लोकांनी चालवलेले राज्य त्यांना अभिप्रेत होते. भारतातील जुन्या परंपरा आणि संस्कृती या गोष्टी विषमतेवर आधारित होत्या. येथे समतेवर आधारित अशी नवी लोकशाही मूल्ये रुजवण्याचे काम अवघड होते. पण तेच नेमके करणे आवश्यक होते. या देशाला

लोकशाहीशिवाय दुसरा पर्याय नाही असे गोविंदभाई नेहमी म्हणत. परंपरेने जखडलेल्या आपल्या समाजात देशाच्या राज्यघटनेने स्वीकारलेली लोकशाही मूल्ये रुजवण्यासाठी या देशातल्या बुद्धिवंतांनी आणखी अनेक वर्षे परिश्रम करण्याची गरज आहे असे त्यांचे मत होते. १९४८ मध्ये हैदराबाद संस्थान मुक्त झाले तेव्हाच्या हैदराबाद राज्यात आणि नंतरच्या महाराष्ट्रात सहज मिळू शकणारे सत्तेचे पदही नाकारून गोविंदभाईंनी मागासलेल्या मराठवाड्याच्या समाजासाठी काम करण्याचे अवघड व्रत स्वीकारले. प्रखर राष्ट्रनिष्ठा बाळगून, सारे व्यक्तिगत स्वार्थ बाजूला सारून आयुष्यभर खरोखरच्या निरपेक्ष वृत्तीने लोकांसाठी काम करणे ही गोष्ट आजच्या काळात अकल्पितच होय! पण गोविंदभाईंनी ते खडतर व्रत स्वीकारले आणि आयुष्यभर निभावूनही नेले. मराठवाड्यातील शिक्षण आणि या विभागाचा विकास या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये उभ्या मराठवाड्याने गोविंदभाईंच्या कायम ऋणात राहावे एवढे त्यांचे योगदान मोठे आहे.

हैदराबादचा मुक्ति-लढा समाप्त झाल्यानंतरच्या काळात समाजाच्या पुनर्रचनेच्या कामाची निवड ओळखूनच गोविंदभाईंनी सत्ता अव्हेरली आणि ते निस्पृहतेने शिक्षणाच्या आणि विभागीय विकासाच्या कार्यात मग्न झाले. इथे हे विसरता कामा नये की गोविंदभाई हे बुद्धिमान आणि त्यागी तर होतेच, शिवाय द्रष्टे ही होते. त्यांच्या प्रत्येक कार्याला बुद्धी आणि शहाणपण यांची जोड असे. पण तरीही त्यांनी स्वतःला कधीही 'विचारवंत' म्हणवून घेतले नाही. मात्र स्वतःच्या भोवतालच्या कार्यकर्त्यांच्या प्रबोधनाचे काम त्यांनी कर्तव्यबुद्धीने केले. बुद्धिमान असूनही सामान्य लोकांशी जोडलेली नाळ गोविंदभाईंनी कधी तुटू दिलेली नाही. ते म्हणत की आपला समाज जुन्या आणि विशिष्ट रुढींनी ग्रासलेल्या मूल्यांच्या परंपरा जोपासणारा आहे. त्यामुळे जनमानसात रुजलेल्या इष्ट-अनिष्ट गोष्टी आणि वैयक्तिक स्वार्थ ह्यांचा पगडा सामान्य माणसांच्या मनांवर असणे साहजिकच आहे. परंतु अशा लोकांमध्येच नवी मूल्ये रुजवण्याचे काम आपण करायला हवे आणि त्यासाठी भरपूर संयम आणि वेळ यांची गरज आहे. रात्रंदिवस स्वतःला सार्वजनिक कामांमध्ये गुंतवून ठेवणाऱ्या गोविंदभाईंना स्वतःच्या कुटुंबियांसाठी जास्त वेळ देता आला नाही. पण त्याबद्दल त्यांनी अगर त्यांच्या कुटुंबियांनीही कधी तक्रार केली नाही. आपले कार्यकर्ते हाच आपला परिवार हे सूत्र गोविंदभाईंनी अंगिकारलेले होते. ''कार्यकर्त्यांनी हाती घेतलेले काम हे निष्ठेने आणि निरलस वृत्तीने करायला हवे, आजच्या काळात तरुण कार्यकर्त्यांना अवहेलनेच्या वातावरणात काम करावे

लागत आहे याची मला जाणीव आहे. पण तरीही 'परत न फिरण्याच्या' भूमिकेतून तरुणांनी हे काम वाढवत नेण्याची गरज आहे'', असे ते म्हणत. अंगिकारलेले काम हे देशाच्या सकारात्मक पुनर्रचनेचे सृजनात्मक काम असावे, आणि ते सातत्याने वाढवत न्यावयास हवे, असा त्यांचा कायम आग्रह असायचा. मुळातच वृत्तीने त्यागी असलेल्या गोविंदभाईंनी आयुष्यात कधी कोणत्याही कामाचे मानधन घेतले नाही. प्रवासासाठीही कोणती सरकारी सवलत मागितली नाही. आपल्या कुटुंबियांच्या नोकरी-बदली-बढतीसाठी सत्ताधाऱ्यांना कधी साकडे घातले नाही. भारताचे तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी त्यांना 'पद्मविभूषण' हा बहुमानाचा सरकारी किताब देऊ केला तेव्हा त्या ऐवजी मागासलेल्या मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी वैधानिक विकास मंडळाची स्थापना करा असे गोविंदभाईंनी सरकारला ठणकावून सांगितले. वैधानिक विकास मंडळाच्या स्थापनेची मागणी जेव्हा शासनाने मान्य केली तेव्हा कुठे गोविंदभाईंनी तो पद्मविभूषण किताब स्वीकारला. जेव्हा केव्हा कुठले छोटेमोठे पुरस्कार मिळाले तेव्हा त्या पुरस्काराच्या रकमाही त्यांनी सार्वजनिक संस्थांना अगर एखाद्या जनआंदोलनाला देऊन टाकल्या. स्वत:साठीच काय पण स्वत:च्या कुटुंबियांसाठीसुद्धा त्यांनी कधी कोणत्या पदाची अगर लाभाची अपेक्षा ठेवली नाही. अखेरपर्यंत ते व्रतस्थ राहिले. गोविंदभाईंच्या जीवनाचा पट हा अतिशय विस्तृत असा आहे. वयाची नव्वद वर्षे पूर्ण केल्यानंतरही ते सतत कार्यरत होते. त्यांच्या जीवनात बालपण, विद्यार्थीजीवन, वैचारिक जडणघडणीचा काळ, गृहस्थाश्रमातील पदार्पण, नोकरीचा काळ, नोकरी सोडून पूर्णवेळ स्वातंत्र्यसंग्रामात दिलेले योगदान, शेतमजूर-शेतकरी यांच्यासाठी केलेल्या चळवळी, स्वत: स्थापन केलेल्या पक्षासाठीचे आणि संघटनेसाठीचे राजकीय काम, शिक्षणक्षेत्रातील कार्य, मराठवाड्याच्या विकासासाठी प्रदीर्घ काळ केलेले जनता विकास परिषदेचे काम, खादी ग्रामोद्योगाचे काम, साक्षरताप्रसाराचे काम, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेचे काम, या सर्व अवस्था मोठ्या संघर्षमय आणि कसोटी पाहणाऱ्या होत्या. पण तरीही गोविंदभाई विचलित न होता काम करीत राहिले. दररोज सकाळी दहा वाजता ते त्यांच्या कार्यालयात जात, खादीचे धुवट धोतर आणि सदरा, खादीचाच करड्या रंगाचा जाडाभरडा कोट, डोक्यावर थोडी तिरकी बसलेली गांधी टोपी, आणि हातात कागदपत्रांनी ठासून भरलेली तांबड्या चामड्याची बॅग, अशा पोषाखात गुलमंडीवरून पायी चालत सरस्वती भुवनच्या आवारातील आपल्या

कार्यालयाकडे भरभर पायी चालत निघालेले गोविंदभाई लोकांनी वर्षानुवर्षे पाहिले.

ज्या शिक्षणसंस्थेची धुरा गोविंदभाईंनी मृत्यूच्या क्षण येईपर्यंत स्वत:च्या खांद्यावर अविरत वाहिली त्या औरंगाबादच्या सरस्वती भुवन शिक्षणसंस्थेच्या पटांगणावर गुळगुळीत फरश्यांनी झाकलेला एक मोठा चौथरा आज दिसतो. नोव्हेंबर २००२ च्या २१ तारखेला याच चौथऱ्यावर मराठवाड्याच्या ह्या लोकनेत्याच्या पार्थिवावर अग्निसंस्कार झाले होते. आता तेथे पेटत्या ज्योतीचे एक शिल्प उभे केलेले आहे. सार्वजनिक जीवनात अजातशत्रू असणाऱ्या गोविंदभाईंशी कोणत्या ना कोणत्या कारणाने हजारो माणसे जोडली गेलेली होती. त्या साऱ्या कार्यकर्त्यांनी गोविंदभाईंच्या समर्पित जीवनापासून एक स्फुल्लिंग घेऊन सचोटीने आणि निरपेक्ष वृत्तीने समाजोपयोगी कामे करावीत अशी अपेक्षाच जणु त्या ज्योतीमधून तेवत असते. त्या हजारो कार्यकर्त्यांच्या आणि नव्या पिढीतल्या तरुणांच्या पुढ्यात गोविंदभाईंच्या संघर्षशील जीवनयात्रेचा संपूर्ण पट संगतवार उलगडून ठेवणे हे त्या सर्वांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल अशी आशा आहे.

हे पुस्तक लिहिण्यासाठी मला ज्यांनी उद्युक्त केले त्या प्राचार्य रा. रं. बोराडे यांचे आभार मानणे मला आवश्यक वाटते. त्यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष या नात्याने ''महाराष्ट्राचे शिल्पकार' ही ग्रंथमालिका सुरू केल्याबद्दल मराठी भाषिक जनता त्यांची उतराई राहील. या पुस्तकाच्या लेखनासाठी अनेक लेखकांच्या ग्रंथांचे आणि लेखांचे संदर्भाधार घ्यावे लागले. त्यात डॉ. शिवाजीराव गऊळकर यांचा 'निर्मोही' हा ग्रंथ आणि डॉ. शोभा कोरान्ने यांचा डॉक्टरेटचा प्रबंध यांचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यांचा मी ऋणी आहे. गोविंदभाई श्रॉफ यांचे सुपुत्र डॉ. अजित, स्नुषा डॉ. उषा, नातू डॉ. गौतम आणि नातसून डॉ. रुपल यांनीही वेळोवेळी माहिती देऊन मोलाची मदत केली. त्या शिवाय पुस्तकलेखनासाठी इतरही काही संदर्भसाहित्याचा उपयोग झाला. त्या साहित्याचा उल्लेख या पुस्तकाच्या अखेरी दिलेल्या सूचीमध्ये केला आहे. त्या सर्व स्नेह्यांचे आणि लेखकांचेही मी मन:पूर्वक आभार मानतो. आणि दिवंगत लोकनेते पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या तेजस्वी स्मृतीस अभिवादन करून त्यांच्या मोठ्या चरित्राचे हे छोटेखानी पुस्तक वाचकांच्या सुपूर्द करतो.

**विजय दिवाण**

औरंगाबाद,
दिनांक २१ नोव्हेंबर २००३

# अनुक्रमणिका

शैशवातून तारुण्याकडे ........ १
पदवी-पदव्युत्तर शिक्षण आणि स्वातंत्र्याची प्रेरणा ........ ६
क्रांतीची नांदी आणि गृहस्थजीवनाची सुरुवात ........ ११
महाराष्ट्र परिषदेची स्थापना आणि पहिले अधिवेशन ........ १५
वंदे मातरम् चळवळ आणि सत्याग्रहांचे लोण ........ २२
तुरुंगवास, आणि चळवळीची वैचारिक पायाभरणी ........ २८
समतावादी धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा पुरस्कार ........ ३३
स्टेट कॉंग्रेसच्या ॲक्शन कमिटीची प्रस्थापना ........ ३८
ऑपरेशन पोलो उर्फ 'पोलिस ॲक्शन' ........ ४५
स्टेट कॉंग्रेसचा त्याग ........ ५०
लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सची स्थापना ........ ५४
निवडणुकांतील अपयश आणि लीगचे विसर्जन ........ ६०
भाषावार प्रांतरचना आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ........ ६६
मराठवाडा जनता विकास परिषदेचा जन्म ........ ७४
विकासाच्या चळवळी, आणि वैधानिक विकास मंडळे ........ ८०
विकासप्रक्रियेचे पुनरावलोकन ........ ८९
शिक्षण आणि साक्षरतेच्या क्षेत्रातील योगदान ........ ९५
स्वामी रामानंदतीर्थ स्मारक समिती व संशोधन संस्थेचे कार्य ........ १०२
खादी-ग्रामोद्योगातील योगदान ........ १०६
अस्त ........ १११

# शैशवातून तारुण्याकडे.....

औरंगाबादचे एक सावकार मन्नुलाल श्रॉफ यांचा विवाह कर्नाटकातल्या विजापूरच्या वाघजी कुटुंबातील रुक्मिणीबाई यांच्याशी झाला होता. वयाची पस्तिशी उलटेपर्यंत त्यांना मूलबाळ झाले नव्हते. त्यानंतर पहिली मुलगी जन्मली. तिचे नाव कस्तुरीबाई ठेवले गेले. त्यानंतर सहा सात वर्षे दुसरे मूल झाले नाही. त्या दांपत्याला आता मुलगा व्हावा अशी इच्छा होती. म्हणून श्रॉफ कुटुंबियांनी गंगापूर तालुक्यातील सावखेड्याच्या नृसिंहास नवस करून साकडे घातले. योगायोग असा की त्यानंतर २१ जुलै १९११ रोजी या जोडप्यास पहिले पुत्ररत्न प्राप्त झाले. विजापूरला आपल्या आजोळी जन्मलेल्या या मुलाचे नाव गोविंददास असे ठेवण्यात आले. बोललेला नवस फेडण्यासाठी मन्नुलाल श्रॉफ यांच्या हरकुंवरबाई नावाच्या बहिणीने सावखेडच्या नृसिंह मंदिरापर्यंत दंडवत घालत जाऊन तेथे त्याची पूजा केली होती असे सांगतात. नवस खरा असो वा खोटा, पण आयुष्याची पासष्ठ-सत्तर वर्षे मराठवाड्यासाठी निरलसपणे आणि निष्ठेने संघर्ष करणारा एक नरसिंहच जणु त्या वेळी जन्माला आला असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. गोविंददासाच्या जन्मानंतर चार वर्षांनी रुक्मिणीबाईंना दुसरे मूल झाले. त्याचे नाव गोपाळदास असे ठेवले गेले. उशिराने झालेली मुले म्हणून लहानपणी या गोविंद-गोपाळाचे खूप लाड होत असत. परंतु १९१६ साली मोठा गोविंददास हा साडेचार वर्षांचा असतानाच त्यांचे वडिल मन्नुलाल यांचे निधन झाले. मृत्युसमयी ते ४३ वर्षांचे होते. छोटा गोपाळदास तर अवघा सहा महिन्यांचा होता. असे अचानक पितृछत्र हरपल्यामुळे श्रॉफ कुटुंब निराधार झाले. घरी गोविंददासांच्या आजी मगनबाई या होत्या. घरात सारे त्यांना 'मगनजिया' असे संबोधत. आत्या

हरकुंवरबाई यांना 'फई' म्हणत. गोविंददासांची आई रुक्मिणीबाई, आजी मगनजिया आणि आत्या फयी यांनीच गोविंददास आणि गोपाळदास यांचा सांभाळ केला. त्या दोघा बालकांवर लहाणपणीचे चांगले संस्कारही त्याच तिघींनी केले.

गोविंददासांचे प्राथमिक शिक्षण औरंगाबादेत मेहता यांच्या गुजराथी शाळेत झाले. तेथे त्यांना गुजराथी भाषा आणि व्यापारी पद्धतीच्या गणिताचे धडे मिळाले. गोविंददास हे औरंगाबादेत असलेल्या इंग्रजी शाळेत दाखल झाले. 'मदरसे फोकानिया' नावाच्या त्या शाळेत वि. गो. कर्वे नावाचे एक चांगले शिक्षक होते. हे कर्वेगुरुजी निरनिराळ्या प्रकारच्या सामाजिक कार्यांमध्येही पुढाकार घेत असत. विद्यार्थ्यांमध्ये स्वाभिमान आणि राष्ट्रीय भावना जागवत असत. विद्यार्थ्यांना मातृभाषेचा वापर करायला लावत. उर्दू भाषेत बोलू नका असे सांगत. शाळेमध्ये ते संस्कृत हा विषय शिकवत असत. त्यांच्यामुळे गोविंददासांना संस्कृत अध्ययनाची गोडी लागली. पुढे १९२५ साली औरंगाबादेत गणेश संघाची स्थापना झाली. त्या गणेश संघाच्या स्थापनेमध्येही कर्वे गुरुजींचा पुढाकार होता. त्या काळच्या त्या निजामाच्या राजवटीत गणेश संघ स्थापन करण्याला केवळ धार्मिक नव्हे, तर राजकीय आणि सांस्कृतिक महत्त्व होते. या गणेश संघाचे काम करीत असताना तशा प्रकारच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची आवड गोविंददासांच्या मनात उत्पन्न झाली. जेमतेम चौदा-पंधरा वर्षांच्या त्या पोरसवदा तरुणाच्या मनावर स्वामी विवेकानंदांचे चरित्र आणि त्यांचे तत्त्वज्ञान यांचे संस्कार कर्वेगुरुजींनी केले. त्या वयातच गोविंददासांना पुस्तके वाचण्याची आवड निर्माण झाली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी लिहिलेले ''१८५७ चे स्वातंत्र्यसमर'' हे पुस्तक त्यांनी वाचले. त्यांनी लिहिलेले जोसेफ मॅझिनीचे चरित्रही त्यांनी वाचून काढले. शिवाय गांधीजींचे 'यंग इंडिया' हे वृत्तपत्र ते नियमित वाचत असत. अशा प्रकारच्या वाचनामुळे एव्हाना मॅट्रिकच्या वर्गात असलेल्या तरुण गोविंददासांच्या मनात स्वातंत्र्याच्या उर्मी जाग्या झाल्या. मोगलाईतील एकाधिकारशाहीमुळे लोकांच्या जीवनाभोवती असणाऱ्या गुलामगिरीच्या पाशाची त्यांना जाणीव झाली. निजामाच्या सरंजामशाहीने चालवलेल्या शोषणाचे भान आले. धर्मांध मुसलमान गुंडांकडून बहुसंख्य बिगरमुस्लिम रयतेवर होणाऱ्या अत्याचारांमुळे त्यांचे तरुण मन अस्वस्थ होऊ लागले. कर्वेगुरुजींनी गोविंददासांना बौद्धिक प्रबोधनाबरोबर शारीरिक व्यायामाचीही गोडी लावली होती. औरंगाबादेत त्या काळी 'समर्थ व्यायामशाळा' नावाचा एक प्रसिद्ध आखाडा होता. गोविंददास तेथे

नियमित व्यायाम करू लागले. त्या आखाड्यात येणाऱ्या तरुण मुलांशी जेव्हा ओळख झाली तेव्हा हळूहळू गोविंददासांनी त्यांच्याशी गप्पा मारत त्यांच्यामधील राष्ट्रीय भावना जागविण्याचे काम सुरू केले. अल्पावधीतच त्या मुलांचे नेतृत्व गोविंददासांकडे आले. १९२७ साली हैदराबाद संस्थानात जात्यंध मुसलमानांनी 'अंजुमन इत्तेहादुल मुसलमीन' ही संघटना स्थापन केली. कट्टर सनातनी अशा धर्मांध वृत्तींचा पुरस्कार करणारी ही संघटना हैदराबाद संस्थानातील रयतेवर जुलूम-जबरदस्ती करीत असे. निजामाच्या कचखाऊ धोरणांमुळे त्या संघटनेस राजकीय महत्त्वही प्राप्त होऊ लागले होते. तेव्हा त्या इत्तेहादुल मुसलमीन संघटनेस विरोध दर्शविण्याच्या भूमिकेतून जागोजागी गणेशोत्सवांना बळकटी मिळू लागली. गोविंददासांनी औरंगाबादमधील तरुणांना एकत्र करून तेथे स्वतःचे एक गणेश मंडळ स्थापन केले. त्या मंडळामार्फत सामाजिक स्वातंत्र्याच्या विचारास चालना देण्याचे त्यांनी ठरविले. मंडळाच्या योजनांबद्दल शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये चर्चा सुरू झाली. त्या शाळेतल्या सिप्ती हुसेन नावाच्या एका विद्यार्थ्याने ही बातमी गोविंददासांचे वर्गशिक्षक अहमदुल्ला खान यांच्यामार्फत पोहोचवली. अहमदुल्ला खान यांनी ही गोष्ट त्यांच्या मुख्याध्यापकांच्या कानी घातली. त्या काळात भक्तुल नावाचे एक गृहस्थ त्या शाळेचे मुख्याध्यापक होते. त्यांनी गणेश मंडळ स्थापन केल्याबद्दल तरुण गोविंददासाची हजेरी घेऊन अशा सरकारविरोधी गोष्टी न करण्याची ताकीद दिली. त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे आवडते शिक्षक कर्वेगुरुजी हे संस्कृतप्रमाणेच इंग्रजी हा विषयदेखील उत्तम शिकवत. मॅट्रिकमधील विद्यार्थ्यांची अभ्यासाची गरज जाणून गोविंददासांनी सर्वांसमवेत मुख्याध्यापकांकडे जाऊन इंग्रजी विषयाचे अध्यापन कर्वेगुरुजींकडे सोपविण्याची विनंती त्यांना केली. परंतु पूर्वग्रहदूषित स्वभावाच्या मुख्याध्यापकांनी ती नाकारली आणि उलट हे आंदोलन का केले असे म्हणून त्या सर्व विद्यार्थ्यांना शिक्षा फर्मावली. एक रुपया दंड आणि लेखी माफीनामा देणे असे त्या शिक्षेचे स्वरूप होते. गोविंददासांनी ती शिक्षा घेण्याचे नाकारले. तो विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय आहे अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. एक हुशार विद्यार्थी असा गोविंददासांचा लौकिक होता. तो लक्षात घेऊन मुख्याध्यापकांनी त्यांची दंडाची शिक्षा रद्द करून फक्त माफीनामा द्यावा असे सांगितले. गोविंददासांनी त्यासही विरोध केला आणि वर्गावर बहिष्कार टाकला. हे वृत्त हां हां म्हणता सर्वत्र पसरले, आणि वर्गातील सर्व विद्यार्थी उस्फूर्तपणे बहिष्कारात सामील झाले. परंतु मुख्याध्यापक मागे हटण्यास तयार नव्हते.

माफीनाम्याची मागणी काही ते सोडेनात. अखेर गोविंददासांचे मन बंड करून उठले आणि त्यांनी औरंगाबादची ती शाळा सोडून शिक्षणासाठी हैदराबाद येथे जाण्याचे ठरवले. गोविंददासांच्या घरची परिस्थिती अगदी बेताची होती. वडील त्यांच्या लहानपणीच गेलेले. आजी, आत्या आणि आई या तिघींचाच फक्त आधार होता. सावकारीचे जुने येणे जमेल तेवढे वसूल करून आणि आसपासच्या लोकांसाठी घरगुती पदार्थ तयार करून देऊन त्या तिघीजणी घरचा खर्च कसाबसा भागवीत असत. इतरांकडे जाऊन धान्य निवडणे, मंदिराची कामे करणे, फुलांच्या माळा ओवून देणे अशीही कामे त्या करत. औरंगाबादेहून गोविंददासांस हैदराबादला शिकण्यासाठी पाठवणे त्यांना आर्थिकदृष्ट्या मुळीच परवडणारे नव्हते. पण नातवाच्या तल्लख बुद्धीवर आजी मगनजिया यांचा चांगला विश्वास होता. अडचण सोसूनही त्याला शिकवले पाहिजे असे वाटून आजीने निर्धाराने त्यांना हैदराबादच्या शाळेत प्रवेश घेण्यास प्रोत्साहन दिले. औरंगाबादच्या शाळेने शाळा सोडल्याचा जो दाखला दिला होता त्यावर मुख्याध्यापकांनी अत्यंत प्रतिकूल असा एक शेरा मारला होता. त्या शेऱ्यामुळे हैदराबादेत कुठेही प्रवेश मिळेल किंवा नाही याची शंकाच होती. परंतु गोविंददास हैदराबादच्या सुप्रसिद्ध चादरघाट इंग्लिश हायस्कूलच्या मुख्याध्यापकांना जाऊन भेटले आणि त्यांना सारी हकीगत सांगितली. शाळेच्या दाखल्यावर प्रतिकूल शेरा असूनही शाळेने त्यांची प्रवेश परीक्षा घेतली. तीत हुशार गोविंददासास उत्तम मार्क मिळाले. आणि त्यामुळे तेथील शाळाप्रवेशाचा मार्ग खुला झाला.

त्या वर्षी चादरघाट हायस्कूलमधून गोविंददास हे त्या काळच्या एच. एम. एल. सी. ह्या मॅट्रिकच्या परीक्षेला बसले. परीक्षेचा निकाल लागला तेव्हा ते संपूर्ण हैदराबाद संस्थानातून पहिल्या श्रेणीतून पहिले आले असल्याचे घोषित झाले. संपूर्ण संस्थानातून परीक्षेत सर्वप्रथम आल्यामुळे ते जेव्हा औरंगाबादेत आले तेव्हा त्यांचा नागरी सत्कार करून त्यांना नागरिकांतर्फे एक सुवर्णपदक दिले गेले. औरंगाबादेतील एक प्रथितयश वकील दिगंबरदास चौधरी यांनी जो सत्कार घडवून आणला. या दिगंबरदासांचा मुलगा चंद्रगुप्त आणि त्यांचा पुतण्या विठ्ठलदास यांच्याशी गोविंददासांची ओळख झाली. पुढे चालून त्या काळी अत्यंत प्रतिष्ठेची समजली जाणारी गोखले शिष्यवृत्तीही त्यांना मिळाली. दर महिना रु. ३० एवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून आणि शिवाय वर्षातून एकदा रु. १०० ही रक्कम पुस्तकांसाठी असे त्या शिष्यवृत्तीचे स्वरूप होते. सलग चार वर्षांसाठी मिळणारी ही

शिष्यवृत्ती गोविंददासांना इंटरमीजिएटची परीक्षा पास होईपर्यंत मिळत होती. पुढे हैदराबादच्याच निजाम कॉलेजमधून ते १९३० साली मद्रास विद्यापीठाच्या इंटरमीजिएट् परीक्षेत उत्तीर्ण झाले. इंटरमीजिएट्चा अभ्यासक्रम चालू असताना एकदा त्यांनी गणिताचा पेपर इतका अचूक आणि उत्तम सोडवला की त्यांच्या अरुणाचल शास्त्री नावाच्या प्राध्यापकांनी त्यांना शंभरपैकी एकशे तीन गुण दिले होते. अर्थात गोविंददास हे केवळ अभ्यासातच नव्हे तर इतरही छंदांमध्ये स्वतःला गुंतवून घेत. बुद्धिबळ आणि व्हॉलिबॉल हे खेळ ते उत्तम खेळत. बुद्धिबळात त्यांनी अनेक बक्षिसेही मिळवली होती. उत्तरायुष्यात राजकारण आणि समाजकारणात पदोपदी दिसून येणारा त्यांचा धोरणीपणा आणि मुत्सद्देगिरी ही कदाचित त्यांच्या बुद्धिबळातील प्राविण्यामुळेच त्यांना अवगत झालेली असावीत. इंटरमीजिएट्ला शिकत असतानाच त्यांनी फोटोग्राफीच्या वर्गातही नाव घातले होते. जात्याच हुशार असल्याने तेथे छायाचित्रण कलेतही त्यांनी प्राविण्य मिळवले. अनेक सांस्कृतिक कार्यक्रमातही ते उत्साहाने सहभागी होत असत. पुढे इंटरमीजिएट् झाल्यावर विज्ञानातील बी. एस्सी. ही पदवी घेण्यासाठी गोविंददास हैदराबादच्या निजाम कॉलेजात दाखल झाले.

✿

# पदवी-पदव्युत्तर शिक्षण आणि स्वातंत्र्याची प्रेरणा

गोविंददासांनी विज्ञानातील पदवी घेण्याचे ठरवले खरे, परंतु प्रत्यक्षात मात्र काही वेगळेच घडावयाचे होते. बरोबरीच्या सहाध्यायांशी प्रचलित प्रश्नांवर गोविंददास तासन्‌तास चर्चा करत असत. हैदराबादेत असताना निजामी राजवटीत मुस्लिमेतर नागरिकांना मिळणारी उपेक्षेची वागणूक, धर्मांध मुसलमानांकडून होणारे अत्याचार, आणि लोककल्याणाला कोणतेही प्राधान्य नसलेला सरंजामी पद्धतीचा राज्यकारभार या गोष्टी जास्त प्रकर्षाने जाणवल्यामुळे गोविंददास आणि त्यांचे काही निवडक मित्र यांच्या मनांमध्ये स्वातंत्र्यासाठी काहीतरी चळवळ करण्याची इच्छा बळावू लागली. तिकडे हैदराबाद संस्थानाबाहेर ब्रिटिश अंमलाखालील भारताच्या सर्व प्रांतांमध्ये इंग्रजांविरुद्ध चळवळी सुरू होत्या. महात्मा गांधींच्या झंझावती नेतृत्वामुळे अवघा देश स्वातंत्र्याच्या प्रेरणेने ढवळून निघत होता. १९३० साली गांधीजींनी असहकाराचे आंदोलन सुरू केले. त्यांनी देशभरच्या तरुणांना एक अकरा कलमी कार्यक्रम दिला. त्या परिस्थितीत निजामी संस्थानाच्या सीमा ओलांडून बाहेर पडावे ही भावना गोविंददासांच्या मनात प्रबळ होऊ लागली. शेवटी अच्युत देशपांडे, द. श. पोतनीस, दामोदरदास मुंदडा आदि मित्रांसमवेत त्यांनी इंग्रजी मुलुखातील मुंबई शहर गाठले. तेथे 'जनजीवन संघ' नावाची एक संघटना कार्यरत होती. त्या संघटनेशी त्या तरुणांनी संपर्क साधला. आणि काही दिवस तेथे स्वयंसेवक म्हणून काम केले. पुढे जनजीवन संघाने त्यांना पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून कायमं केले. गोविंददासांना गुजराथच्या सूरत जिल्ह्यातील ओलपाड या गावी पाठवण्यात आले. तेथे त्यांना ग्रामीण जीवनाचे जवळून दर्शन घडू शकले. ओलपाड येथे गोविंददासांनी स्थानिक शेतकऱ्यांची संघटना बांधली.

इंग्रजांनी लादलेल्या अन्यायकारक शेतसाऱ्याविरुद्ध करबंदी आणि शेतसारा बंदीची चळवळ त्यांनी तेथे चालवली. गांधीजींनी घोषित केलेल्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाचे ते एक पाईक बनले. त्यानंतर ते एक वर्षभर आंदोलन चालवत तेथेच राहिले. गांधीजीच्या प्रभावामुळे त्यांनी स्वत:ही खादी वापरावयास सुरुवात केली आणि खादीचा प्रसारही ते करू लागले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अनेक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ लागले. गांधीजीच्या मिठाच्या सत्याग्रहातही त्यांनी भाग घेतला होता. त्या दरम्यान त्यांचा विख्यात साम्यवादी विचारवंत कॉ. बी. टी. रणदिवे यांच्याशी संबंध आला. त्या निमित्ताने गोविंददासांना मार्क्सवादाची ओळख झाली. त्या मार्क्सवादी विचारांचा पगडा त्यांच्या मनावर शेवटपर्यंत होता हे त्यांच्या निकटवर्तीयांना ठाऊक होते. एका परीने मार्क्सवाद आणि गांधीवाद या दोहोंचे एक विधायक मिश्रण गोविंददासांच्या विचारांमध्ये होते असेच म्हणावे लागले. दरम्यान इकडे घरी त्यांच्या आजी मगनजिया यांना आपला नातू शिक्षण सोडून देशाच्या कामासाठी गेला आहे हे कळताच त्या स्वत:ही खादी वापरू लागल्या. मगनजिया ह्या स्वत:ही मोठ्या करारी आणि उच्च आचरणमूल्ये पाळणाऱ्या होत्या. त्यांनी गोविंददास आणि गोपाळदास या दोन्ही नातवांवर फार चांगले नैतिक संस्कार केलेले होते. कठीण आर्थिक स्थितीमुळे अपार कष्ट करून त्यांनी नातवंडांचे शिक्षण चालू ठेवले होते. ही जाणीव गोविंददासांना होती. म्हणूनच एकदा आजीने पाठवलेली एक छोटीशी रक्कम स्वत:च्या हातून हरवली तेव्हा गोविंददासांनी आत्मक्लेश म्हणून दिवसभराचा उपास केला होता. आजी मगनजिया ह्याही निर्धाराने तेवढ्याच पक्क्या होत्या. महात्मा गांधींच्या हाकेला प्रतिसाद देऊन गेलेला आपला नातू घरी परत येईपर्यंत स्वत: चरख्यावर सूत कताई करण्याचे व्रत त्यांनी अंगिकारले होते. परंतु किमान एक वर्ष काम करायचे या निर्धाराने ओलपाडला गेलेल्या गोविंददासांनी तेथे आपले काम चालूच ठेवले. ते संघटनात्मक काम करीत असताना लोकजागृतीसाठी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह मुंबईपासून ठाण्यापर्यंत एक पदयात्रा काढली. तशाच पदयात्रा देशभर काढाव्यात अशी त्यांची मनीषा होती. पण गांधीजींनी गोलमेज परिषदेसाठी इंग्लंडला जाण्याआधी सत्याग्रहाची चळवळ मागे घेतली तेव्हा गोविंददासांनी परत येण्याचे ठरवले.

तेवढे एक वर्ष देशासाठी काम करण्यात व्यतीत केल्यानंतर गोविंददासांनी अर्धवट सोडलेल्या पदवीशिक्षणाकडे पुन्हा वळावयाचे ठरवले. हैदराबादच्या

निजाम कॉलेजात त्यांचे नाव पूर्वीच नोंदवलेले होते. परंतु ओलपाड येथे सामान्य लोकांमध्ये वावरत असताना गोरगरीबांना कोणतीही आरोग्यसेवा मिळू शकत नाही हे त्यांच्या लक्षात आले होते. त्यामुळे गोरगरीबांच्या उपयोगी पडण्यासाठी आपण वैद्यकीय शिक्षण घ्यावे असे त्यांच्या मनात आले. वैद्यकीय शिक्षणाची सोय मद्रास येथे चांगली होती. म्हणून गोविंददासांनी मद्रासला जायचे ठरवले. एवढ्या हुशार विद्यार्थ्याने आपल्या महाविद्यालयातील बी. एस्सी.चा अभ्यासक्रम सोडून जाऊ नये म्हणून निजाम कॉलेजचे तेव्हाचे प्राचार्य टर्नर यांनी गोविंददासांचे मन वळवण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु एकदा मनाचा निश्चय झाल्यावर परत फिरतील तर गोविंददास कसे? अखेर प्राचार्य टर्नर यांना कॉलेज सोडण्याचा दाखला गोविंददासांना द्यावा लागला. गोविंददास मद्रासला गेले. मद्रासमध्ये वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळावा म्हणून त्यांनी प्रयत्न केले. पण प्रवेश मिळू शकला नाही. कुठल्यातरी चांगल्या शिक्षणसंस्थेत शिक्षण घ्यावे ही गोविंददासांची दुदर्म्य इच्छा होती. त्यामुळे मग ते कलकत्यात दाखल झाले. तेथे एका सामान्य हॉटेलात त्यांनी मुक्काम ठोकला आणि प्रवेशासाठी धडपड सुरू केली. त्या हॉटेलात त्यांना रंगनाथन् नावाचा त्यांचा एक जुना मित्र भेटला. तो कलकत्त्याच्या रमण संशोधन संस्थेत काम करीत असे. कलकत्त्यातले चांगले कॉलेज शोधण्याच्या कामात गोविंददासांस त्या रंगनाथन्ने बरीच मदत केली. त्याच्यासोबत नोबेल विजेते डॉ. चंद्रशेखर वेंकट रमण यांची कलकत्यातील रमण संस्थाही त्यांना जवळून पाहता आली. परंतु कलकत्यातही गोविंददासांस वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळू शकला नाही. अखेर कलकत्यातल्याच सिटी कॉलेजमध्ये त्यांनी विज्ञानातल्या बी. एस्सी. या पदवीसाठी प्रवेश घेतला.

गोविंददासांची ज्ञानलालसा एवढी मोठी होती की बी.एस्सी. च्या अभ्यासक्रमासोबत त्यांनी वाणिज्य शाखेतील बी. कॉम. या पदवीसाठीचा अभ्यासही त्याच वेळी सुरू केला. दिवसा सिटी कॉलेजात विज्ञानाचे अध्ययन आणि रात्री विद्यासागर कॉलेजमध्ये बी. कॉम्. चे वर्ग असा दुहेरी शिक्षणाचा अवघड प्रयोग त्यांनी अवलंबिला. विद्यासागर कॉलेजात प्रवेश घेतल्यामुळे त्यांना तेथील वसतीगृहात खोली मिळू शकली. १९३३ साली गणित हा मुख्य विषय घेऊन त्यांनी बी. एस्सी. (ऑनर्स) ही पदवी मिळवली. परंतु त्यांना त्याच वर्षी बी. कॉम. च्या परीक्षेला बसण्याची परवानगी दिली गेली नाही. कलकत्यातील त्या दोन वर्षांच्या वास्तव्यामध्ये तेथील विद्यार्थ्यांमध्ये असलेले देशप्रेम आणि त्यांची प्रागतिक

विचारसरणी यांचा गोविंददासांवर मोठा प्रभाव पडला. त्या काळी त्यांच्या महाविद्यालयाच्याच बीना दास नावाच्या एका विद्यार्थिनीने क्रांतिकारी विचारांनी प्रेरित होऊन एका इंग्रज अधिकाऱ्यावर हल्ला केला होता. आणि त्याबद्दल नऊ वर्षांचा तुरुंगवास पत्करला होता. असे तेथील विद्यार्थी राष्ट्रीय भावनेने भारलेले असत. याच सुमारास गोविंददासांची भेट स्वामी विवेकानंदांच्या ज्येष्ठ बंधूंशी झाली. या भेटीचे रुपांतर पुढे स्नेहात झाले. कलकत्यातील निरनिराळ्या क्रांतिकारी संघटनांची माहिती गोविंददासांना त्यांच्याकरवी मिळाली. त्या संघटनांचे काम कसे चालते ते पाहावयास मिळाले. दरम्यानच्या काळात १९३१ साली गोविंददासांचे धाकटे बंधू गोपाळदास हे मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले होते. १९३३ मध्ये इंटरमीजिएट झाल्यावर त्यांनी पुण्यात जाऊन तेथे वैद्यकीय शिक्षण घ्यावयास सुरुवात केली. आजी मगनजियांच्या सांगण्यावरून गोविंददास हेही त्याच वर्षी पुण्यात स्थलांतरित झाले आणि तेथे त्यांनी उपयोजित गणित हा विषय घेऊन एम.एस्सी. या पदव्युत्तर परीक्षेसाठी फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. खर्च जास्त येऊ नये म्हणून ते दोघे भाऊ दररोज स्वतःच खिचडी शिजवून खात असत. त्या काळात रँग्लर महाजनी, डॉ. कोसंबी आणि रँग्लर केरकर यांच्यासारखे दिग्गज गणिती पुण्यात होते. त्या सर्वांच्या अध्यापनाचा लाभ व्हावा म्हणून गणिताचे पदव्युत्तर वर्ग आलटून पालटून निरनिराळ्या महाविद्यालयांमधून चालत. तेव्हा गोविंददास हे फर्ग्युसन, एस. पी. आणि वाडिया अशा तीनही महाविद्यालयांमध्ये जाऊन त्यांच्या तासांना हजर राहात. मुळातच तल्लखबुद्धी असलेल्या गोविंददासांना त्या तीन महान गणितज्ञांच्या ज्ञानाचे एक मोठे भांडारच प्राप्त झाले असे म्हणावयास हरकत नाही.

त्या तरुण वयामध्ये गणित आणि विज्ञानाच्या व्यासंगातून गोविंददासांची वस्तुनिष्ठ विचारबुद्धी विकास पावत गेली. सत्य, तारतम्य, आणि अनुभवांतून प्राप्त होणारे शहाणपण यांची कास धरूनच लोकजीवन सुसह्य होऊ शकते हे त्यांना कळाले. विज्ञानाचा वापर समाजातील टोकाची विषमता नष्ट करण्यासाठी आणि उपेक्षितांना न्याय मिळवून देण्यासाठी करावयास हवा याचे भान त्यांना प्राप्त झाले. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मासिकामध्ये त्यांनी 'कॉन्क्वेस्ट ऑफ नेचर' (निसर्गावर मात) हा एक इंग्रजी लेख लिहिला होता. तो लेख गोविंददासांच्या मुद्देसूद व विश्लेषणात्मक मांडणीमुळे चांगलाच गाजला. विज्ञानाची प्रगती म्हणजे निसर्गावर मात नव्हे तर निसर्गाचे पद्धतशीर केलेले आकलन होय. अशा आकलनातून सत्य

पुढे येत असते. आणि त्या सत्याचा उपयोग मानवाने संहारासाठी न करता कल्याणासाठी केला तरच मानवजात धरतीवर टिकून राहू शकेल, अन्यथा विनाश ओढवेल असे प्रतिपादन त्यांनी त्या लेखात केले होते. हा वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांनी आयुष्यभरासाठी जोपासला.

✿

# क्रांतीची नांदी आणि गृहस्थजीवनाची सुरुवात

पुण्यात एम. एस्सी. पदवीसाठी शिकत असताना गोविंददास हे सकाळच्या वेळेत एल. एल. बी. ह्या कायद्याच्या पदवीच्या वर्गांना जात. अवघ्या तीन वर्षांच्या काळात गणित आणि कायदा या दोहोंचा अभ्यास करत १९३५ साली त्यांनी एम. एस्सी. ही पदवी घेतली आणि लगेच १९३६ साली एल. एल. बी. ही पदवीही संपादन केली. त्या काळात पुण्यामध्ये नवरात्रात शारदीय ज्ञानसत्र चाले. अनेक विद्वान व व्यासंगी अभ्यासकांची व्याख्याने होत. श्रोत्यांना त्या व्याख्यानांद्वारे अनेक वेगवेगळ्या विषयांची माहिती मिळत असे. अशाच शारदीय सत्रात एकदा अहिताग्नि शंकर रामचंद्र राजवाडे यांची 'फ्रेंच राज्यक्रांती' या विषयावरील तीन व्याख्याने ओळीने झाली. त्या व्याख्यानांमुळे गोविंददास खूप प्रभावित झाले. राजवाड्यांच्या कन्येने केलेली फ्रेंच राज्यक्रांतीची चित्ररेखाटने देखील उत्कृष्ट अशी होती. अहिताग्नींची व्याख्याने आणि ती चित्रे यांतून अत्यंत कठीण परिस्थितीतही स्वातंत्र्याचे आंदोलन पुढे नेण्याची प्रेरणा गोविंददासांस मिळाली. नंतर त्यांनी त्या विषयावरील अनेक पुस्तके वाचली. जगभर झालेल्या स्वातंत्र्ययुद्धाचा आणि राज्यक्रांतीच्या चळवळीचा इतिहास वाचला. निरनिराळ्या राजकीय विचारसरणींचा अभ्यास केला.

पदव्युत्तर शिक्षणानंतर ते औरंगाबाद शहरात परत आले तेव्हा मराठवाड्यातील तरुणांमध्ये एक नवे वातावरण निर्माण करण्याची गरज त्यांना जाणवली. विठ्ठलदास आणि चंद्रगुप्त चौधरी या मित्रांसोबत गोविंददास दररोज गावाबाहेरच्या हनुमान टेकडी परिसरात फिरावयास जात. विठ्ठलदास हे मोठे मार्क्सवादी कार्यकर्ते होते. त्यांच्यामुळे चंद्रगुप्त चौधरीही मार्क्सवादाकडे आकर्षित

झाले होते. गोविंददासांवर विठ्ठलदासांनीच मार्क्सच्या विचारांचा प्रभाव पाडला. जगभरात झालेल्या राज्यक्रांतींबद्दल आणि भारतात सुरू असलेल्या स्वातंत्र्याच्या चळवळीबद्दल ते गंभीरपणे चर्चा करत. कार्ल मार्क्स आणि एंगल्स यांनी लिहिलेला साम्यवादी जाहीरनामा, 'स्टेट ॲन्ड रिव्होल्युशन' हे लेनिनचे पुस्तक आदि राजकीय विचारांचे साहित्य ते वाचत. गोविंददास, स. कृ. वैशंपायन, चंद्रगुप्त चौधरी आणि व्ही. डी. देशपांडे या मित्रांमध्ये त्या विषयावर तासन्तास चर्चा होत असे. गोविंददासांनी औरंगाबाद शहरात एक 'स्टडी सर्कल' स्थापन केले. खाराकुवा भागातील त्यांच्या राहत्या घरातच त्या अभ्यासमंडळाच्या बैठका होऊ लागल्या. हळूहळू शहरातला तरुण वर्ग गोविंददासांच्या भोवती गोळा होऊ लागला. टिळक-आगरकरांचे विचार, मार्क्सवाद, गांधीजींचे तत्त्वज्ञान, ब्रिटिश भारतात चालू असलेला स्वातंत्र्यलढा अशा निरनिराळ्या विषयांवर आधी मांडणी करून तरुणांमध्ये चर्चा घडवल्या जात असत. अनेक विषयांवर गोविंददास हे स्वतःच मांडणी करीत. अभ्यासमंडळाच्या या चर्चासत्रांना हळूहळू गर्दी होऊ लागली. उपस्थित राहणारे संवेदनशील तरुण स्वातंत्र्याच्या विचारांनी भारले जाऊ लागले. नित्याच्या बैठकांमधून निर्माण झालेल्या स्नेहापोटी गोविंददासांस ते सारे 'गोविंदभाई' असे म्हणू लागले. आणि त्यांच्यासाठी तेच संबोधन पुढे लोकांमध्ये रूढ झाले. हळूहळू तशाच प्रकारची अभ्यासमंडळे मराठवाड्यात अंबेजोगाई, परतूर, सेलू, परभणी, उमरी, बीड आणि लातूर या गावामध्येही सुरू झाली. प्रत्येक ठिकाणी दहाबारा तरुण एकत्र येऊन वेगवेगळ्या विचारसरणी, तत्त्वज्ञाने, क्रांतियुद्धे आणि चळवळी यांविषयी चर्चा करू लागले. अभ्यासपूर्वक आपापली मते मांडू लागले. मराठवाड्यातील तरुणांमध्ये स्वातंत्र्याच्या प्रेरणा जागवण्यासाठी त्या स्टडी सर्कल्सचा त्या काळी फार उपयोग झाला. शिवाय औरंगाबाद शहरात गणेशोत्सवाच्या आणि इतर धार्मिक समारंभांच्या निमित्ताने निरनिराळे सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणण्यातही गोविंदभाई पुढाकार घेऊ लागले. त्या कार्यक्रमांतील गीते, नृत्ये अशा निरनिराळ्या सादरीकरणांत देशभक्तीचा संदेश बेमालूमपणे मिसळून तो सामान्य लोकांपर्यंत पोहोचवला जाऊ लागला. गणेशोत्सवामध्ये निरनिराळ्या विद्वानांची आणि समाजसुधारकांची व्याख्याने आयोजित करीत. औरंगाबादेत नाथषष्ठीचा सोहळा पूर्वापार चालत आलेला होता. नाथषष्ठीच्या दिवशी औरंगाबादमधील तरुण पालखी घेऊन एक पारंपारिक दिंडी काढत. गोविंदभाई आणि त्यांचे तरुण मित्र खांद्यावर पताका नाचवत, टाळ मृदंग वाजवत

वारकऱ्यांच्या वेशात त्या दिंडीत सामील होत. आणि हुतात्मा भगतसिंह, हुतात्मा कान्हेरे, महात्मा गांधी, भारतमाता यांच्या जयजयकाराच्या घोषणा देत. हळूहळू औरंगाबाद जिल्ह्यात सर्वच गावांमध्ये निघणाऱ्या दिंड्यांमध्ये तशा घोषणा दिल्या जाऊ लागल्या. त्या कार्यक्रमांमुळे खेडोपाडी देशप्रेमाचे वातावरण तयार होण्यास मोठी मदत झाली.

औरंगाबादच्या ज्या शाळेतून दाखला घेऊन त्यांना हैदराबादला जावे लागले होते त्याच सरकारी हायस्कूलात १९३६ मध्ये गोविंदभाईंनी शिक्षकाची नोकरी मिळवली. तेथे इंग्रजी आणि गणित हे दोन विषय ते शिकवू लागले. अल्पावधीतच एक अत्यंत विद्यार्थीप्रिय आणि उत्तम शिक्षक म्हणून त्यांना लौकिक प्राप्त झाला. त्यांच्या या नोकरीच्या काळातच एकदा हैदराबादच्या निजामाच्या दुर्रे शहवार नावाच्या एक सुनेचे औरंगाबादेत आगमन होणार असे घोषित झाले. सरंजामी प्रथेप्रमाणे राजघराण्यातील व्यक्ती आल्यानंतर सर्व सरकारी मुलजिमांनी 'दस्तर' नावाचा एक विशिष्ट पायघोळ पोषाख घालूनच तिच्यासमोर जाण्याचा रिवाज होता-नव्हे तशी सक्तीच होती. सरकारी शाळेत नोकरीला असल्याने गोविंदभाई आणि त्यांचे सहकारी यांच्यावरही ती पाळी आली. सर्वांमध्ये असंतोष पसरला. तेव्हा गोविंदभाईंनी सर्वांचे एक शिष्टमंडळ तयार केले आणि संबंधित सरकारी अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांच्यासमोर मुत्सद्दगिरीने नीट युक्तिवाद करून त्यांनी हा गुलामगिरीदर्शक पोषाख घालण्यातून सर्वांना सूट मिळवून दिली. त्या घटनेपासून सहकारी शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा गोविंदभाईंबद्दलचा विश्वास आणि आदर जास्तच वाढला. हैदराबाद संस्थानाबाहेर इंग्रजी अंमलाखालील भारतात सुरू असलेला स्वातंत्र्याचा लढा, त्याला लाभलेले महात्मा गांधींचे नेतृत्व, गांधीजींनी लढ्यासाठी दिलेले अहिंसात्मक सत्याग्रहाचे अनोखे शस्त्र आणि त्यात तरुणांचा असलेला मोठा सहभाग या गोष्टी पाहिलेल्या गोविंदभाईंना निजामी राजवट असलेल्या हैदराबाद संस्थानातही तरुणांनी स्वातंत्र्यासाठी सत्याग्रहाचे पाऊल उचलले पाहिजे असे प्रकर्षाने वाटू लागले. त्यासाठी मराठवाड्यात तरुणांना तयार करण्याचे काम त्यांनी अंगिकारले. वस्तुतः त्यावेळी घरातल्या वडिलधाऱ्या मंडळींची त्यांच्याकडून वेगळीच काही अपेक्षा होती. शिक्षण पूर्ण करून आल्यावर गोविंदभाईंनी लग्न करावे. संसार थाटावा आणि शहरात वकिलीचा व्यवसाय करावा असे त्यांना वाटत होते. त्या मानाने शाळेच्या नोकरीत तुलनेने फारच कमी पगार मिळे. परंतु शहरातील तरुणांशी सतत संपर्क राहावा म्हणून गोविंदभाईंनी

शाळेची नोकरीच पत्करली. एव्हाना घरातल्या लोकांनी त्यांच्या लग्नाचे प्रयत्न सुरूही केले होते. परंतु गोविंदभाईंच्या चळवळ्या राजकीय स्वभावाची माहिती होताच पंचक्रोशीतील अनेक वधुपिते काढता पाय घेऊ लागले. एकदा तर चोपडा या गावातील एका प्रतिष्ठित कुटुंबातील मुलीशी अगदी ठरलेले लग्न याच कारणाने हातोहात मोडले. अखेर उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथील पारीख घराण्यातील एक मुलगी सांगून आली. तेथील एक प्रतिष्ठित जमीनदार जयकृष्णदास पारीख आणि त्यांच्या पत्नी जमनाबाई या दांपत्याची कन्या डॉ. सत्यवती उर्फ सत्याबेन ही उपवर होती. तिने आग्रा येथील मेडिकल कॉलेजमधून वैद्यकशास्त्रातील पदवी घेतलेली होती. सत्याबेनचे मामा गोविंददास मेहता यांचा फोटो स्टुडिओ हैदराबादेत होता. त्या स्टुडियोमुळेच त्यांचा गोविंदभाईंशी परिचय झाला होता. हा योग जुळून यावा म्हणून औरंगाबादचे जमीनदार विठ्ठलदास चौधरी यांनी रदबदली केली. आणि १३ मे १९३७ रोजी डॉ. सत्यवतींचा गोविंदभाईंशी विवाह झाला. लग्न होऊन गोविंदभाईंचा संसार सुरू झाला.

✿

# महाराष्ट्र परिषदेची स्थापना आणि पहिले अधिवेशन

एव्हाना हैदराबाद संस्थानात राजकीय वादळाला प्रारंभ झाला होता. इंग्रजांच्या अंमलाखालील भारतात सुरू असलेल्या क्रांतिकारकांच्या बलिदानामुळे आणि स्वदेशी चळवळीमुळे सरकारविरोधी भावना हैदराबादच्या रयतेत पूर्वीपासूनच धुमसत होती. परंतु त्या भावनेस मूर्त स्वरूप मिळत नव्हते. १९०९ साली नाशिक शहरात जेव्हा अनंत कान्हेरे या क्रांतिकारकाने स्वातंत्र्याच्या प्रेरणेने त्याच्या इतर सहकाऱ्यांसह जॅकसन नावाच्या इंग्रज कलेक्टरचा वध केला तेव्हा जनतेमध्ये उमटणारी स्वागतमय प्रतिक्रिया पाहून निजामाला संपूर्ण हैदराबाद संस्थानात सुरक्षेसाठी कडक बंदोबस्त जारी करावे लागले होते. ब्रिटिश अंमलाखालील भारतात गांधीजींनी असहकाराची खिलाफत चळवळ सुरू केली त्याही वेळी संस्थानात तिचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून विशेष काळजी घेण्यात आली होती. पण तरीही त्या चळवळीत उस्फूर्त पाठिंबा मिळाला होता. १९१९ साली तिकडे मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणांचा कायदा केला गेला होता. त्यानुसार देशी हिंदी लोकांना राज्यकारभारात स्थान देण्याची तयारी इंग्रज सरकारने दाखवली. इंग्रजांच्या दबावाखाली त्याच वर्षी हैदराबाद संस्थानात निजामाने 'बाबे हुकूमत' नामक एका कार्यकारी मंडळाची स्थापना केली आणि संस्थानाचा राज्यकारभार त्या मंडळाच्या हाती सोपवला. परंतु बाबे हुकूमतचा कोणताही निर्णय मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार निजामाने स्वत:कडेच ठेवला होता. कारभारातील सुधारणांसाठी आवश्यक ती माहिती मिळवण्याचे काम एका हिंदू निवृत्त न्यायाधीशाकडे सोपविण्यात आले. त्यानंतर १९२० साली वामन रामचंद्र नाईक यांच्या पुढाकाराने हैदराबादमध्ये 'हैदराबाद रिफॉर्म्स असोसिएशन' या पहिल्या

राजकीय संस्थेची स्थापना झाली. तीत हिंदू आणि मुसलमान अशा दोन्ही धर्मांच्या नागरिकांचा समावेश होता. त्या असोसिएशनने एक प्रजापरिषद भरवण्याचे ठरवले होते. परंतु १९२१ मध्ये निजाम सरकारने सभाबंदीचे फर्मानच जारी केले. आणि त्यानंतर सरकारी माध्यमातून एकांगी जातीय प्रचार सुरू झाला. परिणामत: लोकांमध्ये जातीय तेढ वाढीला लागली. हैदराबाद रिफॉर्म्स असोसिएशनमधून मुसलमान सदस्य माघार घेऊ लागले. अशा परिस्थितीतच संस्थानात आंध्रजन संघम्ची स्थापना १९२२ साली झाली. पुढे १९२५ साली काकीनाडा येथे अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनात हैदराबाद संस्थानात जनतेला अभिव्यक्तीचे व पत्रकारितेचे स्वातंत्र्य दिले जावे असा एक राजकीय ठराव करण्यात आला. काँग्रेसच्या त्यानंतरच्या मुंबई, पुणे आणि अकोला या तीनही अधिवेशनामध्ये हैदराबाद संस्थानातील जनतेच्या शिक्षण, आरोग्य आणि नागरी-स्वातंत्र्य यांबाबत होणाऱ्या कुचंबणेच्या विरोधात ठराव करण्यात आले होते. १९२६ आणि १९२८ या दोन वर्षी हैदराबादमधील राघवेंद्रजी शर्मा यांच्या प्रयत्नामुळे अनुक्रमे मुंबई आणि पुणे येथे हैदराबाद संस्थानातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठका झाल्या. त्या बैठकातून संस्थानातील लोकांच्या समस्यांचा उहापोह झाला. आता हळूहळू लोकांमध्ये सरकारविरोधी भावना मूळ धरू लागली होती. १९२९ मध्ये निजामाने जनतेच्या खासगी शाळा, व्यायामशाळा, वाचनालये, सार्वजनिक उत्सव, मिरवणुका अशा सर्व गोष्टींवर अत्यंत कडक असे निर्बंध लादले. शिवाय कोणत्याही प्रकारच्या सभेला बंदी घालणारा एक कायदा जारी केला. लोक त्यास 'काळा कायदा' असे म्हणू लागले. १९३२ मध्ये हैदराबादेत काशीनाथराव वैद्य प्रभृतींनी एक 'हिंदू स्टॅन्डिंग कमिटी' स्थापन केली आणि लोकांवर होत असलेल्या अन्यायांना वाचा फोडण्यासाठी एक पुस्तिका काढली. परंतु त्या संघटनेवर पुढे बंदी घातली गेली. १९३४ साली नवाब निझामत जंग नावाच्या एका निवृत्त न्यायाधीशांनी 'निजाम सब्जेक्टस् लीग' नावाची संघटना काढली. नवाब निझामत जंग हे एका प्रकारे धर्मनिरपेक्ष आणि लोकशाहीवादी विचारांचे होते. त्यांनी काढलेल्या त्या संघटनेमध्ये वामन नाईक, एम. नरसिंगराव, बी. रामकृष्णराव, नवाब बहादुर यार जंग, बॅ. अकबर अली खान, आर. एस. नाईक, श्रीनिवास शर्मा इत्यादींचा समावेश होता. त्यांनी स्थानिक नागरिकांसाठी मुलकी हक्क आणि राजकीय व नागरी सुधारणाची मागणी केली. निजामाने अर्थातच त्या संघटनेवरही बंदी घातली. त्या नंतरच्या काळात संस्थानामधील मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटकातील

रयतेच्या आकांक्षांना राजकीय व्यासपीठ मिळावे या हेतूने निरनिराळ्या नावांनी मराठवाडा, तेलंगण अाणि कर्नाटकामध्ये राजकीय संघटना स्थापन करण्यात आल्या. आंध्रजन संघम्‌ची स्थापना तेलंगणातील ज्येष्ठ नेते मडापती हनुमंतरावराव यांच्या नेतृत्वाखाली १९२२ सालीच झाली होती. त्या प्रमाणेच संघर्षाचे बीज पेरण्यासाठी १९३६ साली आ. कृ. वाघमारे आणि हिप्परग्याचे अनंतराव कुलकर्णी यांनी सोलापुरात 'महाराष्ट्र संघ' नावाची संघटना स्थापन केली. १९३७ मध्ये हैद्राबादेत कर्नाटक परिषद स्थापन झाली आणि तिचे अधिवेशनही पार पडले.

१९३७ मध्ये परभणी जिल्ह्यात असलेल्या परतूर या गावी एक महाराष्ट्र परिषद भरली. गोविंदराव नानल हे तिचे अध्यक्ष होते. गोविंदभाई श्रॉफ हे त्या अधिवेशनाला सपत्निक उपस्थित राहिले. अधिवेशनात तीन स्तरांवरचे प्रतिनिधी उपस्थित होते. हैदराबाद मधील अनेक मान्यवर नेते त्यात होते. शिवाय आ. कृ. वाघमारें यांच्या नेतृत्वाखाली आलेले महाराष्ट्र संघाचे कार्यकर्ते होते आणि गोविंदभाईच्या नेतृत्वाखालील तरुणही होते. असे निरनिराळ्या विचारांचे आणि वृत्तींचे लोक अधिवेशनास उपस्थित होते. संस्थानातील जुलमी सरकारच्या विरोधात लोकांची संघटना उभी करून तिच्यामार्फत सरकारशी लढा द्यावा या जहाल मताच्या लोकांचा एक गट होता. त्यात गोविंदभाईंचा आणि मराठवाड्यातील बहुसंख्य कार्यकर्त्यांचा समावेश होता. तर दुसरा गट हा संघटनेने निजाम सरकारला विनंत्या करून आणि सरकारशी वाटाघाटी करून मिळतील तेवढ्या सवलती पदरात पाडून घ्याव्यात अशा मवाळ धोरणाचा होता. या जहाल आणि मवाळ गटांमधील वाद परतूर अधिवेशनात स्पष्ट झाला. परंतु गोविंदभाईंनी त्या वादात हस्तक्षेप करून अत्यंत मुत्सद्देगिरीने सर्वांना नेमस्त भूमिका स्वीकारावयास लावली. संघटना हवी हे सर्वांचेच मत होते. तेव्हा संघटनेची निकोप वाढ व्हावी या व्यापक विचाराने एरव्ही जहाल असलेल्या गोविंदभाईंनी तेथे समन्वयाची भूमिका घेतली. या परतूर अधिवेशनामध्ये गोविंदभाईंचे नेतृत्वगुण उघड झाले. महाराष्ट्र परिषदेची एक घटना तयार केली जावी असा गोविंदभाई, स. कृ. वैशंपायन, रा. गो. परांजपे प्रभृतींचा आग्रह होता. त्या नुसार एक घटना समिती नेमली गेली आणि तीवर इतरांसोबत गोविंदभाईंचीही नेमणूक केली गेली. गोविंदभाईंनी घटनेचा मसुदा तेथेच तयार करून तो त्याच अधिवेशनात सादर केला. त्या मसुद्यातील काही कलमांना तात्पुरती मान्यता देऊन संघटनेचे कामकाज सुरू करावे असा निर्णय तेथे झाला. त्या अधिवेशनात मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे

विविध प्रश्नही चर्चेत आले. गोविंदभाईंना शेतकऱ्यांच्या समस्यांबद्दल आस्था निर्माण झाली होती. आपल्या राजकीय कार्यक्रमांमध्ये त्या प्रश्नांना महत्त्वाचे स्थान देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्या अधिवेशनात संघटनेच्या अस्थायी समितीमध्ये गोविंदभाईंसह मराठवाड्यातील आ. कृ. वाघमारे, नारायणराव चव्हाण, डी. एल. पाठक आणि गुलाबचंद नागोरी यांचा समावेश केला गेला. स्वामी रामानंदतीर्थ हे त्या काळी मोमिनाबाद (आजचे अंबेजोगाई) येथे मराठी शाळा चालवत असत. स्वामीजींचे पूर्वाश्रमीचे नाव व्यंकटेश भवानराव खेडगीकर असे होते. ते कामगार चळवळीचे नेतृत्व करीत असत. नंतर १९२९ मध्ये ते पायगा इलाख्यातील तत्कालीन लोहारा तालुक्यात असलेल्या हिप्परगा या गावातील राष्ट्रीय शाळेचे मुख्याध्यापक झाले. हिप्परग्याची ती शाळा अनंतराव कुलकर्णी आणि व्यंकटराव देशमुख यांनी स्थापन केलेली होती. स्वामीजींसमवेत रा. गो. उर्फ बाबासाहेब परांजपे आणि राघवेंद्रराव दिवाण हेही तेथे शिकवत असत. पुढे १९३५ साली स्वामीजी आणि बाबासाहेब परांजपे यांनी मोमिनाबादच्या योगेश्वरी नूतन विद्यालयाचे पुनरुज्जीवन केले आणि ते तिथे काम करू लागले. परतूरच्या अधिवेशनात स्वामीजींनीही आपल्या सहकाऱ्यांसह भाग घेतला. तेथे गोविंदभाई आणि त्यांच्या मित्रांची स्वामीजींशी भेट घडून आली. पुरोगामी विचारांच्या, आणि संस्थानातील जनतेला पूर्ण राजकीय स्वातंत्र्य हवे अशी भूमिका घेणाऱ्या त्या तरुण कार्यकर्त्यांचे म्हणणे स्वामीजींनाही मान्य होते. स्वामीजी परतूर अधिवेशनात केवळ एक निरीक्षक म्हणून उपस्थित राहिले होते. त्यांनी अधिवेशनात तरुणांच्या एका गटासमोर संस्थानातील शेतकऱ्यांच्या दु:स्थितीबद्दल मोठे प्रभावी असे भाषण दिले. राजकीय गुलामगिरीतून मुक्तता करून घेणे याप्रमाणेच शोषण, जुलूम आणि दारिद्र्य यातून मुक्तता प्राप्त करणे हेही आपले उद्दिष्ट हवे असे त्यांनी सांगितले. हैदराबाद संस्थानातील जातीय आणि एकतंत्री राजवटीविरुद्ध सर्व शक्तिनिशी संघर्ष करण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली. सरंजामशाही राजवट नष्ट करून लोकशाही प्रस्थापित करणे आणि तिच्याद्वारे न्यायपूर्ण सामाजिक व्यवस्था राबवणे हे आपले लक्ष्य असावयास हवे असेही स्वामीजींनी सांगितले. त्यांच्या त्या भाषणाचा सखोल परिणाम तरुणांवर झाला. त्याच अधिवेशनात गोविंदभाईंनी स्वातंत्र्यासाठीच्या लढ्यात उतरण्याचा निर्णय घेतला. आणि त्यांच्या आयुष्यातल्या अत्यंत संघर्षमय अशा एका राजकीय पर्वास प्रारंभ झाला. एका दृष्टीने हैदराबाद संस्थानाच्या इतिहासातल्या एका क्रांतिकारी स्वातंत्र्यलढ्याची सुरुवात महाराष्ट्र

परिषदेच्या परतूर अधिवेशनापासून झाली असे म्हणावयास हरकत नाही.

हैदराबाद संस्थानातील लढ्याचे स्वरूप हे अनेकांना वाटते त्याप्रमाणे 'हिंदूचा मुसलमानांशी लढा' असे नव्हते हे येथे ध्यानी घ्यावयास हवे. त्या काळी हैदराबाद आणि काश्मीर या दोन्ही संस्थांनामध्ये झालेल्या लोकचळवळींमध्ये कमालीचे साधर्म्य होते. हैदराबादमध्ये बहुसंख्य जनता हिंदू होती आणि राज्यकर्ता निजाम हा मुस्लिम होता. काश्मीरात बहुसंख्य जनता मुस्लिम आणि राजा हरिसिंग हा हिंदू होता. हैदराबाद आणि काश्मीर या दोन्ही संस्थानांमध्ये बहुसंख्याकांनी सरंजामी राजवटीतून मुक्तता व्हावी म्हणून चळवळ केली. हैदराबादेत चळवळीचे नेतृत्व स्वामी रामानंदतीर्थ यानी केले तर काश्मीरात डॉ. शेख अब्दुल्ला यांनी नेतृत्व केले. या दोन्ही नेत्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही राज्यव्यवस्थेचा आग्रह धरून भारतीय संघराज्यात विलीन होण्याची भूमिका घेतली. त्यामुळे हैदराबाद आणि काश्मीर या दोन्ही संस्थानामध्ये झालेला लोकसंघर्ष हा हिंदू आणि मुस्लिमांमधील संघर्ष नव्हता तर तो बहुसंख्यांकांनी सरंजामी राजवटीविरुद्ध केलेला संघर्ष होता. त्याची उद्दिष्टे जास्त व्यापक आणि दूरगामी अशी होती. हैदराबाद संस्थानातील हिंदू लोकसंख्या ८२ टक्के होती तर मुसलमानांची संख्या अवघी १२.५ टक्के होती. संस्थानात तेलगू भाषिक लोक सर्वांत जास्त होते. आणि त्यांच्या खालोखाल अनुक्रमे मराठी आणि कानडी लोक बहुसंख्याक होते. परंतु निजामाची राजभाषा उर्दू असल्यामुळे या इतर भाषांची प्रचंड उपेक्षा होत असे. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण, सरकारी कार्यालयांचे व्यवहार, न्यायालयांचे कामकाज, ग्रंथनिर्मिती, आणि शासकीय अभिलेख या सर्वांसाठी उर्दू हेच माध्यम सक्तीचे होते. वस्तुत: पूर्वीपासूनच संस्थानात मराठी भाषेचा प्रसार आणि विकास व्हावा या साठी अनेक मराठी नागरिक प्रयत्न करीत होते. हैदराबादेत वामनराव नाईक आणि केशवराव कोरटकर यांनी १९१५ सालीच एक 'दक्षिण साहित्य संघ' सुरू केलेला होता. अनेक मराठीभाषिक लोक त्याचे सभासद झाले होते. नागपूरच्या विदर्भ साहित्य संघाची संलग्नता त्यांना मिळाली होती. हा दक्षिण साहित्य संघ सोळा वर्षे कार्यरत होता. १९३१ मध्ये एक मराठी साहित्य संमेलन हैदराबादेत घेण्यात आले होते. ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर हे त्याचे अध्यक्ष होते. हैदराबाद संस्थानातील मराठी भाषिकांची संख्या कमी होत चालली असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली होती. मराठी भाषेच्या विकासासाठी संस्थानातच लेखन-वाचन संस्कृतीची जोपासना जोमाने करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. हैदराबादमध्ये

१९२० साली 'निजाम विजय' नावाचे एक मराठी साप्ताहिक निघत असे. ते लक्ष्मणराव पाठक यांनी अनंत अडचणींना तोंड देत चालवले होते. त्याचप्रमाणे 'मुशीरे दख्खन' आणि 'नागरिक' नावाची नियतकालिकेही निघत असत. हैदराबाद मुक्तिलढ्याचे मराठवाड्यातील आघाडीचे कार्यकर्ते आ. कृ. वाघमारे यांनी तर अभिव्यक्ती स्वातंत्र्याची मोठी चळवळच हाती घेतलेली होती. मराठी रयतेमध्ये राष्ट्रीय भावना जागवणारे ज्वलंत लिखाण ते करीत. निजाम सरकारची त्यांच्या लिखाणावर वक्री नजर असल्यामुळे त्यांनी संग्राम, रणदुंदुभी, समरभूमी, हैदराबाद स्वराज्य, मोगलाई, कायदेभंग, सत्याग्रह, कायाकल्प, संजीवनी अशा वेगवेगळ्या नावांनी मराठी साप्ताहिके आलटून पालटून चालवली होती. पुढे १० फेब्रुवारी १९३८ रोजी आ. कृ. वाघमारेंनी हैदराबादेतच 'मराठवाडा' या साप्ताहिकाची स्थापना केली. मराठी भाषेच्या विकासासाठी संस्थानातील मराठी साहित्यप्रेमींना विदर्भातील किंवा पुण्यातील साहित्य परिषदांवर अवलंबून राहावे लागे. परंतु त्या सस्थांना हैदराबाद संस्थानात एका मर्यादेपर्यंतच काम करता येत होते. म्हणून १९३७ साली हैदराबाद संस्थानात एक 'निजाम प्रांतीय मराठी साहित्य परिषद' स्थापन केली गेली. ऑक्टोबरात झालेल्या त्या परिषदेच्या पहिल्याच अधिवेशनात संस्थानातील कोर्टाचे कामकाज मराठीत चालावे असा ठराव केला गेला. अशा प्रकारे मराठी जनतेच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार साहित्य व्यवहारातील संस्थांकडूनही होऊ लागला. त्यानंतर नांदेड आणि औरंगाबाद येथे क्रमाने आणखी दोन मराठी साहित्य संमेलने झाली. त्या सर्व संमेलनांना मराठी साहित्यिकांप्रमाणेच राजकीय कार्यकर्तेही उपस्थित असत. निजामी राजवटीत भरलेल्या त्या तीन साहित्य संमेलनांनी संस्थानातील मराठी जनतेची भाषिक आणि सांस्कृतिक अस्मिता जागी करून राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीला मोठाच हातभार लावला.

त्या पुढचे १९३८ हे वर्ष हैदराबाद मुक्तिलढ्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचे वर्ष म्हणून गणले जाते. अनेक खळबळजनक व महत्त्वाच्या घटना त्या वर्षातच घडल्या. १९३८ च्या फेब्रुवारी महिन्यात आ. कृ. वाघमारे यांनी 'मराठवाडा' साप्ताहिकाचे प्रकाशन पुण्याहून सुरू केले. दरम्यान नवाब निजामत जंग यांनी स्थापन केलेल्या सुधारणावादी निजाम सब्जेक्टस् लीगमधून बहादुर यार जंग हे बाहेर पडले होते. ते इत्तेहादुल मुसलमीन या जातीय संघटनेचे अध्यक्ष झाले. त्याच वर्षी संस्थानात जातीय दंग्यांची मोठी लाट पसरली. १९३८ च्या फेब्रुवारीमध्ये हरिपुरा येथे भरलेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एक अधिवेशन झाले.

नेताजी सुभाषचंद्र बोस हे त्याचे अध्यक्ष होते. संस्थानांमधील जनतेने स्वत:च्या बळावर स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न करावेत असा ठ़राव त्या अधिवेशनात झाला. १९३८च्या जून महिन्यात लातूरमध्ये महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन भरले. त्यानंतर हैदराबाद स्टेट काँग्रेसची रीतसर स्थापना करण्याचा प्रयत्न झाला. परंतु त्या आधीच निजाम सरकारने ती बेकायदेशीर ठरवून तीवर बंदी लादली. १९३८च्या ऑक्टोबर महिन्यात हिंदू महासभेच्या 'हिंदू नागरिक हक्क संरक्षण' मंडळाच्या वतीने आणि नंतर आर्यसमाजाच्या वतीने निजाम सरकारविरोधी आंदोलने करण्यात आली. त्या ऑक्टोबरातच २४ तारखेला गोविंदराव नानल यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसवर लादलेल्या बंदीच्या विरोधात सत्याग्रहाची चळवळ सुरू केली.

✿

# वंदे मातरम् चळवळ आणि सत्याग्रहांचे लोण

१९३८ साली डिसेंबरात निजाम सरकारने 'वंदे मातरम्' या गीतावर बंदी आणली. त्यामुळे गोविंदभाईंनी औरंगाबादेत 'वंदे मातरम् चळवळ' सुरू केली. त्या काळात शालेय क्रमिक पुस्तकामधून मुस्लिम धर्मासंबंधीचेच धडे असत. शाळेत शिक्षणाचे माध्यमही उर्दू हेच होते. बहुसंख्येने हिंदू असलेल्या विद्यार्थ्यांना या गोष्टी अन्यायकारक वाटत असत. संस्थानातील शाळा-कॉलेजांमध्ये प्रार्थना म्हणून निजामाचे गुणगान करणारे एक आसफिया गीत म्हणावयाची प्रथा होती. परंतु 'वंदे मातरम्' या गीतावर जेव्हा बंदी लादली गेली तेव्हा ते राष्ट्रभक्तिपर गीतच म्हणण्याचा आग्रह विद्यार्थ्यांनी धरला. औरंगाबादच्या इंटरमीजिएट कॉलेजमध्ये त्या काळी काझी मोहम्मद हुसेन नावाचे एक प्राचार्य होते. ते उस्मानिया विद्यापीठाचे प्रकुलगुरूही होते. गोविंदभाईंनी सर्व विद्यार्थ्यांना सोबत घेऊन प्राचार्यांना एक निवेदन दिले. त्यात विद्यार्थी 'वंदे मातरम्' हेच गीत म्हणतील, त्यांना दुसरे कोणतेही गीत म्हणण्याची सक्ती करू नये अशी मागणी केलेली होती. प्राचार्यांनी अर्थातच ती मागणी धुडकावून लावली. विद्यार्थ्यांमध्ये मोठा असंतोष पसरला. शाळांमध्ये शिकणाऱ्या आठवी ते दहावी या वर्गातील विद्यार्थ्यांनीही निजामी आसफिया प्रार्थनेवर बहिष्कार टाकला. औरंगाबादेत अनेक विद्यार्थ्यांनी उपोषण सुरू केले. त्यानंतर हैदराबाद येथील विद्यार्थ्यांनीही सय्यद हुसेन नावाच्या एका निजामी अधिकाऱ्याची गाडी अडवून आंदोलन केले. गोविंदभाई आणि कॉम्रेड व्ही. डी. देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना संघटित करून वंदे मातरम् हेच गीत प्रार्थनेच्या वेळी म्हणण्याची चळवळ सुरू केली. ही चळवळ हां हा म्हणता हैदराबाद, गुलबर्गा आणि वरंगल येथील कॉलेजामध्येही फोफावली. या चळवळीत भाग

घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना निजाम सरकारने संस्थानातील कॉलेजांमध्ये शिक्षण घेण्यास मज्जाव केला. त्यामुळे ते विद्यार्थी संस्थानाबाहेरच्या नागपूर विद्यापीठात, खामगावच्या राष्ट्रीय विद्यालयात, येवला येथील आपटेगुरुजींच्या विनय मंदिरात आणि त्याचप्रमाणे वाशिम, अहमदनगर अशा गावांमध्ये गेले. काही विद्यार्थी तर मध्यप्रदेशातल्या जबलपूर येथेही गेले. आंदोलक विद्यार्थ्यांना संस्थानाबाहेर प्रवेश मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणाची सोय लावून देण्यासाठी हैदराबादेत आणि इतरत्रही समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. ते विद्यार्थी शिक्षणासाठी जेथे कुठे गेले तेथे हैदराबाद संस्थानाच्या स्वातंत्र्याची प्रेरणा घेऊनच गेले. अशा विद्यार्थ्यांमध्ये अच्युत रेड्डी, नरेंद्र दत्त, व्ही. डी. देसाई, डी. एम. देशमुख, श्रीनिवास राव, उमापती राव, जे. बी. उपाध्याय, नरसिंगप्रसाद जायस्वाल, डी. एस. देसाई इत्यादींचा समावेश होता. त्यातील काही विद्यार्थ्यांना निजाम सरकारने अटक करून तुरुंगातही टाकले होते. रामचंद्र राव नावाच्या एका विद्यार्थ्यांचा चंचलगुडा जेलमध्ये अनन्वित छळही करण्यात आला होता. या वंदेमातरम् चळवळीपासूनच प्रेरणा घेऊन यातील अनेक विद्यार्थ्यांनी पुढे चालून झालेल्या हैदराबाद मुक्तिलढ्यात आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. चळवळीत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्या काळच्या नागपूर विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू जी. टी. केदार यांनी नागपूर विद्यापीठात प्राधान्याने प्रवेश देण्याचे सहानुभूतीचे धोरण अवलंबिले होते. ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते रावसाहेब पटवर्धन हे त्या काळी अहमदनगर येथे असत. त्यांनीही हैदराबाद संस्थानातून येणाऱ्या अशा विद्यार्थ्यांना मदत केली. हळूहळू ती चळवळ संपूर्ण हैदराबाद संस्थानाच्या विद्यार्थीवर्गात पसरली. हैदराबादमधील विनायकराव कोरटकरांसारख्या अग्रगण्य लोकांनी बहुसंख्येने असलेल्या हिंदू विद्यार्थ्यांसाठी संस्थानात समांतर असे हिंदू विद्यापीठ स्थापन करण्याच्या तयारीने बनारस हिंदू विद्यापीठाकडे संलग्नतेची मागणी केली. अशा तऱ्हेने त्या काळी तरुण विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये फार व्यापक अशी जागृती वंदेमातरम् चळवळीने घडवून आणली आणि गोविंदभाई श्रॉफ हे त्या महत्त्वाच्या चळवळीचे शिल्पकार होते. नेताजी सुभाषचंद्र बोस आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या त्रिपुरा येथील अधिवेशनातही हैदराबाद संस्थानातील वंदे मातरम् चळवळीला पाठिंबा देण्याचा ठराव पास झाला. अर्थात राष्ट्रीय काँग्रेसने दिलेला पाठिंबा सशर्त असा होता. वंदे मातरम् या गीताची फक्त दोनच कडवी काँग्रेसला स्वीकारार्ह

होती. मुस्लिम लीगला तर अशा कोणत्याही गाण्यातील राष्ट्रीय भावना शंकास्पद वाटत असे. मात्र गोविंदभाईंनी सुरू केलेल्या वंदे मातरम् चळवळीनेच हैदराबाद संस्थानातील तरुण विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यासाठीच्या संघर्षात सामील होण्याची प्रेरणा दिली हे निर्विवाद सत्य आहे. खरेतर हैदराबाद संस्थानातील बहुसंख्य जनता मराठी, तेलगू आणि कानडी भाषा बोलणारी होती. तरीही त्या काळी शाळा-कॉलेजांमधून मातृभाषेत शिक्षण घेता येत नसे. शिक्षण उर्दूभाषेतूनच दिले जाई. एखादी खासगी मराठी शाळा कुणी काढली तर तिला सरकारी मदत मिळत नसे. उलट बंधनेच जास्त असत. उर्दू शाळांना किंवा मुसलमानांच्या संस्थांना मात्र भरपूर मदत मिळे. निजाम सरकारची सर्व धोरणे अशी विषमतापूर्ण असत. त्यामुळे नागरिकांनी स्वतःच्या हक्कासाठी केलेल्या चळवळींकडे पाहण्याचा सरकारचा दृष्टीकोनही अत्यंत संकुचित असा होता. वरचेवर बळावत चाललेल्या रझाकारांची धास्तीही निजामाला वाटत असे. हिंदूंना सवलती देण्याबद्दल उदार धोरण ठेवले तर इत्तेहादुल मुसलमीन संघटनेची गैरमर्जी ओढवेल अशी भीती सरकारातले अधिकारी व्यक्त करत. निजामाचे प्रधान सर अकबर हैदरी यांनी महात्मा गांधी यांना लिहिलेल्या एका पत्रात तसा उल्लेखही केला होता. निजाम सरकारच्या अशा जातीयवादी वृत्तीविरुद्धची कडवी प्रतिक्रिया म्हणून उभ्या राहिलेल्या वंदेमातरम् चळवळीने हैदराबाद स्वातंत्र्यलढ्याला बळ दिले आणि त्या विशिष्ट गीताची निवड केल्यामुळे हैदराबादमधील चळवळीचे नाते स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीशीही जोडले गेले.

महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन १९३८ मध्ये तेव्हाच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील लातूर या गावी झाले. या अधिवेशनात हैदराबादचे श्रीनिवास शर्मा हे अध्यक्ष होते. तर स्वामीजी हे कार्यवाह होते. या अधिवेशनात हैदराबादमध्ये एक जबाबदार शासन असावे ही मागणी केली गेली. अधिवेशनात होणारी सर्व भाषणे आणि ठराव यांवर निजाम सरकार कडक नजर ठेवून होते. लातूरमधील महसूल अधिकाऱ्यांमार्फत अधिवेशनात व्हावयाची सर्व भाषणे आधी तपासून घेतली जात. सरकारला आक्षेपार्ह वाटणारा राजकीय मजकूर त्यांतून गाळला जात असे आणि बाकीचा भाग बोलण्याची परवानगी दिली जाई. त्यामुळे परिषदेच्या कार्यकर्त्यांनी सर्व भाषणे मूळ संपूर्ण स्वरूपात मुद्रित करून प्रतिनिधींमध्ये आधीच वाटली होती. परिषदेत पास होणाऱ्या ठरावांवरही सरकारने निर्बंध लादले होते. विशेषतः दोन विशिष्ट ठरावांना सरकारी अधिकाऱ्यांनी आक्षेप घेतला होता. त्यातील पहिला ठराव

हा लोकांसाठी नागरी हक्क मागणारा होता. आणि दुसरा ठराव हा संस्थानात झालेल्या जातीय दंगलींच्या चौकशीची मागणी करणारा होता. पहिल्या ठरावात काही दुरुस्त्या करून तो मांडण्यास सरकारने परवानगी दिली. पण दुसरा ठराव मात्र पूर्णपणे नाकारला. सरकारच्या या अडवणुकीच्या धोरणामुळे परिषदेसाठी आलेले जहाल गटाचे प्रतिनिधी खवळले. त्यांनी सरकारच्या निषेधाच्या ठरावाची मागणी केली. मात्र मवाळांना तो नको होता. त्या मुद्यावर अधिवेशनात जहाल आणि मवाळांमध्ये प्रचंड वाद झाला. गोविंदभाईंनी दोन्ही गटांमध्ये मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. परंतु भूमिकेबाबत सहमती न झाल्याने एक समिती नेमून ते अधिवेशन तहकूब केले गेले. नेमलेल्या समितीत स्वामीजी, काशीनाथराव वैद्य आणि दिगंबरराव बिंदू या तिघांचा समावेश होता. निजाम सरकारच्या जाचक कायद्यांविरुद्ध असहकाराची आणि कायदेभंगाची अहिंसक चळवळ उभी करण्यासाठी एक रणनीती आखण्याची जबाबदारी त्या समितीवर सोपविण्यात आली. महाराष्ट्र परिषदेच्या त्या लातूर अधिवेशनातच स्वामी रामानंदतीर्थांनी शिक्षणाच्या कार्यातून बाहेर पडून स्वातंत्र्याच्या चळवळीचे नेतृत्व करावे अशी अपेक्षा व्यक्त केली गेली. तीनुसार स्वामीजींनीही पूर्ण वेळ चळवळीत उतरण्याचे ठरवले. कर्नाटक परिषद आणि आंध्र जनसंघम् या दोन प्रादेशिक संघटनांबद्दल निजाम सरकारने फारसा आक्षेप घेतला नव्हता. पण महाराष्ट्र परिषदेच्या सडेतोड धोरणांमुळे तिच्यावर मात्र 'जातीयवादाचा' आरोप ठेवत तिच्या कार्यक्रमांवर नियंत्रणे लादली होती. परिषदेच्या लातूर अधिवेशनाने तत्कालीन मराठवाड्याच्या समाजमनामध्ये एक नवी चेतना निर्माण केली. कोणत्याही परिस्थितीत आगेकूच करण्याचा निर्धार लोकांच्या मनात त्या अधिवेशनाने उत्पन्न केला. स्वातंत्र्य आणि लोकराज्य या दोन ध्येयांसाठी आत्मक्लेशाची आणि वाटेल तो त्याग करण्याची इच्छाशक्ती मराठवाड्यातील कार्यकर्त्यांना प्राप्त झाली, त्यात गोविंदभाईंचा वाटा सिंहाचा होता.

महाराष्ट्र परिषदेच्या लातूर अधिवेशनानंतर १९३८ मध्ये स्वामीजी हैदराबादला गेले आणि त्यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेचे प्रयत्न सुरू केले. जहाल आणि मवाळ अशा दोन्ही गटातील लोकांमध्ये सहमती साधणे आणि तीनही प्रदेशामधील अलग संघटनांचे एकीकरण करणे अशी अवघड आणि दुहेरी कामगिरी त्यांच्यावर येऊन पडली होती. २९ जून रोजी हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेची बैठक झाली. काँग्रेसच्या सभासदांची नोंदणी पार पडली. संघटनेची उद्दिष्टे

ठरवून त्यानुसार घटना तयार केली गेली. ९ सप्टेंबर १९३८ रोजी हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेच्या रीतसर घोषणा व्हावयाची होती. तथापि निजाम सरकारला त्या प्रयत्नांची कुणकुण लागताच ८ सप्टेंबर रोजी स्थापनेच्या एक दिवस आधीच तिच्यावर बंदी लादली गेली. त्या काळी हैदराबाद संस्थानात आर्यसमाज आणि हिंदू महासभा यांच्यावतीने नागरिकांमध्ये आंदोलनांना सुरुवात झालेली होती. १९३८ साली हैदराबाद येथे आर्यसमाजाने सरकारच्या धोरणांविरुद्ध एक मोठा सत्याग्रह घडवून आणला. त्याचप्रमाणे हिंदुमहासभेने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नेतृत्वाखाली पुण्यात एक 'भागानगर नि:शस्त्र प्रतिकार मंडळ' स्थापन करून त्या तर्फे हैदराबादेत अनेक सत्याग्रह आयोजित केले होते. पुण्याचे सेनापती बापट, यशवंतराव जोशी, नथूराम गोडसे ही मंडळी अशा सत्याग्रहांमध्ये सामील झाली होती. तथापि या संघटनांची उद्दिष्टे ही काही मुद्यांपुरतीच मर्यादित होती. हिंदु महासभा ही संस्थानातील हिंदू रयतेवर अत्याचार होऊ नयेत व तिला धार्मिक स्वातंत्र्य मिळावे म्हणून चळवळ करीत असे. तर आर्यसमाज लोकांच्या नागरी व सांस्कृतिक हक्कांसाठी लढा देत असे. सावरकर आणि इतर हिंदुत्ववादी नेत्यांनी आर्यसमाजाच्या चळवळीला पाठिंबा दिलेला असला तरी आर्यसमाजाचा लढा मात्र गांधींच्या तत्त्वानुसार चालत असे. संस्थानाच्या तेलंगण भागात जमीनदारांकडून होणाऱ्या गोरगरिबांच्या पिळवणुकीच्या विरोधातील आंदोलन सुरू होते. या सुमारास स्वामी रामानंदतीर्थ यांनी स्टेट काँग्रेसतर्फे संस्थानात सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. स्टेट काँग्रेसचे सत्याग्रह हे राजकीय स्वातंत्र्य आणि लोकशाही राज्यव्यवस्था अशा व्यापक उद्दिष्टांसाठी सुरू केलेले होते. राजकीय व नागरी स्वातंत्र्याची मागणी, राजकीय आंदोलने आणि जातीय कारवाया या दोहोंमध्ये फरक करण्याची गरज, आणि घटनात्मक सुधारणांचा आग्रह या तीन मुद्यांवर स्वामी रामानंदतीर्थ यांच्या नेतृत्वाखालील सत्याग्रह होत असत. २४ ऑक्टोबर १९३८ रोजी हैदराबाद शहरात गोविंदराव नानलांच्या नेतृत्वाखाली पहिला सत्याग्रह झाला. त्यानंतर दि. २७ रोजी दुसरा सत्याग्रह स्वामीजी, राघवेंद्रराव दिवाण, कॅप्टन व्यंकटेश जोशी, राजा रेड्डी आणि अप्पाराव यांनी पुतलीबावडी येथे केला. त्यानंतर दररोजच सत्याग्रह होऊ लागले. गोविंदभाई श्रॉफ यांनी सत्याग्रहांच्या या आंदोलनामध्ये तरुणांचा सहभाग मिळवण्यासाठी संपूर्ण मराठवाड्यात झंझावाती दौरा सुरू केला. अल्पावधीतच सर्व जिल्ह्यातून सत्याग्रहाला उस्फूर्त पाठिंबा मिळाला. मराठवाड्यातून हजारो तरुण सत्याग्रहाच्या चळवळीत सामील झाले.

त्याच काळात गोविंदभाईंनी आपली नोकरी सोडून दिली आणि एक पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून स्वत:ला चळवळीसाठी वाहून घेतले. दरम्यान निजाम सरकारने सत्याग्रहींना पकडून त्यांच्यावर खटले भरून त्यांना तुरुंगात डांबण्याचा सपाटा सुरू केला. इकडे औरंगाबादेतही गोविंदभाईंनी सत्याग्रहासाठी तरुणांना संघटित केले. अशा प्रकारचे अनेक सत्याग्रह मराठवाड्यात आणि हैदराबाद संस्थानात ठिकठिकाणी घडून आले. अनेक ठिकाणी सरकारविरोधी निदर्शने आणि पिकेटिंग झाले. निजाम सरकारने हे सत्याग्रह आणि निदर्शने दडपून टाकण्यासाठी बळाचा वापर सुरू केला. इत्तेहादुल मुसलमीनच्या स्वयंघोषित 'रझाकार' या जात्यंध मुसलमान स्वयंसेवकांचे हिंदू प्रजेवरील अत्याचारही वाढू लागले. नंतर १९३८ च्या डिसेंबरात महात्मा गांधींनी निजामाचे पंतप्रधान सर अकबर हैदरीशी बोलणी करून हैदराबाद संस्थानातले सत्याग्रह काही काळासाठी थांबवण्याचा आदेश स्टेट काँग्रेसला दिला. त्यानुसार स्टेट काँग्रेसने तो लढा तात्पुरता थांबवला.

✿

## तुरुंगवास, आणि चळवळीची वैचारिक पायाभरणी

दरम्यान १९३९ साली सप्टेंबरमध्ये दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली होती. जर्मनीच्या हिटलरने इंग्लंडविरुद्ध युद्ध सुरू केले होते. त्यामुळे त्या युद्धात इंग्रजांच्या विरोधात आपण जर्मनीला पाठिंबा द्यावा असा एक मतप्रवाह भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये निर्माण झाला. नेताजी सुभाषचंद्र बोस हे त्या मतप्रवाहाचे नेतृत्व करीत होते. परंतु महात्मा गांधी आणि इतरांचा त्यास विरोध होता. युद्धात कोणाचीही बाजू न घेता स्वातंत्र्यासाठी सुरू असलेला आपला लढा नेटाने पुढे न्यावा अशा मताचे इतर लोक होते. हैदराबाद संस्थानात स्टेट काँग्रेसचे सत्याग्रह स्थगित झाल्यानंतर चळवळीच्या कार्यकर्त्यांमध्ये शैथिल्य येण्याची भीती होती. तेव्हा महात्मा गांधींनी देशाला दिलेल्या खादी ग्रामोद्योगाचा आणि साक्षरताप्रसार, ग्रामसफाई, अस्पृश्यता निवारण अशा कार्यक्रमांचा पुरस्कार करण्याची गरज गोविंदभाईंना जाणवली. त्यांनी १९३९ च्या सप्टेंबर महिन्यात मनमाड येथे कार्यकर्त्यांची एक बैठक घेतली. कार्यकर्त्यांनी काही काळ स्वत:ला विधायक कार्यक्रमामध्ये गुंतवून घ्यावे असा त्यांचा आग्रह होता. गोविंदभाईंनी स्वत: औरंगाबादच्या सरस्वती भुवन शाळेच्या व्यवस्थापनात आणि इमारत उभारणीत पुढाकार घेतला. शहरातले एक प्रतिष्ठित व्यापारी पन्नालाल कोठावाला यांच्याकडून शाळेसाठी दहा एकर जमीन विकत घेण्यात आली. शहरालगत असलेली ही जमीन त्या काळात तीन हजार रुपयांस मिळाली. त्या जमिनीवर शाळेची अर्धवर्तुळाकार इमारत उभी करण्याची योजना आखली गेली. औरंगाबाद शहर, हैदराबाद शहर आणि गुजरात राज्य यातील अनेक दानशूर लोकांकडे जाऊन त्या इमारतीसाठी निधी मिळवण्यात आला. अल्पावधीतच ती इमारत दिमाखाने उभी राहिली. अशा रीतीने गोविंदभाईंनी

सरस्वती भुवन शिक्षणसंस्थेच्या कामात स्वत:ला काही काळ गुंतवून घेतले. सरस्वती भुवन शाळेप्रमाणेच त्यांनी औरंगाबाद शहरात काही व्यायामशाळाही सुरू करण्यात पुढाकार घेतला. तेथे शहरातील अनेक तरुण जमू लागले आणि मेहनत करू लागले. या सगळ्या तरुणांचे नेतृत्वही ओघाने गोविंदभाईंकडेच आले. गोविंदभाई हे शहरातील तरुणांचे आदराचे आणि प्रेरणेचे स्थान बनले. एव्हाना वंदे मातरम् चळवळीने चांगलाच जोर धरला होता. त्या चळवळीच्या प्रखर राष्ट्रीय स्वरूपामुळे गोविंदभाईंच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याला एक वेगळेच राजकीय परिमाण प्राप्त झाले.

हैदराबाद मुक्तिलढ्यातील मवाळ गटाचे लोक स्वामीजी आणि गोविंदभाईंवर ते साम्यवादी पक्षाचे असल्याचा आरोप करीत असत. वस्तुत: ते खरे नव्हते. त्यांच्या राजकीय भूमिका डाव्या विचारसरणीला अनुकूल जरी असल्या तरी त्यांना समतेबरोबरच लोकशाही स्वातंत्र्य अभिप्रेत होते. म्हणूनच मराठवाड्याच्या वैजापूर या कायम दुष्काळी तालुक्यात शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीच्या पाहणीचे काम गोविंदभाईंनी हाती घेतले. कोरडवाहू शेतीच्या सुधारणेसाठी कोणतीही सवलत किंवा मदत न देता भरमसाठ शेतसारा वसूल करण्याच्या निजाम सरकारच्या धोरणामुळे शेतकरी आणि शेतमजुरांच्या विपन्नावस्थेत जास्तच भर पडलेली आहे हे त्यांच्या ध्यानी आले. १९३९ मध्ये कॉ. हबीबबुद्दिन यांनी औरंगाबादेत एक मजूर परिषद भरवली. गोविंदभाईंनी तीत भाग घेतला. ती अत्यंत यशस्वी झाली. त्यावेळी डी. एल. पाठक हे ट्रेड युनियनचे नेते होते. त्या काळच्या 'बॉम्बे क्रॉनिकल' या दैनिकाचे संपादक सय्यद अब्दुल्ला देहलवी हे मजूर परिषदेचे उद्घाटक होते. त्या परिषदेत मराठवाड्यातील विणकर, शेतकरी आणि शेतमजुरांचे प्रश्न चर्चिले गेले. मराठवाड्यात नंतर सुरू झालेल्या अनेक कामगार चळवळींचा उगम त्या मजूर परिषदेतून झाला होता असे म्हणावयास हरकत नाही. गोविंदभाईंच्या अशा सरकारविरोधी चळवळींमुळे निजामी राज्यप्रशासन चिंतेत पडू लागले होते. शेवटी १९४० सालच्या डिसेंबर महिन्यात सरकारने गोविंदभाई, आ. कृ. वाघमारे आणि चळवळीत त्यांच्यासोबत अग्रभागी असणाऱ्या निवडक कार्यकर्त्यांना अटक केली आणि बावीस महिन्याच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावून त्यांना बिदर येथील जेलमध्ये रवाना केले. त्या नंतरचे महाराष्ट्र परिषदेचे तिसरे अधिवेशन हे गोविंदभाईंच्या अनुपस्थितीतच भरले. हे अधिवेशन १९४१ मध्ये नांदेड जिल्ह्यातील उमरी या गावी झाले. हैदराबादचे काशीनाथराव वैद्य हे त्याचे

अध्यक्ष होते. उमरी अधिवेशनाला हजारोंच्या संख्येने शेतकरी आणि शेतमजूर प्रथमच उपस्थित होते. प्रशासकीय सुधारणांसाठीचा आणि नागरी हक्कांसाठीचा एक प्रस्ताव त्या उमरी अधिवेशनात आला होता. पण अशा सुधारणांचा गरीब शेतकरी व कामकरीवर्गाला काहीच लाभ मिळत नसल्याने, आणि त्यामुळे विशिष्ट वर्गाच्या हितसंबंधांना वाव मिळत असल्याने तो प्रस्ताव बाजूला सारला गेला. त्याऐवजी संस्थानात एक जबाबदार व जबाबदेही सरकार प्रस्थापित व्हावे असा ठराव केला गेला. त्या शिवाय स्टेट काँग्रेसच्या तीनही प्रादेशिक संघटनांमध्ये जास्त व्यापक पातळीवरील सुसंवाद साधला जावा असेही मत उमरी अधिवेशनात व्यक्त झाले. गोविंदभाई तेव्हा अटकेत होते. पण त्यांच्या पत्नी डॉ. सत्याबेन ह्या मात्र उमरी अधिवेशनाला हजर होत्या. दरम्यानच्या काळात गोविंदभाईंना बिदरच्या तुरुंगात ठेवले होते. तुरुंगवासाच्या पावणेदोन वर्षांच्या काळात तेथे ते भरपूर वाचन करीत असत. तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या इतर सत्याग्रही कार्यकर्त्यांबरोबर दररोज चर्चेच्या फैरी झडत. चळवळीच्या निरनिराळ्या पैलूंबद्दल गोविंदभाई आणि आ. कृ. वाघमारे त्यांना मार्गदर्शन करत. काही काळाने बिदरच्या तुरुंगातून गोविंदभाईंना वरंगल येथे आणि नंतर औरंगाबादच्या हर्सूल जेलमध्ये हलवण्यात आले होते. १९४२ च्या ऑक्टोबर महिन्यात हर्सूलच्या तुरुंगातून त्यांची सुटका झाली. त्यावेळी त्यांच्या स्वागतासाठी लोकांचा प्रचंड जमाव गोळा झाला. त्यांना पाहण्यासाठी लोटलेल्या गर्दीने औरंगाबाद शहराचे रस्ते भरून गेले होते. शहरात झालेल्या त्यांच्या सत्काराला देखील प्रचंड गर्दी झाली. मराठवाड्यातील जनता आता गोविंदभाईंकडे निजामी राजवटीतून त्यांची मुक्तता करू शकणारा योद्धा म्हणून पाहू लागली होती. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर गोविंदभाई हैदराबाद येथे गेले. त्याच सुमारास स्वामी रामानंदतीर्थ, डॉ. मेलकोट इत्यादी नेत्यांना हैदराबादेतच अटक झाली होती. त्यामुळे गोविंदभाईंनी तूर्त तेथेच राहून संघटना बांधणीचे काम करण्याचे ठरविले. त्यांच्यासोबत भाऊसाहेब वैशंपायन हेही त्या कामात सामील झाले. एव्हाना हैदराबाद संस्थानात स्वातंत्र्याची मागणी जोर धरू लागली होती. परंतु हैदराबादमध्ये काही मंडळी वेगळ्या विचारांची होती. त्यांची मागणी 'आझाद हैदराबाद'ची होती. म्हणजे निजामाची राजवट खालसा करून हैदराबाद हे एक स्वतंत्र राष्ट्र व्हावे असे त्यांचे म्हणणे होते. परंतु स्वामीजी आणि गोविंदभाई यांचा त्याला ठाम विरोध होता. हैदराबाद संस्थान मुक्त करून ते होऊ घातलेल्या स्वतंत्र भारतात सामील केले जावे आणि तेथे लोकशाही पद्धतीची

राज्यव्यवस्था यावी असा त्यांचा आग्रह होता. १९४३ साली गोविंदभाई आणि आ. कृ. वाघमारेंच्या पुढाकाराने महाराष्ट्र परिषदेंचे चौथे अधिवेशन औरंगाबाद येथे भरविण्यात आले. हैदराबादचे बॅरिस्टर श्रीधर नाईक हे त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. आ. कृ. वाघमारे हे स्वागताध्यक्ष आणि गोविंदभाई कार्यवाह होते. त्या दोघांशी झालेल्या चर्चेनंतर अध्यक्ष श्रीधर नाईक यांनी त्यांच्या भाषणात गरीब जनतेसाठी व शेतकऱ्यांसाठी जीवनावश्यक वस्तूंचा स्वस्त दराने पुरवठा व तळागाळाच्या लोकांसाठी शिक्षणाची सोय ह्या मागण्या मांडल्या. त्यानंतर पूर्वी परतूरच्या अधिवेशनात तयार केल्या गेलेल्या घटनेस मान्यता देण्यात आली. मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटक प्रदेशात असलेल्या चळवळीच्या तीन परिषदांचे एकीकरण केले जावे हा महत्त्वाचा प्रस्ताव औरंगाबाद अधिवेशनात आला. त्यासाठी एक संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. या अधिवेशनातदेखील गोविंदभाईंनी राजकीय स्वातंत्र्याबद्दलचा स्वत:चा व्यापक दृष्टिकोन परिषदेसमोर मांडला. तीच भूमिका घेऊन गोविंदभाईंनी तरुणांच्या संघटनांमध्ये विचारजागरण सुरू केले. त्यामुळे गोविंदभाईंना असलेले तरुणांचे पाठबळ तर वाढत गेलेच, परंतु राजकीय वर्तुळांमधूनही त्यांच्या भूमिकेला समर्थन मिळत गेले. गोविंदभाईंच्या पाठपुराव्यामुळेच प्रादेशिक परिषदांच्या एकीकरणासाठी स्थापन झालेल्या संयुक्त समितीने २३ जून १९४४ रोजी तेलंगण, कर्नाटक आणि महाराष्ट्र परिषदांचे विलीनीकरण करून हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेचा प्रस्ताव दिला.

दरम्यान १९४४ ह्याच वर्षी रझाकारांच्या इत्तेहादुल मुसलमीन या संघटनेचे अध्यक्ष बहादुर यार जंग यांचे निधन झाले. त्यानंतर कासीम रझवी हा त्या संघटनेचा अध्यक्ष झाला. अलीगढ विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतलेला रझवी हा लातूरमध्ये वकिली करीत असे. तो बुद्धीने हुशार आणि वागण्यात आदबशीर होता. परंतु वृत्तीने जात्यंध आणि कडवा हिंदूद्वेष्टा होता. तो अत्यंत महत्वाकांक्षीही होता. दक्षिणेत मुसलमान हेच केवळ राज्य करू शकतात, तेथील प्रत्येक मुसलमान हा राजाच आहे अशी त्यांची धारणा होती. इत्तेहादच्या गुलबर्गा येथील संमेलनात त्याला 'सिद्दिक-ए-दख्खन' (दक्षिणेचा सच्चा दोस्त) हा किताब बहाल करण्यात आला होता. इत्तेहादचा अध्यक्ष झाल्यावर कासीम रझवी एवढा उन्मत्त झाला की तो निजामालाही जुमानत नव्हता. त्याने रझाकारांना एक बत्तीस कलमी कार्यक्रम दिला होता. त्याच्या हुकूमशाही प्रशासनाखाली रझाकारांनी मराठवाड्यात

गावोगावी लोकांवर अनन्वित अत्याचार सुरू केले. त्यांनी बिदर येथील बाजारपेठ जाळून टाकली. मराठवाड्यातील गोरटा हे गाव पूर्णपणे उध्वस्त केले. दोनशे लोकांना जाळून मारले. होन्नहोळी आणि बीबीनगर ही गावेही तशीच उध्वस्त केली. निजामाची पोलिसयंत्रणा देखील रझाकारांना संपूर्ण साथ देत असे. स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी रझाकारांना प्रतिकार सुरू केला. चळवळीतले अनेक कार्यकर्ते भूमिगत झाले. संस्थानाच्या सीमेवरील अनेक गावांमधून सशस्त्र स्वातंत्र्यसैनिकांचे कॅम्प स्थापन केले गेले. इंग्रजी राज्यात मिळेल तेथे शस्त्रे घेऊन ती कार्यकर्त्यांना पुरविण्यात येऊ लागली. शिवाय भूमिगत नसलेल्या कार्यकर्त्यांचे निषेधमोर्चे निघत राहिले आणि निदर्शनेही होत राहिली. अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मे झाले.

✿

# समतावादी धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा पुरस्कार

तिकडे ब्रिटिश अंमलाखाली असलेल्या भारतात स्वातंत्र्यप्राप्ती दृष्टिक्षेपात आलेली होती. भारतातील राजेमहाराजे यांच्या अधिपत्याखालील संस्थानेही स्वतंत्र भारताच्या मुख्य प्रवाहात सामील होणे आवश्यक होते. संस्थानांमधील रयतेच्या इच्छाआकांक्षा जाणून घेण्यासाठी १९४४ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने राजस्थानातील उदयपूर येथे एक संस्थानी जनपरिषद भरवली. हैदराबाद संस्थानाच्या प्रश्नात गांधीजी स्वत: लक्ष घालत असत. परंतु इतर संस्थानांची जबाबदारी त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरूंवर सोपवलेली होती. त्या परिषदेस मात्र एकटे नेहरू उपस्थित होते. हैदराबादमधील सत्ताधारी अल्पसंख्यांकांची धर्मांधता आणि नागरी हक्कांची पायमल्ली याबद्दल नेहरूंनी चिंता व्यक्त केली. मात्र त्यांनी डाव्या पक्षांच्या लोकांनाही संस्थानाच्या राजकारणातून वगळण्याची भूमिका घेतली तेव्हा बैठकीस आलेल्या गोविंदभाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना कडाडून विरोध केला.

त्यानंतर महाराष्ट्र परिषदेची आणखी दोन अधिवेशने झाली. पाचवे अधिवेशन १९४५ साली परभणी जिल्ह्यातील सेलू येथे झाले तर सहावे अधिवेशन १९४६ मध्ये पुन्हा लातूर येथेच झाले. १९४५ च्या सेलू अधिवेशनामध्ये दिगंबरराव बिंदू हे अध्यक्षस्थानी होते. त्या अधिवेशनात शेतसाऱ्याच्या दरात वाढ न करण्याची मागणी करण्यात आली. त्याचप्रमाणे शालेय शिक्षणासाठी मराठवाड्यात मराठी माध्यम सुरू करण्याची मागणीही केली गेली. लोकांशी संबंध येतो अशा काही जागांवर मराठी भाषिक अधिकाऱ्यांच्या नेमणुका कराव्यात अशीही मागणी सेलू अधिवेशनात करण्यात आली. सेलू अधिवेशनात उजव्या मवाळांनी इत्तेहादुल

मुसलमीन या रझाकारी संघटनेसोबत हातमिळवणी करून सरकार स्थापन करण्याचा प्रस्ताव दिला होता. गोविंदभाईंनी त्यास कडाडून विरोध करीत अशा आत्मघातकी निर्णयाचे काय परिणाम होतील याचे एक जोरदार विवेचन सादर केल्याने तो प्रस्ताव बारगळला. गोविंदभाईंचे सेलू अधिवेशनातील सदर भाषण हे त्याच्या प्रखर बुद्धिमत्तेचे, मुत्सद्दीपणाचे आणि सर्वसमावेशक दृष्टिकोणाचे द्योतकच होय. त्याच भाषणात गोविंदभाईंनी तीनही प्रादेशिक संघटनांमध्ये समन्वय राखण्यासाठी एक मध्यवर्ती संघटन उभे करण्याची गरज स्पष्ट केली. त्यातूनच पुढे 'ऑल हैदराबाद पीपल्स कॉन्फरन्स' चा जन्म झाला. या सेलू अधिवेशनात मराठवाड्यातील स्त्री-कार्यकर्त्यांची एक महिला परिषदही झाली. लातूरच्या कार्यकर्त्या सुशिलाबाई दिवाण ह्या तिच्या अध्यक्षा होत्या. स्वातंत्र्यलढ्याबाबत मराठवाड्यातील महिलांमध्येही मोठी जागृती दिसून येत होती. आशाताई वाघमारे, दगडाबाई शेळके, कावेरीबाई बोधनकर, गीताबाई चारठाणकर, प्रतिभाबाई वैशंपायन, शांताबाई कोटेचा, करुणाताई चौधरी, चंदाताई जरीवाला, ताराबाई परांजपे या व अशा अनेक महिला कार्यकर्त्या मुक्तिलढ्यात कार्यरत होत्या. त्यानंतर दुसऱ्यांदा लातूरला भरलेल्या सहाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष आ. कृ. वाघमारे हे होते. परतूरच्या पहिल्या अधिवेशनापासून महाराष्ट्र परिषदेमध्ये संपूर्ण राजकीय स्वातंत्र्याच्या व स्वतंत्र भारतात विलीनीकरणाच्या बाजूने असलेल्या विचारांचे प्राबल्य वाढत गेले. आणि आ. कृ. वाघमोरे व गोविंदभाई श्रॉफ हे त्या विचारांचे प्रवर्तक होते. स्वामी रामानंदतीर्थांना त्यांची भूमिका मान्य होती. लातूरच्या त्या अधिवेशनात अध्यक्ष आ. कृ. वाघमारे यांनी आझाद हैदराबाद ह्या मागणीला कडाडून विरोध करीत त्या संकल्पनेतील अनेक त्रुटी परिषदेसमोर मांडल्या. त्याचप्रमाणे संस्थानातील शेतकरी, हातमाग उद्योगातील कामगार व शोषित जाती-जमाती यांच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणली. याच अधिवेशनात संस्थानात कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी चालवलेल्या आंदोलनालाही पाठिंबा व्यक्त झाला. या लातूर अधिवेशनाची परिणती म्हणून लवकरच हैदराबाद संस्थानातील हातमाग कामगारांच्या आणि मजुरांच्या एका मोठ्या मोर्चाचे नेतृत्व गोविंदभाईंनी केले. मोर्चाच्या अखेरी गोविंदभाई, वैशंपायन प्रभृतींनी निजाम सरकारला एक निवेदनही सादर केले. त्या घटनेपासून निजाम सरकारने गोविंदभाईंवर एक कम्युनिस्ट पुढारी असा जो शिक्का मारला तो अखेरपर्यंत तसा राहिला. मात्र अशा कार्यक्रमांमुळे आणि समतावादी मित्रांमुळे एक गोष्ट साध्य झाली. महाराष्ट्र परिषदेच्या सर्व

अधिवेशनांमधून बळकट होत जाणाऱ्या हैदराबादच्या स्वातंत्र्यलढ्याला आर्थिक आणि सामाजिक समतेच्या विचारांचे एक महत्त्वपूर्ण अधिष्ठान प्राप्त झाले. सामान्य लोकांशी चळवळीची नाळ जोडली गेली. आणि स्वतंत्र भारतात विलीन होण्याच्या भूमिकेमुळे राजकीय स्वातंत्र्याच्या मागणीला प्रखर राष्ट्रवादी विचाराचे पाठबळ मिळाले. या विचारपरिवर्तनाचे श्रेय बहुतांशाने स्वामीजी, गोविंदभाई, आ. कृ. वाघमारे आणि व्ही. डी. देशपांडे यांच्याकडे जाते. महाराष्ट्र परिषदेच्या या साऱ्या अधिवेशनांमधून मराठवाड्यातील तरुणांमध्ये एक राजकीय जागृती घडून आली आणि त्यातूनच गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, राघवेंद्रराव दिवाण, भगवानराव गांजवे, माणिकचंद पहाडे, अनंत भालेराव, चंद्रगुप्त चौधरी यांसारखे निष्ठावान कार्यकर्ते तयार होत गेले. १९४६ सालच्या ३ जुलै रोजी निजाम सरकारने स्टेट काँग्रेसवर घातलेली बंदी उठवली. त्यानंतर संघटनेच्या हैदराबाद येथे झालेल्या स्टँन्डिंग कमिटीच्या बैठकीत स्वामीजींची निवड हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या अध्यक्षपदी केली गेली. स्वामीजींच्या सहवासाने आणि मार्गदर्शनाने गोविंदभाईंची वैचारिक जडणघडण तरुण वयातच मजबूत होत गेली. पहिल्यापासूनच मार्क्सवादाबद्दल गोविंदभाईंना आस्था होती. पण त्यासोबत महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसा आणि ग्रामस्वराज्याची संकल्पना यांचेही आकर्षण त्यांना वाटत होते. त्यांच्या अंगी या दोन्ही विचारधारांचे एक वैशिष्ट्यपूर्ण मिश्रण होते. पूर्वी 'फ्रीडम' नावाचे एक नियतकालिक मुंबईहून प्रकाशित होत असे. प्रल्हाद केशव अत्र्यांच्या प्रेसमध्ये छापल्या जाणाऱ्या त्या पत्रिकेचे संपादक गोविंदभाई होते. त्या काळच्या त्यांच्या लिखाणावरून आणि चळवळीत वेळोवेळी बजावलेल्या भूमिकेवरून असे दिसते की गांधीविचारांचाही पगडा गोविंदभाईंवर होता. कारण शांतीपूर्ण जोडणी-उभारणी आणि त्याग या मूल्यांवरील त्यांची श्रद्धा पदोपदी प्रकट होत असे. गोविंदभाईंची वृत्ती मुळातच चिकित्सकाची असल्याने कोणत्याही विचारप्रणालीचा किंवा 'इझम्' चा साक्षेपाने विचार करून स्वतःच्या बुद्धीला ग्राह्य वाटणाऱ्या गोष्टीच ते स्वीकारत. वस्तुवादाचा इतिहास म्हणजे उत्पादनाची साधने आणि त्यांचे नातेसंबंध यात क्रमशः होत गेलेल्या परिवर्तनांचाच आलेख होय हा धर्मानंद कोसंबी यांचा सिद्धांत त्यांना मान्य होता. मार्क्सवादाने केलेले उत्पादन आणि उपभोग यांच्या नातेसंबंधाचे विश्लेषण गोविंदभाईंना मार्मिक वाटे. माणसाच्या ऐहिक जीवनात साधने आणि मनुष्यबळ या दोन गोष्टी उत्पादनक्रियेला चालना देणाऱ्या असतात. ह्या दोन गोष्टीच माणसांच्या सामाजिक, राजकीय आणि बौद्धिक

प्रक्रियांना वळण देत जात असतात. त्यांचे स्वरूप बौद्धिकतेवर अवलंबून राहात नाही तर उलट त्यांच्या स्वरुपावरून माणसाच्या बौद्धिकतेची दिशा ठरते. वस्तुवादाच्या या वाटचालीत साधने व मनुष्यबळ या शक्तींचा उत्पादनातील प्रस्थापित हितसंबंधांशी संघर्ष केव्हा ना केव्हा अपरिहार्यच असतो हे कार्ल मार्क्सने केलेले विवेचन गोविंदभाईंना पटलेले होते. तसेच उपरोक्त आर्थिक हितसंबंधांव्यतिरिक्त समाजातील वर्गसंघर्ष, त्यांची राजकीय रुपे, प्रचलित तात्विक आणि न्यायिक सिद्धांत, विविध धार्मिक श्रद्धा आणि त्यांतून तयार होणारे दुराग्रह यांचे परिणाम समाजाच्या वस्तुवादी वाटचालीवर आणि पर्यायाने इतिहासावर होत असतात हे देखील त्यांना मान्य होते. मात्र आर्थिक हितसंबंधाविरुद्ध उपाय म्हणून कष्टकरी वर्गाची हुकूमशाही (dictatorship of the proletariat) हा मार्क्सवादाने दिलेला पर्याय गोविंदभाईंना स्वीकारार्ह वाटत नसे. समतावादी लोकशाही राज्यपद्धती हाच पर्याय योग्य आहे असे त्यांचे ठाम मत होते. स्वतः स्वामी रामानंदतीर्थ यांच्या विचारांवर मार्क्सवादाचा मोठा प्रभाव होता. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विषमता नष्ट करावयास हवी. दबलेल्या, वंचित आणि पीडित लोकांच्या शोषणाविरुद्ध सर्वंकष लढा उभारावयास हवा. परंतु त्यास आचारविचारांच्या स्वातंत्र्याची जोड देऊन समतावादी लोकशाही राज्यपद्धतीचा पुरस्कार केला पाहिजे असे स्वामीजी आणि गोविंदभाई या दोघांचे मत होते. गोविंदभाई आणि त्यांचे इतर तरुण सहकारी स्वामीजींसमवेत कित्येक तास चर्चा करीत असत. या सर्व विचारमंथनाचा परिणाम असा की साम्यवादी आणि समतावादी विचारसरणीचे अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने हैदराबाद मुक्तिलढ्यात सहभागी होत गेले. लढ्यातील कॉ. चंद्रगुप्त चौधरी, मनोहर सोनदे, आ. कृ. वाघमारे, बाबासाहेब परांजपे, भाऊसाहेब वैशंपायन, कॉ. हबीबबुद्दीन, सय्यद मुकादम, असदुल्ला खान, डी. एल. पाठक, माणिकचंद पहाडे अशा अनेक कार्यकर्त्यांना समतावादी विचारांची बैठक होती. गोविंदभाईंच्या पुढाकाराने औरंगाबाद आणि हैदराबाद येथे कामगार परिषदा घेण्यात आल्या. त्या परिषदांच्या आयोजनासाठी मुंबई कम्युनिस्ट नेते श्रीपाद अमृत डांगे यांचेही सहाय्य घेण्यात आले होते. तथापि, १९४२ मध्ये महात्मा गांधींनी 'चले जाव' चळवळीचा नारा दिला तेव्हा कम्युनिस्ट पक्षाने युद्धास पाठिंबा देणारी भूमिका घेतली. ती मात्र गोविंदभाईंना मान्य नव्हती. त्यावेळी त्यांची तुरुंगातून नुकतीच सुटका झालेली होती. गांधीजींच्या ब्रिटिशविरोधी 'भारत छोडो' आंदोलनात उडी घेऊन भारतीय

स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी व्हावयाचे गोविंदभाईंनी ठरवले. आणि ते त्यात सामील झाले. गांधीजींच्या तत्वज्ञानाचे आकर्षण त्यांना वाटत असे. या देशातल्या सर्वसामान्य, गरीब माणसाचे मन गांधीजीनी जाणून घेतले आहे असे त्यांना वाटे. सत्य आणि अहिंसा या गांधीजीनी स्वीकारलेल्या मूल्यांवर गोविंदभाईंची अपार श्रद्धा होती. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अहिंसेचे उपयोजन ज्या तऱ्हेने झाले त्याला इतिहासात तोड नाही असे ते मानत. न्याय्य हक्कांसाठी अहिंसात्मक सत्याग्रहाचे जे प्रभावी साधन आज साऱ्या जगात वापरले जाते, त्याचे मूळ गांधीवादात आहे. भोगविलासाला दूर ठेवून साधी राहणी अंगिकारणे, उपलब्ध साधनसामुग्रीतच आपल्या किमान गरजा भागवणारा स्वयंपूर्ण समाज बनवणे, आणि संपत्तीच्या अगर लाभांच्या समसमान वाटपावर भर देणे ही गांधीजींची त्रिसूत्री अवलंबणे महत्त्वाचे आहे असे ते आग्रहपूर्वक म्हणत असत. सार्वजनिक जीवनात आजूबाजूच्या प्रतिकूल विचारशक्तीमुळे नाउमेद होण्याची गरज नाही असे ते मानत. ते म्हणत की कोणत्याही समाजात मानवतेच्या आणि नव्या मूल्यांच्या विरोधात काम करणाऱ्या शक्ती असतातच. पण त्यामुळे आपण विचलित व्हायचे नसते. नदीच्या प्रवाहात पाण्याबरोबरच कचराही वाहत असतो. पण म्हणून नदीचा प्रवाह थांबतो का? विचारांच्या प्रवाहालाही तेच तत्त्व लागू आहे अशी त्यांची निष्ठा होती. गांधीजींच्या चळवळीतील सत्याग्रह हे हत्यार कोणत्याही सशस्त्र लढ्यापेक्षा जास्त प्रभावी आहे अशी त्यांची खात्री पटू लागली होती. त्यांच्या ग्रामस्वराज्याच्या कल्पनेने तर ते मोहितच झाले होते. त्यांनी स्वत: खादीचा अंगिकार केलाच पण खादीच्या प्रसारातही सिंहाचा वाटा उचलला. स्वातंत्र्योत्तर काळातही मराठवाडा खादी समितीचे आणि खादी ग्रामोद्योग चळवळीचे काम त्यांनी शेवटपर्यंत केले.

✿

# स्टेट काँग्रेसच्या ॲक्शन कमिटीची प्रस्थापना

स्टेट काँग्रेसच्या रचनेत डाव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्यांचा समावेश नसावा असे प्रयत्न संस्थानातील उजवे मवाळ कार्यकर्ते सातत्याने करीत होते. परंतु गोविंदभाईंनी त्या प्रयत्नांना विरोध केला. तसे करण्याने संघटनेला दुबळेपण येऊन चळवळीची हानी होईल हे त्यांनी स्पष्ट केले. निजामाच्या जुलमी शासनाविरुद्ध लढा देणे आणि हैदराबाद संस्थान मुक्त करून स्वतंत्र भारतात सामील करणे ही उद्दिष्टे सफल होण्यासाठी सर्व विचारसरणींच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येण्याची गरज आहे असे गोविंदभाईंचे म्हणणे होते. स्टेट काँग्रेसची स्थापना झाल्यावरही तीत उजव्या आणि डाव्या गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठे मतभेद कायम होते. १९४६ मध्ये जेव्हा काँग्रेसच्या स्टॅंडिंग कमिटीची पहिली बैठक हैदराबाद येथे झाली, तेव्हा स्टेट काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत स्वामी रामानंदतीर्थ यांच्या विरोधात मवाळ गटाचे बी. रामकृष्णराव यांनी निवडणूक लढवली होती. त्या वेळी स्वामीजींची अगदी थोड्याशाच बहुमताने अध्यक्षपदी निवड झाली. अशा स्थितीतही त्या बैठकीत निजाम सरकारविरुद्धचा 'जबाबदार शासन' या मागणीचा ठराव गोविंदभाईंनी मांडला आणि पाठपुरावा करून स्टेट काँग्रेसकडून पास करून घेतला. त्या ठरावात गोविंदभाई आणि त्यांच्या मराठवाड्यातील सहकाऱ्यांच्या मनातील सामाजिक व आर्थिक सुधारणाचा कार्यक्रम प्रतिबिंबित झालेला होता. हैदराबाद संस्थानातील सर्वसामान्य जनतेच्या आशाआकांक्षाचे प्रतिबिंबही त्यात होते. तेलंगण भागात कम्युनिस्टांनी सुरू ठेवलेल्या जमीनदारांविरुद्धच्या आंदोलनाला स्टेट काँग्रेसमधील डाव्या कार्यकर्त्यांनी पाठिंबा दिलेला होता. त्याचप्रमाणे निजाम सरकारशी कोणतीही तडजोड न स्वीकारता बिनशर्त

सामिलीकरण हवे अशी भूमिका स्वामीजी आणि गोविंदभाईंनी घेतली होती. उजव्या मवाळांना त्या गोष्टी मान्य नव्हत्या. शिवाय स्टेट काँग्रेसच्या डाव्या विचारांच्या कार्यकर्त्यांचे वर्चस्वही त्यांना नको होते. म्हणून त्यांचा विरोध होता. अनेक वेळा उजव्यांनी घेतलेल्या भूमिकांमध्ये सुसंगतीही नसे. कधी कधी ते गोविंदभाई आणि त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांची मवाळ म्हणून निर्भत्सना करत तर कधी त्यांच्यावर जहाल असल्याची टीका करत. जानेवारी १९४७ मध्ये स्टँन्डिंग कमिटीच्या बिदर येथे झालेल्या दुसऱ्या बैठकीत हैदराबादच्या काशीनाथराव वैद्यांच्या नेतृत्वाखाली उजव्या गटाच्या कार्यकर्त्यांनी स्वामीजींच्या धोरणांना जोरदार विरोध केला. त्यांनी स्वामीजींविरुद्ध एक ठरावही पास केला. मराठवाड्यातील कार्यकर्त्यांना मात्र उजव्या मवाळांची भूमिका निजामधार्जिणी वाटत होती. त्यामुळे मवाळांच्या विरोधाच्या निषेधार्थ बाबासाहेब परांजपे, दिगंबरराव बिंदू, भाऊसाहेब वैशंपायन आणि कर्नाटकातील वि. पां. देऊळगांवकर यांनी स्टेट काँग्रेसच्या कार्यकारी समितीचे राजीनामे सादर केले. स्वामीजींनी *'स्टँन्डिंग कमिटी सदस्यांसाठी संघटनाबांधणीचे निवेदन'* या नावाची एक इंग्रजी पुस्तिका सर्व उपस्थितांना दिली. त्या कसोटीच्या क्षणी जर संघटनेत फूट पडली तर हैदराबादच्या स्वातंत्र्याच्या चळवळीवर तिचे अनिष्ट परिणाम होतील अशी चिंता त्यांना वाटत होती. गोविंदभाईंनाही फूट पडू नये असे वाटत होते. मात्र उजव्या मवाळांची सामोपचाराची तयारी नव्हती. त्यामुळे संघटनेत फूट पडू नये म्हणून स्वामीजींनी ती बैठक तहकूब केली. स्टँन्डिंग कमिटीची ती बैठक तहकूब झाल्यावर लगेच मवाळांनी एक समांतर बैठक हैदराबाद येथे घेतली. त्या वेळी मात्र मराठवाड्यातील बाबासाहेब परांजपे, राघवेंद्रराव दिवाण आणि रामचंद्रराव नांदापूरकर या कार्यकर्त्यांनी उजव्या मवाळांच्या भूमिकेवर सडेतोड टीका करणारे एक पत्रक प्रसिद्ध केले. उजव्यांची भूमिका कशी निजामधार्जिणी, सरकारवादी आणि लोकविरोधी आहे याचे व्यवस्थित विश्लेषण त्या पत्रकात केलेले होते. बिदरच्या त्या वादळी बैठकीनंतर स्टेट काँग्रेसमध्ये उजव्या आणि डाव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्यांचे मतभेद विकोपाला पोहोचले हे पाहिल्यानंतर स्वामीजींनी स्टेट काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि सतरा सदस्य असलेली कार्यकारिणीही बरखास्त केली. स्वामीजींचा हा निर्णय सर्वांसाठीच धक्कादायक असा होता. त्याचे दूरगामी परिणाम चळवळीवर होतील हे सूज्ञानी ओळखले. मग परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तेलंगणातील कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला आणि

स्वामीजींचे मन वळवले. नव्याने एक बैठक घेऊन स्वामीजी आणि त्याचे कार्यकारिणी सदस्य यांनी पूर्ववत आपापल्या पदावर काम सुरू ठेवावे असा ठराव बहुमताने पास करण्यात आला. त्यानंतर स्वामीजींनी आपला राजीनामा परत घेतला.

१९४७ च्या जून महिन्यात इंग्रजांनी भारतातील राजवट संपवून सत्तांतराची प्रक्रिया सुरू करीत असल्याचे घोषित केले. देशातील ब्रिटिश सत्ता लवकरच काढता पाय घेणार हे ध्यानी येताच हैदराबादचा निजाम सावध झाला. भारत स्वतंत्र होताच हैदराबाद संस्थान हे निजामाच्या अधिपत्याखालील सार्वभौम राष्ट्र गणले जाईल अशी घोषणा त्याने २६ आणि २७ जून १९४७ रोजी काढलेल्या दोन फर्मानांद्वारे केली. हैदराबाद स्टेट काँग्रेस, आर्यसमाज, तेलंगणमधील कम्युनिस्ट पक्ष इत्यादी संघटनांचा विरोध बळावू नये म्हणून निजामाने इत्तेहादुल मुसलमीनच्या रझाकारांना उघडपणे सहाय्य सुरू केले. संस्थानात जात्यंध रझाकार जास्तच आक्रमक झाले. जागोजागी सुरू असलेले त्यांचे अत्याचार आणखी वाढले. १६ जून १९४७ पासून स्टेट काँग्रेसने हैदराबादमध्ये तीन दिवसांचे एक अधिवेशन भरवले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर हैदराबाद संस्थान हे भारतीय संघराज्यात सामील केले जावे असा महत्त्वाचा ठराव त्या अधिवेशनात केला गेला. ही मागणी पूर्ण झाली नाही तर सर्वंकष लढा देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. संस्थानातील जमीनदारी आणि जहागिरी नष्ट करण्याबाबतही एक ठराव त्या अधिवेशनात झाला. स्वामी रामानंदतीर्थांनी आपल्या भाषणातून एक अतिशय महत्त्वाचा कृतिकार्यक्रम चळवळीला दिला. त्यानुसार काही कार्यकर्त्यांनी निजाम सरकारविरुद्धचे सत्याग्रहाचे आंदोलन आणखी धारदार करून अटक करवून घ्यावी असे ठरले. मात्र काहींनी भूमिगत व्हावे आणि त्यांना वेळोवेळी दिले जाणारे कार्यक्रम पार पाडावेत अशीही एक योजना झाली. ते अधिवेशन समाप्त होताच स्टेट काँग्रेसच्या कार्यकारिणीचे सर्व सदस्य रातोरात संस्थानाच्या सीमेपलिकडे असलेल्या सोलापूर शहरात दाखल झाले. तेथे त्यांची बैठक तीन दिवस सतत चालली. गोविंदभाईंनी त्या बैठकीत ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या वाटून दिल्या. हैदराबादच्या स्वातंत्र्यासाठी द्यावयाच्या निर्णायक लढ्याचा तपशील त्या बैठकीत ठरविण्यात आला. हैदराबाद शहर, मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटक या सर्व ठिकाणी लढ्याचे सूत्रसंचालन करण्यासाठी विविक्षित व्यक्तींच्या नेमणुका करण्यात आल्या. लढ्याचे संचालन करण्यासाठी एक कृतिसमिती (ॲक्शन कमिटी) स्थापन केली

गेली. दिगंबरराव बिंदू हे त्या समितीचे अध्यक्ष होते तर मराठवाडा, कर्नाटक आणि तेलंगण मधील चळवळींचे प्रमुख नेते अनुक्रमे गोविंदभाई, प्राणेशाचार्य आणि जमलापूर केशवराव हे होते. लढ्याबाबतचे सर्व निर्णय घेण्याचे सर्व अधिकार त्या समितीला प्रदान करण्यात आले होते. कृतिसमितीचे मुख्य कार्यालय सुरुवातीला मुंबईत होते. पण पुढे ते मद्रास येथे हलविण्यात आले. मराठवाड्यातील लढ्याचे सूत्रसंचालन करण्याची जबाबदारी गोविंदभाईंनी स्वीकारली. कृतिसमितीने लढ्याचा एक कार्यक्रम तयार केला. अध्यक्ष दिगंबरराव बिन्दूंसह गोविंदभाईंनी दिल्लीला जाऊन महात्मा गांधींची भेट घेतली. निजामाचे सैन्य, पोलिसदल आणि इत्तेहादुल मुसलमीनचे रझाकार यांनी जनतेवर चालविलेल्या अत्याचाराची आणि रक्तपाताची संपूर्ण माहिती त्यांनी गांधीजींना दिली. ते अत्याचार रोकण्यासाठी सशस्त्र प्रतिकाराची गरज असून त्या निर्णायक काळात सत्याग्रह्यांना सशस्त्र लढ्याची परवानगी द्यावी अशी विनंती त्यांनी गांधीजींना केली. गांधीजी विचारात पडले. परंतु त्यांनी काहीच निर्णय न देता गोविंदभाई आणि बिन्दूंना पंडित नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्याशी चर्चा करण्यास सांगितले. त्यांच्याशी झालेल्या चर्चेतही निर्णय होऊ शकला नाही. शेवटी गोविंदभाई आणि दिगंबरराव बिन्दू हे परत आले. कृतिसमितीने ठरलेला कार्यक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आणि त्यानुसार कारवाई सुरू केली.

१९४७ मध्ये संस्थानाबाहेर सीमेवर अनेक ठिकाणी कृतिसमितीची कार्यालये उघडली गेली. संस्थानात निजामाच्या सरकारी यंत्रणेची प्रशासनव्यवस्था खिळखिळी करण्याचे काम हाती घेण्यात आले. त्यासाठी सीमेपलिकडील भारताच्या अनेक स्वातंत्र्यप्रेमी व्यक्ती आणि संघटनांची मदत मागितली गेली. हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या ह्या लढ्याला ध्येयवाद आणि राष्ट्रनिष्ठेचा पाया होता. परंतु हा लढा सोपा नव्हता. दोन लाखांहून अधिक असे जात्यंध, हिंस्त्र रझाकार आणि चाळीस-पन्नास हजारांच्या संख्येने असलेली निजामी पोलिस व फौज यंत्रणा यांविरुद्धचा हा अवघड लढा होता. तो जसा जसा प्रखर होत गेला तसे त्याचे स्वरूपही बदलत गेले. मराठवाड्याच्या नांदेड, परभणी, औरंगाबाद आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांमधून कार्यकर्त्यांनी मोठ्या सभा आयोजित केल्या. त्याबद्दल अनेकांनी अटकही करवून घेतली. जागोजागी मोर्चे आणि प्रभातफेऱ्या निघू लागल्या. ७ ऑगस्ट १९४७ रोजी स्वामीजी आणि गोविंदभाईंनी भारतीय संघराज्यात सामील होण्याच्या मागणीची एक मोहीमच सुरू केली. औरंगाबाद,

बीड, उमरगा, लाडसावंगी अशा निरनिराळ्या ठिकाणी ती मोहिम जोमदारपणे चालली. इत्तेहादुल मुसलमीनने १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस 'आझाद हैदराबाद दिन' म्हणून पाळावयाचा फतवा काढला. परंतु हैदराबाद संस्थानातील कार्यकर्त्यांनी तो भारतीय स्वातंत्र्याचा दिवस मोठ्या उत्साहात पाळला. हैदराबादेत सुमारे आठ हजार स्वातंत्र्यवादी विद्यार्थ्यांचा मोर्चा काढण्यात आला. त्या साऱ्या विद्यार्थ्यांनी मोर्चाने जाऊन हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठात भारताचा तिरंगी झेंडा फडकावला. अनेक विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली. खवळलेल्या रझाकारांनी अनेकांवर अत्याचार केले. हैदराबादेत स्वामी रामानंदतीर्थ, डॉ. मेलकोट आणि कृष्णाचारी जोशी यांनी तिरंगी झेंडा हाती घेऊन भाषणे केली. सरकारने त्यांनाही अटक करून चंचलगुडा येथील जेलमध्ये रवाना केले. निजाम सरकारने त्या दिवशी संपूर्ण मराठवाड्यातून एकूण ३६२१ लोकांना अटक करून तुरुंगात डांबले होते. त्या वेळी रझाकारांचे अत्याचारही प्रचंड वाढले. जागोजागी त्यांनी जाळपोळ, लुटालूट आणि हत्यांचे सत्र सुरू ठेवले. १५ ऑगस्ट १९४७ रोजीच उमरगा येथे झालेल्या एका सत्याग्रहाच्या प्रसंगी श्रीनिवासराव आणि गोपाळराव मुगळीकर या दोघा कार्यकर्त्या बंधूची रझाकारांनी हत्या केली. रझाकार आणि निजाम सरकार यांच्याविरुद्ध इतके दिवस अहिंसक अशा लोकशाही मार्गाने लढा चालवला जात होता. परंतु शेवटच्या टप्प्यामध्ये जेव्हा रझाकार आणि निजामी सरकार यांच्या अत्याचारांना ऊत आला तेव्हा स्टेट काँग्रसने सशस्त्र लढ्याचा पुरस्कार केला. संस्थानाच्या सीमेवर अनेक जागी सशस्त्र कॅम्प उभारले गेले. कृतिसमितीने कॅम्पवरील कार्यकर्त्यांना दिलेल्या कार्यक्रमांमध्ये जंगल सत्याग्रह चालवणे, निजामाच्या पोलिस ठाण्यावर हल्ले करणे, रझाकारांच्या केंद्रावर हल्ले करणे, निजामी सत्तेच्या ग्रामीण कार्यालयांवर हल्ले करणे, गावोगावच्या पाटील-कुळकर्णी-तलाठी अशा वतनदाराचे राजीनामे घेणे, सरकारला लेव्ही देणे बंद करणे, करोडगिरीचे नाके बंद पाडणे आणि सरकारी गोदामांवर हल्ले करून ती ताब्यात घेणे आदि गोष्टींचा समावेश होता. लढ्यासाठी संस्थानाबाहेर महाराष्ट्रात मनमाड, कर्नाटकात गदग आणि आंध्रात विजयवाडा येथे कार्यालये स्थापन केली गेली. मनमाड कार्यालयाची व्यवस्था श्रीनिवासराव बोरीकर आणि आ. कृ. वाघमारे हे दोघे पाहत असत. शिवाय भूमिगत लढ्याची जिल्हावार केंद्रे उघडली गेली. उस्मानाबाद जिल्ह्याचे केंद्र सोलापूर येथे, औरंगाबादचे मनमाड येथे, बीडचे वाशिम येथे, आणि नांदेड-परभणी जिल्ह्याचे केंद्र उमरखेड येथे होते. या जिल्हा

केंद्रांना जोडून अनेक सशस्त्र कॅम्प चालवले जात होते. औरंगाबाद जिल्ह्याचे सशस्त्र कॅम्प देऊळगाव राजा, शेंदुर्णी, कोलता पिंपळगाव, टाकळी, लोहगड, पिंपळगाव, टोका, मनमाड, येवला इत्यादी ठिकाणी होते. बीड जिल्ह्याचे कॅम्प खेर्डा, पाथर्डी, डोंगरकिन्ही, बालम टाकळी, मिरजगांव, खिळद, कडा आणि आगळगाव या सरहद्दीवरील गावात होते. नांदेड-परभणीसाठी उमरखेड, लोणी, ब्याड, धानोरा आणि शेंबाळपिंपरी या ठिकाणी कॅम्प होते. आणि उस्मानाबाद जिल्ह्यासाठी गौडगांव, चिंचोली, वाघोली, आंबेजवळगा, कौडगांव, आणि मुस्ती येथे सशस्त्र कॅम्प उघडण्यात आले. त्या साऱ्या कॅम्पांवरील स्वातंत्र्यसैनिकांनी जुलै १९४७ ते ऑगस्ट १९४८ या काळात निजामाच्या करोडगिरी नाक्यावर १०६ हल्ले, पोलिस ठाण्यावर ५९ हल्ले, ग्रामीण सत्ता ४८ केंद्रांवर हल्ले केले, तर रझाकाराच्या ठाण्यांवर ६२ हल्ले केले गेले. शिवाय वीस-बावीस ठिकाणी जंगल सत्याग्रह घडले. नांदेड जिल्ह्यात टेळकी, कंधार, बारड, डोरली, कांडली या गावांतून तीव्र संघर्ष उडाले. संस्थानाच्या सरहद्दीपलिकडील अनेक गावांमध्ये जाऊन शस्त्रास्त्रे मिळवली जात आणि ती कॅम्पांवरील स्वातंत्र्यसैनिकांना दिली जात. कोलता पिंपळगाव, टाकळी, अपसिंगा, बर्दापूर, इस्लापूर, डिघोळ, हातगांव, आजेगांव, नकोडी, दांडेगाव या गावांमध्ये स्वातंत्र्यसैनिकांनी पोलिसठाणी आणि रझाकारांची केंद्रे यांवर प्रखर हल्ले केले. मनमाड कॅम्पमध्ये पुण्याचे शिरुभाऊ लिमये, उत्तमराव पाटील ही मंडळी कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देत असत. पुण्याचे प्रकाशक रा. ज. देशमुख यांच्या सहकार्याने बाबासाहेब परांजपे यांनी शस्त्रास्त्रे निर्माण करण्याचे एक केंद्र उभे केले होते. लातूरचे राघवेंद्रराव दिवाण हे संस्थानाच्या सरहद्दीपलिकडून बंदुका, स्टेन गन्स आणि फ्लेम थ्रोअर सारखी हत्यारे मिळवून आणत. बळवंत नागणे, व्यासाचार्य संदीकर हे त्यांना मदत करीत. हे स्वातंत्र्यसैनिक गावठी बॉम्ब आणि हॅन्ड ग्रेनेडही तयार करीत असत. आंदोलकांना शस्त्रास्त्रे मिळवून देण्यासाठी खुद्द स्वामीजीही आसपासच्या राज्यांमधून दौरे करीत असत. मध्यप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री रविशंकर शुक्ल आणि गृहमंत्री द्वारकाप्रसाद मिश्र यांनी शस्त्रास्त्र पुरवठा करणे आणि कार्यकर्त्यांना अर्धसैनिकी प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे याबाबत मोलाचे सहकार्य केले होते. डिसेंबर १९४७ मध्ये हैदराबादच्या स्वातंत्र्यसैनिकांनी एक प्रक्षेपण यंत्रणा मिळवून मुंबई येथे एक 'जनता रेडिओ' केंद्रही सुरू केले. भाऊसाहेब वैशंपायन आणि पद्माकर लाटकर हे त्यांचे काम पाहत. दररोज सायंकाळी साडेसात ते साडेआठ

या वेळेत त्याचे प्रक्षेपण चाले. हे रेडिओ केंद्र तब्बल सहा महिने चालवले गेले. ३० जानेवारी १९४८ रोजी निजाम सरकारला जबरदस्त हादरा देण्यासाठी स्टेट काँग्रेसच्या आंदोलकांनी मराठवाड्यातील उमरी येथे असलेली निजामाची स्टेट बँक लुटली. त्या चित्तथरारक क्रांतिकारी धाडसानंतर लुटलेली सर्व रक्कम पुसद येथे आणली गेली. तेथील एका न्यायाधीशाच्या उपस्थितीत रकमेतील पै न् पै नीट मोजली गेली. नंतर आंदोलकांनी पुणे गाठले. तेथे आचार्य शंकरराव देवांच्या सांगण्यावरून मे. एस. ए. जोशी या लेखातपासनीसाने ती रक्कम पुन्हा मोजून तसे प्रमाणपत्र दिले. मग आंदोलकांनी ती रक्कम सोलापूर येथे आणली आणि ती चळवळीच्या विनियोगासाठी ॲक्शन कमिटीचे गोविंदभाई श्रॉफ आणि इतर सदस्य यांच्या हवाली केली. त्या काळच्या अत्यंत स्वच्छ चारित्र्याच्या सत्याग्रह्यांच्या प्रामाणिक व पारदर्शक वृत्तीचे उत्तम उदाहरण म्हणजे ते उमरी बँक हल्ला प्रकरण होय.

✿

## ऑपरेशन पोलो उर्फ 'पोलिस ॲक्शन'

दरम्यान भारताचे स्वातंत्र्य जेव्हा दृष्टिक्षेपात आले तेव्हा जुलै १९४७ मध्ये निजामाने हैदराबादचे तत्कालीन पंतप्रधान नवाब छत्तारी यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ दिल्लीला पाठवले. त्या शिष्टमंडळात निजामाचा इंग्रज सल्लागार सर वॉल्टर मॉन्कटन, सर सुलतान अहमद आणि नवाब अली यावर जंग यांचा समावेश होता. त्या शिष्टमंडळाने सरदार पटेलांशी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या वाटाघाटी अनिर्णित राहिल्या. मग नवाब छत्तारींनी सरदारांकडून दोन महिन्यांची मुदत मागून घेतली आणि त्यांचे शिष्टमंडळ हैदराबादेस परतले. १५ ऑगस्ट १९४७ पासून हैदराबाद हे एक स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र असेल हे निजामाने घोषित केलेले होतेच, पण शिवाय ब्रिटिश राष्ट्रकुलात हैदराबादचा समावेश व्हावा असाही त्याचा प्रयत्न होता. पण इंग्रजांनी त्यास दाद दिली नाही. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्यं मिळाले. त्याच वर्षी ऑक्टोबरात नवाब छत्तारी पुन्हा दिल्लीत गेले. या खेपेस वेळ काढण्याच्या उद्देशाने बोलणी करून त्यांनी हैदराबाद संस्थानाच्या विलीनीकरणास तातुरती स्थगिती देण्याबाबतच्या कराराचा एक मसुदा तयार करवला. १८ ऑक्टोबर रोजी त्या मसुद्यास निजामाची मान्यता घेण्यासाठी छत्तारी हैदराबादेस परतले. परंतु त्या करारावर निजामाची स्वाक्षरी घेऊन परत दिल्लीला जाणे त्यांना शक्य झाले नाही. त्या वेळी हैदराबादमध्ये इत्तेहादुल मुसलमीनचा नेता कासीम रझवी यांचे प्राबल्य प्रचंड वाढलेले होते. निजामाने सरदार पटेलांशी अगर स्वतंत्र भारताच्या सरकारशी कोणत्याही वाटाघाटी करण्याची गरज नाही अशी भूमिका त्याने घेतली. त्याच्या कडव्या भूमिकेपुढे निजाम हतबल झाला. २८ ऑक्टोबर १९४७ रोजी पंचवीस

हजार सशस्त्र रझाकारांसह कासीम रझवीने हैदराबादेत पंतप्रधान छत्तारी आणि त्याचे इंग्रज सल्लागार सर मॉन्कट्न यांच्या घराभोवती वेढा दिला. अखेर नवाब छत्तारींनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला आणि त्याबरोबरच तो स्थगिती करारही तिथेच थांबला.

त्यानंतर निजामाने कासीम रझवीच्या सल्ल्यानुसार मीर लायक अली यांची पंतप्रधानपदी नेमणूक केली. लायक अलींनी स्वत:चे नवे मंत्रीमंडळ जाहीर केले. नोव्हेंबर १९४७ मध्ये मीर लायक अली हेही एक शिष्टमंडळ घेऊन दिल्लीला गेले. त्यांनी छत्तीरींनी केलेल्या स्थगिती कराराच्या मसुद्यात बदल करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु गृहमंत्री सरदार पटेल यांनी पूर्वीच्या मसुद्यात कोणताही बदल स्वीकारण्याचे खंबीरपणे नाकारले. त्यामुळे तो करार जसाच्या तसा स्वीकारणे निजाम सरकारला भाग पडले. त्या कराराचाच एक भाग म्हणून स्वतंत्र भारताच्या सरकारचे प्रतिनिधी म्हणून के. एम. मुन्शी हे हैदराबादेत दाखल झाले. निजामाशी केलेल्या तातुरत्या स्थगितीच्या करारामुळे भारतीय संघराज्य आणि हैदराबाद संस्थान यामध्ये एक परस्पर सहकार्याचे वातावरण तयार होईल आणि ते भविष्यात त्या संस्थानाचे विलीनीकरण घडवून आणण्यास पोषक ठरेल अशी अशा सर्वांना वाटत होती. परंतु ती फोल ठरली. त्या करारातील तरतुदींचा भंग करणे, त्या स्वत:च्या फायद्यासाठी वापरणे असे उद्योग मीर लायक अलीच्या सरकारने सुरू केले. या दरम्यान कासीम रझवीने रझाकारांची संख्या वाढवली. आणि गावोगावी अत्याचाराचे एक नवे पर्व सुरू केले. केवळ राजकीय विरोधकांच्याच नव्हे तर इतरही गोरगरीबांच्या हत्या घडवणे, दंगली करणे, लूटमार करणे, गैरमुस्लिम जनतेत दहशत माजवणे अशा गोष्टी कासीम रझवीच्या रझाकारांनी सुरू केल्या. संस्थानातील नागरिक आणि स्वातंत्र्यसैनिक यांच्याशिवाय भारतीय सीमेवरील खेडी आणि चौक्या यांवरही रझाकारांनी हल्ले सुरू केले. सगळीकडे त्यांनी प्रचंड विध्वंस आणि रक्तपात माजवला. रझाकारांच्या या कारवायांना निजामाची मूक संमती होती. दरम्यान निजामाच्या लायक अली सरकारने फौजेची जमवाजमव सुरू केली होती. तस्करांमार्फत शस्त्रास्त्रे आयात करणे, काही शस्त्रे तयार करणे, सैन्यात कडव्या धर्मांध मुस्लिमांची भरती करणे आणि सीमेपलिकडील भारतीय सैन्याच्या तळावर चोरटे हल्ले करणे असे प्रकार निजामाच्या सैन्याने सुरू केले. रझाकार आणि निजामाच्या सेनेने नव्या जोमाने सुरू केलेल्या हल्ल्यांना जोरदार प्रतिकार मराठवाड्यातील सशस्त्र कॅम्पांवरून होऊ लागला. गोविंदभाई श्रॉफ

यांच्याकडे जरी मराठवाड्यातील कॅम्पांची जबाबदारी होती तरी ॲक्शन कमिटीचे सदस्य या नात्याने त्यांना संपूर्ण संस्थानातील लढ्याच्या सुसूत्रीकरणाची जबाबदारीही पार पाडावी लागत असे. त्यांच्या मुत्सद्दी व्यक्तिमत्वामुळे सर्वच कार्यकर्ते मार्गदर्शनाच्या अपेक्षेने त्यांच्याकडे पाहत असत. सरहद्दीवरील निरनिराळ्या केंद्रांमध्ये कार्यकर्त्यांची नीट सोय लावणे, आणि त्यांच्यामध्ये कामाचे वाटप करणे या गोष्टी ते हाताळत. सत्याग्रह्यांच्या उत्साहाला आणि शक्तीला नीट वळण लावणे हे अत्यंत महत्त्वाचे होते. सशस्त्र लढ्यामध्ये स्टेट काँग्रेसच्या तत्त्वांना कुठेही धक्का पोहोचणार नाही याची काळजी गोविंदभाई घेत. संस्थानाबाहेरील लोकशाहीवादी शक्तीची मदत मिळवणे, कार्यकर्त्यांना शस्त्रास्त्रे मिळवून देणे, हे ते करत होते. निजाम सरकार आणि हैदराबाद मुक्तिलढ्यातील स्वातंत्र्यसैनिक यांचा संघर्ष आता शिगेला पोहोचला होता.

निजामाने केलेला करारभंग, रझाकारांनी सुरू केलेले रक्तपात आणि लूटमारीचे सत्र, निजामी सैन्याचे सीमेवरील उपद्व्याप आणि संस्थानातील स्वातंत्र्यसैनिकांचा वरचेवर उग्र होत जाणारा लढा यामुळे भारताचे गव्हर्नर जनरल चक्रवर्ती राजगोपालचारी यांनी ३१ ऑगस्ट १९४८ रोजी निजामाला एक पत्र पाठवले. त्यात म्हटले होते की निजामाने धाडस करून कासीम रझवी आणि त्याच्या रझाकारी संघटनेवर बंदी लादावी, जनतेच्या मनातील कुशंका दूर कराव्यात, आणि जनतेला सुरक्षिततेची जाणीव देण्यासाठी भारतीय फौजेला सिकंदराबाद येथे आपला तळ उभारू द्यावा. त्या पत्रास निजामाने ५ सप्टेंबर १९४८ रोजी उत्तर दिले. उत्तरात त्याने म्हटले की हैदराबाद संस्थानात सर्व काही आलबेल असून कायदा व सुव्यवस्था राखण्यास त्याचे सरकार समर्थ आहे, आणि त्यात भारत सरकारने दखल देण्याचे कारण नाही. या बेजबाबदार उत्तराचा अर्थ असा होता की आता निजामाविरुद्ध भारत सरकारला बळाचा वापर करणे क्रमप्राप्त होते. भारत सरकारने आपल्या सैन्य दलाला ९ सप्टेंबर १९४८ रोजी चढाईचा आदेश दिला. आणि १३ सप्टेंबरच्या पहाटे चार वाजता भारतीय सैन्यदलाच्या कारवाईला सुरुवात झाली. हैदराबाद संस्थान स्वतंत्र करून भारतीय संघराज्यात विलीन करून घेण्यासाठी झालेल्या ती कारवाई 'पोलिस ॲक्शन' या नावाने जनमानसात प्रसिद्ध आहे, तर भारतीय सैन्यदलाचे 'ऑपरेशन पोलो' या नावाने इतिहासात नोंदली गेलेली आहे. १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय फौजा पाच वेगवेगळ्या ठिकाणांवरून निजामाच्या हैदराबाद संस्थानात घुसल्या. पाच ठिकाणांवरून मुख्य

चढाई आणि शिवाय इतर आठ ठिकाणांवरून सहाय्यभूत हल्ले असे त्या ऑपरेशन पोलोचे स्वरूप होते. सैन्याच्या आर्मर्ड डिव्हिजनने सोलापूर येथून चढाईला सुरुवात केली. त्या डिव्हिजनचे नेतृत्व मेजर जनरल जयंत चौधरी हे करीत होते. दुसरे आक्रमण विजयवाडा येथून होते. त्याचे नेतृत्व मेजर जनरल रुद्र हे करीत होते. त्याशिवाय कुर्नूल, आदिलाबाद आणि चाळीसगाव या आणखी तीन मार्गांनी सेनेच्या इतर फळ्यांनी संस्थानावर कूच केले. शिवाय वाशीम मार्गावरून हिंगोलीत, बुलढाण्यातून जालन्यात, गदगकडून बिदरमध्ये, रायचूरकडून सोलापूरमार्गे उस्मानाबाद-लातूरकडे अशा भारतीय फौजा घुसल्या. भारतीय सेनेला पूर्वतयारीसाठी अवघे चार दिवस मिळालेले होते. परंतु सेनेचा आत्मविश्वास दांडगा होता. हैदराबादवरील चढाईची योजना सेनेच्या सदर्न कमांडचे जनरल गोडार्ड यांनी आखली होती. पण त्यांच्या निवृत्तीनंतर त्यांच्या जागी आलेले ले. जनरल राजेंद्रसिंह यांनी ती राबवली. मेजर जनरल ब्रार, ब्रिगेडियर शिवदत्तसिंह आणि एअर व्हाईस मार्शल मुखर्जी हेही त्या योजनेत महत्त्वाच्या भूमिका बजावत होते. निजामाचे सेनाप्रमुख जनरल अल् इद्रिस यांच्या नेतृत्वाखालील संस्थानी सैन्याची दाणादाण भारतीय फौजेने उडवून दिली. पश्चिमेस सोलापूरकडून आलेल्या सैन्याला २३ किलोमीटर अंतर पार करून नळदुर्गनजिकचा एक पूल त्वरेने काबीज करणे आवश्यक होते. कारण निजामी सेना तो पूल उडवून देणार आहे अशी खात्रीलायक माहिती सेनाधिकाऱ्यांना मिळाली होती. भल्या सकाळी सहा वाजताच भारतीय सैन्याने तो पूल ताब्यात घेतला. नळदुर्ग किल्ल्याच्या उपळी बुरुजावर दडलेल्या निजामी लष्कराच्या एका तुकडीला जेरबंद करण्यात आले. त्या दिवशी भारतीय सैन्याने आलियाबाद, जळकोट आणि तुरुरी ही गावे जिंकून घेतली. त्याशिवाय संस्थानावरील चढाईच्या त्या पहिल्या दिवशी उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर, परभणीतील माणिकगड आणि कन्हेरगाव आणि विजयवाड्याजवळील बोनाकल ही गावे भारतीय सैन्याने काबीज केली. उत्तरेस चाळीसगावकडून आत येणाऱ्या सैन्याने १४ सप्टेंबर रोजी औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड, खुल्दाबाद आणि दौलताबाद ही गावे ताब्यात घेतली. औरंगाबाद शहर सेनेच्या दृष्टिपथात आले. तिकडे बुलडाण्याकडून घुसलेल्या सेनेच्या तुकडीने जालना शहरावर कबजा केला. सोलापूरवरून जनरल चौधरींच्या नेतृत्वाखाली निघालेल्या फौजेच्या मुख्य फळीने राजेश्वर मार्गे सूर्यापिठपर्यंत धडक मारली. हैदराबादचे जुळे शहर सिंकदराबाद हे तेथून केवळ साठ किलोमीटर अंतरावर होते. त्या दुसऱ्या दिवशी उस्मानाबाद

आणि येरमाळा ही गावेही पडली. शिवाय वरंगल आणि बिदर येथील विमानतळांवर भारतीय हवाईदलाने प्रखर हवाईहल्ले केले. १५ सप्टेंबरच्या पहाटे उस्मानाबाद जिल्ह्यातील मुरुड येथे असलेल्या निजामी लष्कराच्या तुकडीने मागे हटण्यास सुरुवात केली. लातूररोड रेल्वेस्टेशनपर्यंत त्यांची पीछेहाट झाली. १५ सप्टेंबरलाच औरंगाबाद शहर भारतीय सैन्याच्या ताब्यात आले. दक्षिणेकडे हुमणाबाद शहरही पडले. वरंगल जिल्ह्यात खम्मम हे गाव सेनेने ताब्यात घेतले. औरंगाबादेहून पुढे कूच करणाऱ्या भारतीय सैन्याने शहागडचा महत्त्वाचा पूल काबीज केला. ह्या सर्व मार्गावर रझाकार आणि निजामी सैन्याचा प्रतिकार अगदीच जुजबी होता. मात्र बिदर ते जहीराबाद या मार्गावर कोंडीत सापडलेल्या निजामी शिपायांनी आणि रझाकारांनी भारतीय सैन्याला काही काळ झुंजवत ठेवले. परंतु चिवटपणे धडका मारत भारतीय सेना जहीराबादपासून अवघ्या आठ किलोमीटर अंतरावर येऊन ठेपली. पूर्वेकडून आलेल्या सैन्याला सूयपिठ येथे निजामी शिपायांनी प्रतिकार केला. परंतु १६ सप्टेंबर रोजी सूयपिठ भारतीय सेनेने जिंकले आणि नारकरपल्ली व चित्त्यालकडे मुसंडी मारली. त्याच दिवशी सेनेने जहीराबाद येथील प्रतिकार मोडून काढून त्या शहरावर ताबा मिळवला. परभणी जिल्ह्यात हिंगोली शहर ताब्यात आले. तेलंगणात मुनीराबाद स्टेशन ताब्यात घेऊन भारतीय सेनेच्या तुकडीने निजामी सैन्याचा मोठा शस्त्रसाठा जप्त केला. अखेर १७ सप्टेंबर हा दिवस जेव्हा उजाडला तेव्हा निजामाच्या संस्थानावर चालून गेलेल्या भारतीय सेनेचा विजय दृष्टिपथात आला होता. हैदराबाद शहराभोवती तैनात असलेल्या निजामी सैन्याने लिन्गमपल्लीपर्यंत माघार घेतली होती. निजामाचे सेनाप्रमुख जनरल अल् इद्रिस यांना शरणागती स्वीकारण्याचा आदेश भारतीय सेनाधिकाऱ्यांनी पाठवला. त्याच दिवशी बिदर शहर पडले आणि तेथील विमानतळही भारतीय सैन्याने ताब्यात घेतला. आता भारतीय सेना सर्व बाजूंनी हैदराबाद शहराजवळ पोहोचली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी अंतिम प्रहार म्हणून हैदराबाद शहरावर हल्ला करण्याची योजना आखली गेली. परंतु १७ सप्टेंबरच्या संध्याकाळीच निजामाने आपली हार कबूल केली आणि निजामी फौजेला युद्ध थांबवण्याचे फर्मान दिले. १८ सप्टेंबर १९४८ रोजी विजयी भारतीय सैन्याने मोठ्या दिमाखाने हैदराबाद शहरात प्रवेश केला. भारताचे मेजर जनरल जयंत चौधरी यांनी निजामाचे सेनाप्रमुख जनरल अल् इद्रिस यांची शरणागती लष्करी इतमामात स्वीकारली आणि ती 'पोलिस ॲक्शन' संपुष्टात आली.

# स्टेट काँग्रेसचा त्याग

हैदराबाद संस्थान स्वतंत्र झाले. हैदराबादच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे नेते स्वामी रामानंदतीर्थ यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली. इतरही अनेक सत्याग्रहींची सुटका झाली. तेरा ते सतरा सप्टेंबर दरम्यान झालेल्या त्या पोलिस ॲक्शनच्या वेळी गोविंदभाई आणि भाऊसाहेब वैशंपायन हे दोघे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांना भेटण्यासाठी दिल्ली येथे मुक्काम करून होते. निजामाने शरणागती स्वीकारली हे कळताच ते परत निघाले व मनमाडला पोहचले. तेथून डॉ. मेलकोट आणि दिगंबरराव बिंदू यांच्यासह ते हैदराबादेत आले. २० सप्टेंबर रोजी स्वामी रामानंदतीर्थ यांनी हैदराबाद रेडिओवरून जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात हैदराबादमध्ये धर्मातीत सरकार स्थापन करण्यात यावे ही अपेक्षा व्यक्त केली. नागरिकांची जात किंवा धर्म कोणताही असो, प्रत्येकाला पुढे जाण्याची संधी नव्या राज्यात मिळू शकेल. हैदराबाद प्रांतातील मुसलमानांनी मनात मुळीच भय बाळगू नये असे सांगून स्वामीजींनी अशी ग्वाही दिली की जात्यंध आणि गुन्हेगार रझाकारांचा शोध घेत असताना निरपराध असलेल्या मुसलमानांना पूर्ण संरक्षण दिले जाईल आणि उचित सन्मानानेच वागविले जाईल याची काळजी स्टेट काँग्रेसतर्फे घेतली जाईल. मराठवाडा साप्ताहिकाचे धुरंधर संपादक आ. कृ. वाघमारे यांनी पोलिस ॲक्शननंतर लिहिलेल्या एका अग्रलेखात म्हटले होते की, *"स्टेट काँग्रेसचा लढा हा कोण्या एका जातीच्या विरुद्ध नव्हता. तिने मिळविलेल्या यशावर कोणीही मालकीहक्क सांगू शकत नाही. लोकशाहीकरिता प्राण वेचणाऱ्या सर्व लोकांचा तो विजय आहे. अशा वेळी कोणा एका जमातीने दुसऱ्या जमातीचा मत्सर करणे शहाणपणाचे नाही. आपले अहित इच्छिणाऱ्याबद्दल प्रेम आणि*

*सद्भावना बाळगण्यातच मुत्सद्देगिरी व मोठेपणा असतो.''* गोविंदभाई श्रॉफ हेही पहिल्यापासून स्टेट काँग्रेसच्या लढ्याची उद्दिष्टे व्यापक ठेवावीत याबद्दल आग्रही होते. अत्याचारी निजाम आणि रझाकार यांच्याविरुद्धच्या संघर्षात गोरगरीब, निरपराध मुसलमानांना संरक्षण दिले पाहिजे असे ते म्हणत. ह्या नेत्यांच्या अशा विचारी भूमिकेमुळेच हैदराबादचा मुक्तिसंग्राम हा एक लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्ष आणि समतेचा पुरस्कार करणारा लढा म्हणून ओळखला जात असे. हैदराबाद संस्थान मुक्त झाल्यानंतर स्वामी रामानंदतीर्थ आणि गोविंदभाई असे दोघेजण मिळून औरंगाबादेत आले तेव्हा शहराच्या नागरिकांनी त्यांचे स्वागत प्रचंड जल्लोषात केले. एक मोठी मिरवणूक काढण्यात आली. दोघांचा जाहीर सत्कार करण्यात आला. औरंगाबादच्या नागरिकांनी त्या काळात संघटनेच्या कामासाठी गोविंदभाईंना पन्नास हजार रुपयांची थैली अर्पण केली. स्वामीजी जेव्हा हैदराबादला परत गेले तेव्हा गोविंदभाईंनी संघटनेच्या सशक्तीकरणासाठी औरंगाबाद आणि परभणी जिल्ह्यांचा दौरा केला. जागोजागच्या कार्यकर्त्यांशी पुन्हा संपर्क साधण्यास सुरुवात केली.

हैदराबाद संस्थान स्वतंत्र होऊन भारतीय संघराज्यात विलीन झाल्यानंतर स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या स्टेट काँग्रेसला आणि तिचे नेते स्वामी रामानंदतीर्थ यांना स्वतंत्र हैदराबाद प्रांताची धुरा वाहण्यास भारत सरकार आमंत्रित करेल अशी अपेक्षा होती. परंतु तसे घडले नाही. १८ ऑक्टोबर १९४८ रोजी भारत सरकारने मेजर जनरल जयंत चौधरी यांना मुक्त केलेल्या हैदराबाद प्रांताचे लष्करी गर्व्हनर म्हणून नेमले आणि संपूर्ण प्रांतातील रझाकारांना शोधून काढून त्यांना निःशस्त्र करण्याचे काम त्यांच्या सेनेवर सोपवले. जनरल चौधरींच्या लष्करी सरकारला कारभारात मदत करण्यासाठी जे मुलकी अधिकारी नेमले गेले त्यातही पूर्वीच्या निजाम सरकारच्या चाकरीत असणारे लोकच जास्त होते. ते सारे निजामाच्या सरंजामशाही कारभाराचे प्रशिक्षण घेतलेले लोक होते. त्यांच्या कारभाराच्या पद्धतींमधून गोविंदभाईंना अपेक्षित असलेले लोकवादी बदल येणे अवघड होते. लोकमानसात लोकराज्याची कल्पना रुजणेही अवघड होते. लष्करी आणि मुलकी अधिकाऱ्यांच्या कारभारात मातब्बर श्रीमंत लोक आणि सत्ताकांक्षी नेते यांचेच वर्चस्व वाढू लागले होते. गोरगरीबांना अन्नधान्य मिळणे दुरापास्त झाले होते. परंतु त्या प्रश्नाची तीव्रताच प्रशासनाला जाणवत नव्हती. लोकप्रतिनिधींचा समावेश असलेली एक लोकाभिमुख समिती नेमून अन्नधान्य पुरवठ्याचा प्रश्न तिच्याकडे सोपवावा ही स्वातंत्र्यसैनिकांची

सूचना अडगळीत पडली. लोकांनाही पूर्वीच्या संस्थानातील अधिकाऱ्यांच्या अरेरावीची सवय होती. त्यामुळे अधिकारी करतील तेवढी सोय किंवा देतील तेवढे धान्य निमूटपणे स्वीकारण्याची त्यांची तयारी होती. या परिस्थितीत गोविंदभाईंनी हैदराबादेतील लष्करी प्रशासनाकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या. अन्नधान्य आणि इतर साधनसंपत्तीच्या निर्मितीत लोकांचा सहभाग ठेवावा. लोकांना स्वयंनिर्णयाचा हक्क द्यावा असे भाईंचे म्हणणे होते. त्याचप्रमाणे राज्यात लोकशाहीची प्रक्रिया त्वरित सुरू केली जावी, तरच सर्वांगाने प्रगती शक्य होईल असे त्यांचे मत होते. पण हैदराबादेतील लष्करी प्रशासन त्याबाबत उदासीन होते. राज्यातील अनेक प्रतिष्ठित नेत्यांनाही आपापले हितसंबंध राखावयाचे होते. त्यामुळे गोविंदभाई अस्वस्थ झाले. हैदराबाद संस्थानाचे मुक्तिदाते जेत्यासारखे वागू लागले होते. राज्यात प्रशासन सांभाळू शकतील असे लोकच नाहीत असे मानू लागले होते. त्यामुळे अशा लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांविरुद्ध 'हैदराबाद छोडो' आंदोलन छेडावे लागेल की काय असे गोविंदभाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांना वाटू लागले.

केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळवणे एवढेच एक उद्दिष्ट गोविंदभाईंना कधीच मान्य नव्हते. त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवातच शोषितांसाठी लढे उभारण्याने झालेली होती. म्हणूनच हैदराबाद स्टेट काँग्रेसचा स्वातंत्र्यलढा हा खऱ्या अर्थाने शेतकरी-शेतमजुराचा लढा (peasent's revolution) आहे असे ते मानत. संस्थानातील जहागिरी आणि जमीनदारी नष्ट व्हावी आणि तेथील शेतीव्यवस्थेत मूलगामी बदल व्हावेत असा त्यांचा आग्रह होता. सामान्य, पीडित आणि शोषित जनांची बाजू घेत असल्यामुळेच स्टेट काँग्रेसचा स्वातंत्र्यलढा हा विशिष्ट वर्गापुरता मर्यादित न राहता मराठवाड्यातील खेडोपाडीच्या सामान्य लोकांपर्यंत पोहोचू शकला होता. लढ्यानंतर स्वतंत्र झालेल्या हैदराबाद प्रांतात आर्थिक विषमतेप्रमाणे सामाजिक विषमतेविरुद्धही दीर्घकालीन संघर्ष करणे आवश्यक आहे असे गोविंदभाईंचे ठाम मत होते. लढ्याच्या ह्याच काळात गोविंदभाई 'फ्रीडम' साप्ताहिक चालवत असत. स्टेट काँग्रेसने वंचितांच्या आणि शोषितांच्या बाजूने उभे राहण्याची आपली भूमिका कायम राखावी यासाठी संस्थान स्वतंत्र झाल्यावरही ते त्या साप्ताहिकात लिखाण करीत असत. त्यांच्या अनेक लेखांद्वारे त्यांनी स्टेट काँग्रेसच्या अपेक्षित वैचारिक बैठकीविषयी कार्यकर्त्यांचे प्रबोधन प्रदीर्घ काळ केले. पुढे १९४९ सालच्या नोव्हेंबर महिन्यात गोविंदभाईंनी ते साप्ताहिक बंद केले. त्या फ्रीडम साप्ताहिकातील गोविंदभाईंचे त्या वेळचे सर्व लिखाण हे आजही तरुण

पिढीला मार्गदर्शक ठरणारे आहे.

स्टेट काँग्रेस ही स्वांतत्र्यप्राप्तीसाठी निर्माण केलेली संघटना होती. तो काही पक्ष नव्हता. तिचे विलीनीकरण भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये व्हावयाचे होते. गोविंदभाईंसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची दारेही खुली होती. परंतु स्वातंत्र्यानंतर राष्ट्राच्या पुनर्बांधणीसाठी जे आर्थिक व सामाजिक बदल त्यांना अपेक्षित होते त्याबाबत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या धोरणांमध्येही पुरेशी स्पष्टता नव्हती. राष्ट्रीय काँग्रेसचे धोरण देशातील शोषितांच्या हिताचे नाही असे गोविंदभाईंचे ठाम मत होते. ते धोरण पाश्चात्य देशांतील विकासनीतीने प्रभावित होते. सर्वसामान गरीब माणसाची आर्थिक आणि सामाजिक दास्यातून मुक्तता करण्याचा हेतू त्याच्या मुळाशी नव्हता. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या त्या आर्थिक विकासाच्या दृष्टिकोणाबद्दल महात्मा गांधीनीही स्पष्ट असहमती दाखवलेली होती. स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्ट साध्य झाल्यानंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने सत्ताकांक्षा सोडून द्यावी असे गांधीजीचे मत होते. गोविंदभाईंनाही स्वतंत्र भारताला लोकशाहीशिवाय तरणोपाय नाही असे वाटत होते. आणि त्यांना आपल्या समाजात रूढ होत गेलेल्या परंपरांचेही भान होते. आपल्या संस्कृतीत अनेक गोष्टी विषमतेवर आधारलेल्या आहेत आणि त्यामुळे आधुनिक लोकशाही मूल्ये येथे रुजणे अतिशय अवघड आहे असे त्यांचे मत होते. म्हणूनच विषमता नष्ट करण्याचे काम हेच लोकशाहीच्या दृढीकरणाचे काम होय अशी स्वामी रामानंदतीर्थ आणि गोविंदभाई यांची धारणा होती. स्वतंत्र हैदराबादच्या कारभारात या धोरणाला प्राधान्य मिळावे यासाठी सरदार वल्लभभाई पटेलांचा पाठिंबा मिळवणे गरजेचे होते. म्हणून स्वामीजींच्या निरोपानुसार सरदार पटेलांना भेटण्यासाठी गोविंदभाई डेहराडून येथे गेले. तेथे रात्री त्यांनी आपल्या भेटीचा उद्देश सविस्तरपणे सरदारांच्या कानी घातला. त्यानंतर सरदार पटेल गोविंदभाईंशी बराच वेळ बोलले. स्वतंत्र भारताची वाटचाल कशी असावी याबद्दल सरदारांची मते गोविंदभाईंनी ऐकली. परंतु त्यामुळे गोविंदभाई विचारात पडले. काँग्रेसच्या धोरणांवर भांडवलदारांचा प्रभाव असणार हे सरदारांच्या बोलण्यातून स्पष्ट झाले होते. आपल्याला ज्या प्रकारची आर्थिक व सामाजिक पुनर्रचना अभिप्रेत आहे ते काम काँग्रेसकडून किंवा काँग्रेसद्वारे सत्तेत सामील होऊन शक्य होणार नाही असे गोविंदभाई जाणवले. डेहराडूनवरून परत आल्यानंतर त्यांनी हा सारा वृत्तांत स्वामीजींना दिला.

## लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सची स्थापना

इकडे स्टेट काँग्रेसमध्येही सर्वच कार्यकर्ते काही लोकशाही, समतावादी विचारांचे होते असे नव्हे. सरंजामी वृत्तीच्या स्थितीवादी मवाळ गटाच्या लोकांनी स्वामीजी, गोविंदभाई आणि त्यांच्या मराठवाड्यातील कार्यकर्त्यांविरुद्ध अपप्रचाराची मोहीम चालूच ठेवली होती. स्वातंत्र्यानंतर जुन्या हैदराबाद संस्थानातील मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटकी जिल्हे या तीनही विभागांचे विलीनीकरण अनुक्रमे मराठी, तेलगू आणि कानडी भाषिक राज्यांमध्ये करण्यास त्या लोकांचा विरोध होता. स्टेट काँग्रेसमधील या हितसंबंधी लोकांमुळे लढ्यापाठची व्यापक उद्दिष्टे आणि स्वातंत्र्यानंतरच्या मुक्त समाजाच्या स्वयंनिर्णयाची स्वप्ने अडगळीत पडतील की काय अशी भीती निर्माण झाली. स्टेट काँग्रेसमधील हे मतभेद जेव्हा विकोपाला गेले तेव्हा तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी कार्यकर्त्यांच्या या दोन गटांमध्ये मध्यस्थी करण्याचे ठरवले. त्यांनी स्टेट काँग्रेसच्या संघटनात्मक निवडणुका घेण्याचे टाळून तडजोड म्हणून स्वामीजींऐवजी दिगंबरराव बिंदू यांना अध्यक्षपद दिले. समतावादी, वर्गविहीन समाजरचनेच्या ज्या तत्त्वांवर चळवळ उभी केली त्यांच्यावरच घाव घालणारी ही तडजोड होती. शिवाय लढ्यात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांच्या त्याग आणि निष्ठेवर ती अन्याय करणारी होती. स्वामीजींना जरी स्टेट काँग्रेसचा त्याग करणे शक्य नव्हते तरी गोविंदभाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मात्र स्टेट काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. स्वत: गोविंदभाई, बाबासाहेब परांजपे, भाऊसाहेब वैशंपायन, आ. कृ. वाघमारे प्रभृतींनी आपापले स्टेट काँग्रेस सदस्यत्वाचे राजीनामे सादर केले. हे वृत्त कळताच मराठवाड्यातल्या अनेक झुंजार कार्यकर्त्यांनीही राजीनामे दिले.

अध्यपिक्षा जास्त संख्येने कार्यकर्ते गोविंदभाईंच्या बाजूने आले. मराठवाडा प्रांतिक कमिटीच्या बीड येथील एका बैठकीत या लोकांनी राजीनामे परत घ्यावेत असा आग्रह झाला. परंतु इत:उपर काँग्रेसमध्ये राहून प्रागतिक विचारांची कांस धरून काम करता येणे अशक्य आहे अशी खात्री पटल्याने गोविंदभाई आणि त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांनी स्टेट काँग्रेसचा त्याग केला. आता त्या नंतर पुढे काय करावयाचे यावर चर्चा करण्यासाठी सर्व मंडळी वसमत येथे एकत्र जमली. तेथे एक नवा पक्ष स्थापन करण्याच्या प्रश्नावर विचारविनिमय झाला. स्वतंत्र हैदराबाद राज्यात साम्यवादी पक्षाप्रमाणे टोकाची भूमिका घेऊनही उपयोगाचे नाही, आणि स्टेट काँग्रेस प्रमाणे तडजोडवादी भूमिकाही फायद्याची नाही हे सर्वांच्या ध्यानात आले होते. परंतु समतावादी धर्मनिरपेक्ष धोरण अंगिकारणेही महत्त्वाचे होते. त्यामुळे गोविंदभाई हे बाबासाहेब परांजपे यांच्यासह पुण्याला गेले आणि तेथे त्यांनी समाजवादी नेते ना. ग. गोरे यांच्याशी चर्चा केली. पुढे मराठवाड्यातील पुरोगामी विचारांच्या सर्व कार्यकर्त्यांची एक बैठक नांदेड येथे झाली. हैदराबाद राज्यातील सरंजामी सामाजिक व्यवस्था बदलून तेथे समाजवादी व्यवस्था आणण्यासाठी एका मजबूत आणि कार्यक्षम संघटनेची गरज होती. त्यासाठी सर्व समाजवादी शक्तींची एकजूट होणे आवश्यक होते. अन्यथा केवळ हैदराबाद राज्य नव्हे तर संपूर्ण देशच भांडवलशाही आणि जातीयवादी फॅसिझमच्या विळख्यात सापडण्याचा धोका होता. म्हणून संघटनेच्या उभारणीसाठी अठरा सदस्यांची एक समिती नेमली गेली. त्या समितीत गोविंदभाई, बाबासाहेब परांजपे, भाऊसाहेब वैशंपायन, पी. व्ही. नरसिंहराव, के. व्ही. नरसिंहराव, गंगाप्रसाद अग्रवाल इत्यादी महत्त्वाच्या नेत्यांचा समावेश होता. त्या समितीने संघटनेच्या स्थापनेसाठी जो एक महत्त्वाचा राजकीय प्रस्ताव तयार केला त्याचा उल्लेख 'नांदेड जाहीरनामा' (Nanded declaration) असा केला जातो. त्याचा मसुदा स्वत: गोविंदभाईंनी तयार केलेला होता. कार्ल मार्क्सच्या विचारांचा काहीसा प्रभाव त्या नांदेड जाहीरनाम्यावर दिसतो. स्वतंत्र राष्ट्रामध्ये जगण्याचे स्वातंत्र्य हे पहिल्या क्रमावर असेल आणि विचारांचे स्वातंत्र्य हे त्यानंतरच्या प्राधान्याचे असेल ही भूमिका नांदेड जाहीरनाम्यात होती. शोषण आणि नफा यांवर आधारलेली भांडवलदारी अर्थव्यवस्था मोडीत काढणे आणि उत्पादन-वितरणाची प्रक्रिया समन्यायी ठेवून नवी समाजवादी अर्थव्यवस्था निर्माण करणे हे त्यात जरुरीचे मानले होते. सर्वसामान्य जनतेला दारिद्र्य, अज्ञान आणि गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करणे हे राज्यव्यवस्थेचे उद्दिष्ट असावे आणि

त्यासाठी देशभरच्या समाजवादी विचारांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र यावे असे आवाहनही त्यात होते. नांदेड जाहीरनाम्यात जे पाच महत्त्वाचे मुद्दे गोविंदभाईंनी मांडले होते ते असे:

**वर्गसंघर्षाचे महत्त्व :-**

अमेरिका आणि रशिया या दोन जागतिक महासत्ता त्या काळी प्रबळ होत्या. एक टोकाची भांडवलशाही तर दुसरी टोकाची साम्यवादी राजसत्ता होती. परंतु दोन्ही राष्ट्रे शोषणखोर आणि युद्धपिपासू बनत चाललेली होती. म्हणून जगातील सर्व राष्ट्रांनी युद्ध आणि सत्तास्पर्धा याची कांस सोडून स्वातंत्र्य, शांतता आणि जनसत्ता यावर लक्ष केंद्रित करावयास हवे असे नांदेड जाहीरनाम्यात म्हटले होते. जगातील निरनिराळ्या स्वतंत्र राष्ट्रांमधील आंतरसंबंध हे सहजीवन आणि सहकार्याचेच असणे आवश्यक आहे, म्हणूनच भांडवलदारी शक्तींच्या एकत्रीकरणाला विरोध केला पाहिजे. जगातील या दोन बलाढ्य राष्ट्रांमधील सत्ता-संघर्ष हा जगभरच्या सामान्य जनतेच्या आस्थेचा विषय होऊ शकत नाही तर शोषणकर्ते आणि शोषित यांच्यामधील वर्गसंघर्ष हा त्यांच्यासाठी महत्त्वाचा आहे. म्हणून त्या वर्गसंघर्षात आपले स्थान काय असावे याचा विचार आपण केला पाहिजे.

**जगण्याचे स्वातंत्र्य :-**

एखाद्या समाजाची स्थिती आणि त्याचे गतिशील विधीनियम यांचा अपरिहार्य परिणाम त्याच्या सामाजिक उद्दिष्टांवर होत असतो. निसर्गनियमांचे नीट आकलन करून घेऊन त्यांचा उचित उपयोग केल्यानेच माणसाचा विकास घडत असतो. जगातील सामाजिक स्थिती ही पराकोटीची विषम अशी आहे. विज्ञानाची वाढ होऊनही मोजकेच लोक श्रीमंत आणि बहुतांश जनता दरिद्री अशी व्यवस्था जगभर पसरलेली आहे. या व्यवस्थेत भाकरीचा हक्क हा पहिल्या क्रमांकावर असणे गरजेचे आहे. कारण जगण्याचे स्वातंत्र्यच त्यावर अवलंबून असते. म्हणून जगण्याचा हक्क हा लोकशाही स्वातंत्र्यात मूलभूत हक्क मानला गेला पाहिजे.

**कामाचा हक्क:-**

माणसाच्या मूलभूत हक्कांमध्ये कामाचा हक्क समाविष्ट नाही हे खेदाचे आहे. विचारस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे पुरोगामी लोकही कामाच्या हक्काला गौण मानतात. आजच्या समाजव्यवस्थेत ऐहिक जीवन नीटपणे जगता येण्यासाठी काम मिळणे हे अत्यावश्यक आहे. म्हणूनच भाकरीच्या हक्कासोबतच कामाच्या हक्कालाही महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे.

**लोकशाही राज्यव्यवस्था:-**

लोकशाहीच्या प्रचलित व्यवस्थेत माणसाला सन्मानाने जगण्याचा हक्क आणि प्रत्येकाला कामाचा हक्क यांचा अंतर्भाव दिसत नाही. त्यामुळे ती खऱ्या अर्थाने लोकशाही ठरत नाही. समाजवादी समाजरचनेमध्ये हे हक्क प्राधान्यक्रमाने दिले गेले पाहिजेत. इतर प्रकारची स्वातंत्र्ये त्यापाठोपाठ येतील. अर्थात ही प्रक्रिया यांत्रिकपणे राबवून चालणार नाही. मानवी विकासास एका जिवंत आणि गतिशील पद्धतीने हाताळले तरच ते शक्य होईल.

**विचारस्वातंत्र्य:-**

भूक आणि दारिद्र्य यांनी पिचलेल्या जनतेला विचारस्वातंत्र्य असत नाही. कारण ते तिच्या अपार दु:खसंकटांआड बुजून जात असते. आजच्या प्रचलित व्यवस्थेत विचारस्वातंत्र्य हे भांडवलदारांच्या वृत्तपत्रांनी, राज्यव्यवस्थेने आणि धनिकांच्या पैशाने देऊ केलेले एक ऐषोरामाचे साधन आहे. विषमता, दारिद्र्य, अज्ञान आणि शोषण यांनी गांजलेल्या समाजाला मूठभर सुखवस्तू बुद्धिवंतांनी दाखवलेले मृगजळ म्हणजेच आजचे विचारस्वातंत्र्य होय. त्याने लोकशाही संस्कृती पैदा होऊ शकणार नाही. आर्थिक आणि सामाजिक विषमता, आणि शोषण यापासून मुक्ती मिळत असेल आणि प्रत्येकाला भाकरीचा, कामाचा आणि नीटपणाने जगण्याचा हक्क असेल तरच विचारस्वातंत्र्य खरे उपयोगाचे आहे. तेच खऱ्या लोकशाही संस्कृतीला जन्म देऊ शकते.

या नांदेड जाहीरनाम्याचा पुरस्कार करून १९५० च्या जून महिन्यात 'लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्स' या नव्या पक्षाची आणि 'मराठवाडा किसान परिषद' या संघटनेची स्थापना करण्यात आली. गोविंदभाई लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सचे सरचिटणीस झाले. जनतेला आर्थिक आणि सामाजिक दास्यातून मुक्त करण्यासाठी एक नवी राजकीय संस्कृती हवी आणि त्या संस्कृतीसाठी आजवर सरंजामी ज़ीवनपद्धतीची सवय झालेल्या लोकांचे वैचारिक प्रबोधन करावयास हवे असा त्या नव्या संघटनेचा आग्रह होता. त्यामुळे सेवादलाच्या आणि विचारविकास–मंदिराच्या माध्यमातून प्रबोधनाचे कार्य लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सने सुरू केले. तसेच शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन लोक, कनिष्ठ मध्यमवर्गीय लोक यांच्या संघटना बांधण्याचे काम हाती घेतले. अन्नधान्याच्या टंचाईचा बिकट प्रश्न, शेतकऱ्यांसमोरील लेव्हीचा प्रश्न, जमीनदारांच्या सोयीचा असलेल्या कूळकायद्याचा आणि कमाल जमीनधारणेचा प्रश्न अशा अनेक

समस्यांवर लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सने लढा दिला. या पक्षाचे काम केवळ मराठवाड्यापुरतेच मर्यादित राहू नये यासाठी जुलै १९५० मध्ये गोविंदभाई गुलबर्ग्यास गेले. कर्नाटकातील कार्यकर्त्यांशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी संपूर्ण मराठवाड्याचा दौरा केला. स्टेट काँग्रेसचा त्याग करून त्यांना नव्या पक्षाची स्थापना का करावी लागली, प्रस्थापित झालेले सरकार हे गरीबाच्या बाजूचे का नाही, शेतकरी-शेतमजुरांची उपासमार ते कसे रोखू शकत नाही, हे लोकांना समजावून सांगून देशातील गरीबांनी संघटित व्हावे असे आवाहन त्यांनी जागोजागी केले. लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्स आणि मराठवाडा किसान परिषद यांचा प्रसार झपाट्याने होऊ लागला. अनेक ठिकाणी पक्षाची कार्यालये स्थापन झाली. तथापि, लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सच्या स्थापनेबद्दल काँग्रेसचे नेते जसे नापसंती दाखवत असत त्याप्रमाणे देशातील समाजवादी पक्षाचे नेतेही फारसे अनुकूल नव्हते. लीगच्या प्रखर धोरणांमुळे त्या पक्षावर आणि गोविंदभाईंवर कम्युनिस्टधार्जिणेपणाचा आरोप ठेवून त्यांच्यामुळे देशातील समाजवादी चळवळीला विघातक वळण लागेल अशी भीती देशातील समाजवादी नेते व्यक्त करू लागले. भारतात काँग्रेस पक्ष हा भांडवलदारांच्या बाजूचा आहे, आणि येथील समाजवादी चळवळ देखील इंग्रजांच्या मजूर पक्षाप्रमाणे 'सोयिस्कर समाजवाद' पाळणारी आहे. असे गोविंदभाईंचे स्पष्ट मत होते. मार्क्सवादाला आणि कम्युनिस्टांना प्रखर विरोध करून भांडवलदारी व्यवस्थेच्या आधाराने केवळ सैद्धांतिक पातळीवर समतेचा पुरस्कार करावयाचा आणि प्रत्यक्षात देशात बहुसंख्येने असलेल्या गरीबांच्या हक्कांसाठी लढा द्यावयाचा नाही अशा प्रकारचा समाजवाद लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सला मान्य नव्हता. १९५० मध्येच १४ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर असे सलग पाच दिवस लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सच्या कार्यकर्त्यांची बैठक मराठवाड्यात सेलू येथे झाली. भारत सरकारने लोकसभेत मांडलेल्या मजूरविरोधी आणि कामगारविरोधी विधेयकांना त्या बैठकीत कडाडून विरोध करण्यात आला. सरकारी धोरणातील 'कामगारांच्या संप करण्याच्या हक्कावर गदा आणणे, संप हा गुन्हा मानणे, इंटकसारख्या मालकधार्जिण्या संघटनांचे निर्णय स्वीकारणे' या व अशा गोष्टींना विरोध करणारे ठराव सेलूच्या त्या बैठकीत केले गेले. जुन्या संस्थानातील जमीनदारांना मोबदला देण्याच्या हैदराबाद सरकारच्या निर्णयाविरुद्धही एक ठराव केला गेला. या सेलू बैठकीनंतर लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सच्या कार्यकर्त्यांना अधिक जोम आला. अनेक

जाहीर सभांमधून लीगची गोरगरीबांच्या बाजूने असलेली भूमिका लोकांसमोर मांडली गेली. समता आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार का करावयास हवा हे जनतेसमोर खुलासेवार सांगितले गेले. कित्येक दशकांपासून सत्ताधाऱ्यांसमोर मान तुकविण्याची सवय असलेल्या जनतेला जागृत करण्याचे आटोकाट प्रयत्न लीगतर्फे केले गेले.

✿

## निवडणुकांतील अपयश आणि लीगचे विसर्जन

१९५२ साली स्वतंत्र भारतात पहिली सार्वत्रिक निवडणूक होती. त्या निवडणुकीसाठी समविचारी पक्ष आणि संघटनांची एकजूट घडवून भांडवलदारी वृत्तीच्या पक्षांशी संघटितपणे सामना करणे अनिवार्य होते. म्हणून गोविंदभाईंनी हरप्रयत्ने एक जनता लोकतांत्रिक आघाडी (People's Democratic Front) स्थापन केली. त्या आघाडीत लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्स, हैदराबाद ट्रेड युनियन काँग्रेस, डेमॉक्रॅटिक पीपल्स पार्टी, भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि अखिल हैदराबाद किसान सभा या संघटनांचा समावेश होता. या आघाडीचे अध्यक्ष डॉ. जयसूर्य नायडू हे होते तर सरचिटणीस गोविंदभाई होते. आघाडीने ५२ सालच्या निवडणुकीसाठी जो जाहीरनामा प्रसृत केला त्यात नियंत्रित अर्थव्यवस्था आणणे, कामाचा आणि शिक्षणाचा मूलभूत हक्क घटनेत समाविष्ट करणे, निर्वाचित प्रतिनिधीला परत बोलावण्याचा हक्क लोकांना देणे, धनदांडगे लोक आणि जमीनदार यांना देय असलेल्या गैरवाजवी सवलती रद्द करणे, अन्याय्य कायदे बदलणे, जातीय व कडव्या धार्मिक शक्तींना थारा न देता निधर्मी राजवट स्वीकारणे, अल्पसंख्य, शोषित आणि मागासवर्गीयांच्या हितांचे रक्षण करणे, भाषावार प्रांतरचना करणे, देशाचे समुचित औद्योगीकरण घडविणे, सामाजिक समतेचा पुरस्कार करणे, ब्रिटिश राष्ट्रकुलातून बाहेर पडून स्वतंत्र आंतरराष्ट्रीय धोरण अवलंबिणे, शेजारी राष्ट्रांबरोबर शांततेचे आणि सलोख्याचे संबंध ठेवणे, अणुशक्तीच्या वापरावर बंदी घालणे, आदि गोष्टीचा समावेश होता. जनता लोकतांत्रिक आघाडीतर्फे लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सच्या सत्तावीस कार्यकर्त्यांनी गोविंदभाईंच्या नेतृत्वाखाली १९५२ सालची निवडणूक लढवली. गोविंदभाई हे

स्वत: औरंगाबाद मतदारसंघातून उभे राहिले. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी हैदराबाद मुक्तिलढ्यात दिलेले योगदान, ऐन उमेदीच्या वयात केलेला त्याग, बाळगलेली मूल्यनिष्ठा यामुळे जनता त्यांना निश्चितच निवडून देईल अशी साऱ्यांची अपेक्षा होती. परंतु एक अपवाद वगळता त्या निवडणुकीत मराठवाड्यातून उभे असलेले लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सचे सर्व उमेदवार पराभूत झाले. फक्त बीड मतदारसंघातून उभे असलेले बाबासाहेब परांजपे हेच एकटे ही निवडणूक जिंकू शकले. मात्र मराठवाड्याबाहेर जनता लोकतांत्रिक आघाडीतील इतर घटकपक्षांचे बरेच उमेदवार निवडून आले. आणि ती आघाडी हैदराबाद विधानसभेत प्रमुख विरोधी पक्ष बनली. कॉ. व्ही. डी. देशपांडे हे विरोधी पक्षनेते झाले. भारतातील त्या पहिल्या निवडणुकीच्या वेळी एकूणच संपूर्ण देशात काँग्रेसची लाट होती. आणि वर्षानुवर्षे सरंजामशाहीत विषमतेचे जीवन जगणाऱ्या जनतेला एकाएकी समतेचे क्रांतिकारी वळण घेणे अवघड होते ही कदाचित लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सच्या दारुण पराभवाची कारणे असावीत.

लोकजीवनाशी समरस झालेल्या आणि लोकांचे मूलभूत प्रश्न हाती घेऊन संघर्ष करणाऱ्या गोविंदभाई आणि लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सच्या कार्यकर्त्यांचा निवडणुकीतील पराभव हा धक्कादायक होता. स्वत; गोविंदभाई जरी त्या अपयशाने खचणारे नव्हते तरी मराठवाड्यातील कित्येक कार्यकर्ते त्यामुळे हादरून गेले होते. निवडणुकीतील पराजयाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे, पक्षाची भूमिका नव्याने मांडणे आणि तीनुसार पक्षाच्या जडणघडणीत आवश्यक ते बदल करणे जरुरीचे होते. त्यामुळे २० ते ३१ मे १९५२ या काळात लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सचे दुसरे अधिवेशन वसमत येथे घेण्यात आले. त्यात गोविंदभाईंनी पक्षाची भूमिका आणि दृष्टिकोन यांविषयी एक महत्त्वाचा मसुदा चर्चेसाठी ठेवला. त्यात त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील युद्धोत्तर राजकीय स्थितीचे विश्लेषण केले. त्या मसुद्यात गोविंदभाईंनी म्हटले होते की, *''युद्धात विजय मिळाल्यानंतर युद्धोत्तर रशियामध्ये साम्राज्यशाहीचा बिमोड होऊन समाजाची सत्ता प्रस्थापित झाली. आर्थिक आणि सामाजिक समतेच्या पुरस्कारातून शेतकरी आणि कामगार यांच्या हिताची अर्थव्यवस्था स्थापन करण्यात तेथील समाजवादी शासनाला यश मिळाले. त्यामुळे सोव्हिएट रशियाला राजकीय स्थैर्य तर मिळालेच परंतु साम्राज्यवादी देशांच्या बरोबरीने एक महासत्ता म्हणून त्यास जागतिक राजकारणात स्थान मिळाले. त्यानंतरच्या काळात रशियाची आर्थिक आणि औद्योगिक ऐपत वाढली*

*आणि साम्राज्यवादाला विरोध करू पाहणारे देश त्याकडे नेतृत्वाच्या अपेक्षेने पाहू लागले. चीन आणि पूर्व युरोपातही समाजवादी- साम्यवादी प्रशासने प्रस्थापित झाली आणि भांडवलधारी देशांना समाजवादी सत्तांचे अस्तित्व जाणवू लागले. इतके दिवस सर्वसामान्यांची पिळवणूक करणाऱ्या युरोप आणि जपानमधील राज्यव्यवस्था ढासळल्या. आणि ब्रिटिश, फ्रेंच आणि डच विस्तारवादाला आळा बसला. ब्रिटिशांनी त्यांच्या ताब्यातील अनेक वसाहतींना स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्यांवर आपली आर्थिक पकड ठेवण्याच्या दृष्टीने 'ब्रिटिश राष्ट्रकुलाचे' घोडे पुढे दामटले. आता अशा सर्व साम्राज्यवादी देशांचे नेतृत्व अमेरिकेसारख्या भांडवलदारी अर्थसत्तेकडे गेलेले आहे. अमेरिकेने मागास देशांचा विकास आणि धोकादायक साम्यवादाचा बिमोड ही कारणे सांगून अनेक राष्ट्रांवर मार्शल योजना, तांत्रिक सहकार्याचे करार, संयुक्त संरक्षणाचे करार, सशस्त्रीकरणाच्या योजना, आदि योजना लादावयास सुरुवात केलेली आहे. अशा रीतीने अमेरिकेने रशिया, इतर साम्यवादी राष्ट्रे आणि जनकल्याणवादी समाजवादी विचारसरणी यांच्या विरोधात शक्ती उभी करावयास सुरुवात केली आहे. त्याचप्रमाणे साम्यवादी किंवा समाजवादी विचारधारा ही लोकशाहीविरोधी आहे असा अपप्रचारही सुरू केलेला आहे. अमेरिकेच्या या आव्हानाला आपण तोंड देणे जरुरीचे आहे.''*

त्या मसुद्यात भारतातील राजकीय स्थितीची मीमांसाही गोविंदभाईंनी केली होती.

*''स्वातंत्र्योत्तर भारतात अलिप्ततावादाच्या नावाखाली कोणाशीही शत्रुत्व न घेता प्रगती साधण्यासाठी एकीकडे रशियाशी सांस्कृतिक संबंध ठेवून दुसरीकडे अमेरिकेसोबत आर्थिक व्यवहार जोपासण्याची नीती अवलंबिली गेलेली आहे. परंतु येथील अर्थरचना भांडवलदारी वळणाची झाली आहे. निवडणूक प्रक्रिया आणि प्रशासन यांवर प्रतिगामी शक्तीचे वर्चस्व आहे. त्यामुळे शेतीव्यवस्थेत क्रांतिकारी बदल हवे असतानाही केवळ सुधारणावादी धोरण स्वीकारण्यात येत आहे. मालकधार्जिणे मजूरधोरण आणि भ्रष्ट नोकरशाही यांच्या सहाय्याने भांडवलधारांना सोयीच्या अशा विकासपद्धतीचा पुरस्कार केला गेला आहे. सकृतदर्शनी गांधीवादाचा पुरस्कार करणाऱ्या सत्ताधारी काँग्रेस पक्षाचे प्रत्यक्षातले अर्थकारण आणि समाजकारण हे गांधीवादाशी पूर्णपणे विसंगत असे आहे. दुसरीकडे भारतातील कम्युनिस्ट पक्ष हा मार्क्सवादाचा पुरस्कार करणारा आहे. परंतु त्या पक्षाने भारतातील समाजजीवन, येथील संस्कृती, इतिहास आणि तत्त्वज्ञान यांचे*

*आकलन करून घेतले नाही. त्यांचा दृष्टिकोन हा पुस्तकी आणि ठोकळेबाज आहे. त्यामुळे कम्युनिस्ट पक्षही इथे वाढू शकला नाही. म्हणून भारतात खरोखरचा लोकाधार असणारी लोकशाही यावयास हवी. त्यासाठी लोकांना क्रांती करण्यास प्रवृत्त करण्याची गरज आहे. येथे सामान्य श्रमजीवी लोकांच्या हाती सत्ता आली तरच आर्थिक व्यवस्थेवरील भांडवलशाहीची पकड दूर होऊ शकेल. मूठभर श्रीमंत लोकांची गरीब लोकांवर हुकूमत चालणार नाही. लोकांना खरे आर्थिक स्वातंत्र्य मिळेल. ज्ञानाचे आणि विचाराचे स्वातंत्र्यही मिळेल. अशा तऱ्हेच्या जनता लोकशाहीनेच देशातील देशातील दारिद्र्य, उपासमार, विषमता आणि बेकारी नष्ट होऊ शकेल. आणि त्यानेच खरा समाजसत्तावाद आणता येईल.''*

अशा तऱ्हेच्या अपेक्षित सत्ताबदलासाठी गोरगरीब आणि वंचित जनतेचा आधार असलेली 'जनता लोकतांत्रिक आघाडी' बळकट करण्याची निकड गोविंदभाईंनी स्पष्ट केली. त्याचप्रमाणे विचारप्रगल्भ आणि कार्यक्षम अशा कार्यकर्त्यांची भक्कम फळी उभारण्यावर जोर दिला गेला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले. वसमत येथे झालेल्या बैठकीनंतर जून १९५२ मध्ये गोविंदभाईंनी हैदराबाद येथे जनता लोकतांत्रिक आघाडीच्या केंद्रीय समितीची एक बैठक बोलावली आणि तीत आघाडीच्या भविष्यकालीन कार्यपद्धतीचा एक आराखडा तयार केला. लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्स आणि जनता लोकतांत्रिक आघाडी यांना सशक्त वैचारिक पाठबळ देणारे गोविंदभाई हैदराबाद विधानसभेवर निवडून येऊ शकले नाहीत याचे शल्य अनेक कार्यकर्त्यांच्या मनात होते. तेलंगणातील भोंगीर मतदारसंघ हा कम्युनिस्टांचा बालेकिल्ला होता. तेथून विधानसभेवर निवडून आलेले जनता लोकतांत्रिक आघाडीचे कॉ. रविनारायण रेड्डी यांची लोकसभेवरही निवड झालेली होती. त्यांनी विधानसभेचा राजीनामा दिला आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाने त्या पोटनिवडणुकीत गोविंदभाईंना ती जागा देण्याचा निर्णय घेतला. तेलंगणात तेव्हा शेतकऱ्यांची भूमिहक्कांसाठीची चळवळ जोमात होती. स्वत: गोविंदभाई हे कम्युनिस्ट पक्षाचे नसले तरी शेतकरी-शेतमजुरांच्या चळवळीतले होते. कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर त्यांनी जनता लोकतांत्रिक आघाडीतर्फे त्या भोंगीर मतदारसंघातून पुन्हा निवडणूक लढवली. त्यांच्यासाठी ही जागा रिकामी करून देणाऱ्या कॉ. रविनारायण रेड्डींचा आणि कम्युनिस्टांचा तो खास मतदारसंघ असूनही गोविंदभाईंचा त्या निवडणुकीत पराभव झाला. याही वेळेस त्यांचा पराभव का झाला हा प्रश्न अनुत्तरित राहतो. तेलंगणातल्या मतदारांना

गोविंदभाईंचा पूर्वपरिचय नव्हता म्हणून? की मतदारसंघातील कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनीही त्यांच्या प्रचारात फारसा उत्साह दाखवला नाही म्हणून? का कोण जाणे, पण त्यांना हा पराभव पत्करावा लागला. कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यप्रणालीविषयी असलेले गोविंदभाईंचे आक्षेप, भारतीय स्वातंत्र्यदिनाला राष्ट्रकुलविरोधी काळा दिवस मानण्याच्या कम्युनिस्टांच्या भूमिकेला असलेला त्यांचा विरोध यामुळे गोविंदभाईंना त्या निवडणुकीत जनता लोकतांत्रिक आघाडीतील कम्युनिस्टांचा अंतर्विरोध भोवला असावा असा काहींचा तर्क आहे. वस्तुतः मार्क्सवादाचा पुरस्कार करणाऱ्या भारतातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी येथील इतिहास आणि येथील लोकांनी स्वातंत्र्यासाठी केलेल्या चळवळींचे योग्य मूल्यमापन करावे एवढेच गोविंदभाईंचे म्हणणे होते. येथील लोकांनी एका मोठ्या साम्राज्यवादी सत्तेशी प्रदीर्घ काळ लढा देऊन स्वातंत्र्य मिळवले होते. त्या स्वातंत्र्यदिनाबद्दल जनतेला अभिमान असणे हेच स्वाभाविक आहे. म्हणून स्वातंत्र्याबद्दलच्या लोकांच्या या आस्थेचा आदर कम्युनिस्टांनी ठेवणे आवश्यक आहे असे त्यांचे प्रतिपादन होते. भारतातील डावी चळवळ वाढवण्यासाठी आर्थिक लढ्यांसोबतच येथील इतिहास, संस्कृती, तत्त्वज्ञान आणि सामाजिक जीवन यातून स्पष्ट होणाऱ्या भारतीय विचारसरणीचे आकलन आणि विश्लेषण करणेही गरजेचे आहे असे गोविंदभाई सांगत. जनता लोकतांत्रिक आघाडीतील घटकपक्षांनी आणि संघटनांनी त्यांच्या या प्रगल्भ विचारांचे महत्त्व जाणून घेतले असते तर हैदराबादचे एकूण राजकीय चित्रच कदाचित बदलले असते. परंतु ते घडले नाही. जनता लोकतांत्रिक आघाडीतील घटक पक्षांचे आपसातील मतभेद वाढतच गेले.

१९५३ च्या सप्टेंबर महिन्यात जनता लोकतांत्रिक आघाडीच्या मध्यवर्ती समितीची बैठक झाली. त्या बैठकीत गोविंदभाई आणि मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष डॉ. जयसूर्य नायडू यांनी आघाडीला कोणत्याही एका पक्षाचे स्वरूप देऊ नये असे ठाम मत मांडले. किमान कार्यक्रमांवर एकत्र आलेल्या लोकशाहीवादी पक्षांची, संघटनांची आणि व्यक्तींची ती एक संयुक्त आघाडी असावी. आणि घटकपक्षांनी सर्व कार्यक्रम आघाडीच्या व्यासपीठावरूनच घ्यावेत असा आग्रह त्यांनी धरला. तसेच कोणत्याही एका घटकपक्षाने किंवा संघटनेने आघाडीचे नेतृत्व करण्याची भूमिका घेऊ नये. अगर स्वतःचे सारे कार्यक्रम आघाडीवर लादू नयेत, कार्यक्रमांची निवड लोकशाही मार्गाने केली जावी असेही त्यांनी मांडले. परंतु आघाडीतील काहींना ते मान्य नव्हते.

त्यानंतर मराठवाड्यात स्थापन केलेल्या लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सचेही काय करावयाचे हा प्रश्न गोविंदभाईसमोर उभा राहिला. लीगच्या स्थायी समितीच्या बैठकीत त्यावर विस्तृत चर्चा झाली. लीगची स्थापना ज्या भूमिकेतून आणि जो वैचारिक दृष्टिकोन समोर ठेवून झाली होती, त्यांच्याबद्दलचे जनता लोकतांत्रिक आघाडीतील इतर घटक पक्ष आणि संघटनांचे मतभेद स्पष्ट झालेले होते. आणि त्यामुळे निवडणुकांमध्ये लीगच्या कार्यकर्त्यांनाच पराभव पत्करावे लागले होते. तेव्हा आता दोनच पर्याय लीगसमोर होते. एक असा, की सामान्य वंचित लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठीची चळवळ व्यापक करण्यासाठी आघाडीचा विचार न करताच स्वतंत्रपणे लीगचे कार्य चालू ठेवावे. आणि दुसरा पर्याय असा की मागच्या तीन वर्षांतील कटु अनुभव आणि मतभेद ध्यानी घेऊन लीगचे विसर्जन करण्यात यावे आणि सर्व कार्यकर्त्यांना आपापल्या निवडीप्रमाणे इतरत्र कार्य करण्याचे स्वातंत्र्य द्यावे. यावर लीगच्या सगळ्या कार्यकर्त्यांची मते अजमावण्यात आली. आणि १९५४ सालच्या ऑगस्ट महिन्यात सर्वसहमतीने लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सचे अधिकृत विसर्जन केले गेले. हे विसर्जन झाल्यामुळे १९५४ च्या ऑक्टोबर महिन्यात गोविंदभाईंनी जनता लोकतांत्रिक आघाडीच्या सरचिटणीसपदाचा राजीनामा दिला. तिकडे डॉ. जयसूर्य नायडू यांनीही जनता लोकतांत्रिक आघाडीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. अशा रीतीने जनता लोकतांत्रिक आघाडीची मुहूर्तमेढ रचणाऱ्या लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्सचे अस्तित्व संपुष्टात आले. लीग आणि आघाडीतील अनेक कार्यकर्ते कम्युनिस्ट पक्षात गेले. तर इतर कार्यकर्ते प्रजासमाजवादी किंवा शेतकरी कामगार पक्षात गेले. गोविंदभाई मात्र कोणत्याही पक्षात दाखल झाले नाहीत. ते शेवटपर्यंत पक्षीय राजकारणापासून दूरच राहिले.

✿

# भाषावार प्रांतरचना आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ

अखिल भारतीय काँग्रेसने हिंदुस्तानात भाषावार प्रांतरचना असावी अशी भूमिका १९०५ सालापासूनच घेतलेली होती. त्या भूमिकेला स्टेट काँग्रेसचा पूर्ण पाठिंबा होता. निजामी हैदराबाद संस्थानात जेव्हा स्टेट काँग्रेसवर बंदी होती तेव्हा तिचे कामकाज पुढे नेणाऱ्या आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र परिषदांमधूनही भाषावार प्रांतरचनेचा जोरदार पुरस्कार केला जात असे. महाराष्ट्र परिषदेच्या लातूर अधिवेशनात १९४६ साली हीच मागणी केली गेली होती. त्या संमेलनाचे अध्यक्ष आ. कृ. वाघमारे यांनी हैदराबाद संस्थानाचे तीन भाग करून ते सभोवताली असलेल्या आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र या भाषिक राज्यांत विलीन करण्याचा ठराव मांडला होता. हैदराबाद मुक्तिलढ्याचे नेते स्वामी रामानंदतीर्थ आणि गोविंदभाई श्रॉफ यांच्या दृष्टीनेही भाषावार प्रांतरचना आवश्यक होती. कारण तिच्यायोगेच सरंजामी हैदराबाद संस्थानाचे अस्तित्व पुसता येणार होते. १९४६ सालच्या जुलै महिन्यात मुंबई येथे महाराष्ट्र एकीकरण परिषद झाली. तीत शंकरराव देवांच्या अध्यक्षतेखाली एक 'संयुक्त महाराष्ट्र परिषद' स्थापन करण्यात आली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दिल्ली सरकारने प्रांतपुनर्रचनेवर विचार करण्यासाठी श्रीयुत दार यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. स्वामीजी, गोविंदभाई आणि स. कृ. वैशंपायन यांच्यासारख्या नेत्यांचे मत देशभरात भाषावार प्रांतरचना करण्याच्या बाजूचे होते. त्या नव्या रचनेतहत हैदराबादचेही विभाजन करून त्याचे तीन तुकडे सम-भाषिक राज्यांना जोडण्याची मागणी जर दार आयोगासमोर केली नाही तर हैदराबाद संस्थान स्वतंत्र भारतात विलीन होऊच शकणार नाही आणि त्याचे सरंजामी अस्तित्व तसेच राहील, असे त्यांना वाटत

होते. ह्या उलट आचार्य कृपलानींसारख्या काही नेत्यांची भूमिका वेगळी होती. हैदराबादचे विलीनीकरण शक्य होण्यासाठी त्याचे तुकडे केले जाणे अपरिहार्य आहे हे जरी त्यांना मान्य असले तरी सर्व देशभर भाषावार प्रांतरचना आणली तर त्यामुळे देशाच्या एकतेला आणि अखंडतेला बाधा येईल असे त्यांना वाटत होते. १९४८ साली हैदराबाद संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाले तेव्हा मराठी भाषिक जनता ही हैदराबाद राज्यातील मराठवाडा प्रद्रेश; कर्नाटकातील बिदर, भालकी, निपाणी, बेळगांव, कारवार हे जिल्हे; विदर्भ; पश्चिम महाराष्ट्र; आणि मुंबई ह्या प्रांतांमध्ये विखुरलेले होते. हे सर्व मराठी प्रदेश एका राज्याच्या छत्राखाली आणण्याची मागणी लोकांमध्ये जोर धरू लागली होती. १९४९ च्या जून महिन्यात नांदेड येथे मराठवाड्यातील कार्यकर्त्यांची एक बैठक मुकुंदराव पेडगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. तीत मराठवाडा प्रदेशाचे विलीनीकरण मुंबई राज्यात करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. नोव्हेंबर १९४९ मध्ये महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची घोषणा केली. स्टेट काँग्रेसच्या १९५० साली परभणी येथे झालेल्या प्रांतिक कमिटीच्या बैठकीतही याच मागणीचा पुनरुच्चार केला गेला.

याच सुमारास मराठवाड्यात गोविंदभाईंसारख्या प्रागतिक विचारांच्या कार्यकर्त्यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसचा त्याग करून लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्स आणि किसान परिषदेची स्थापना केलेली होती. लीगच्या माध्यमातून भाषावार प्रांतरचनेच्या मागणीला जास्त उठाव दिला गेला. तिकडे विजयवाड्याचे एक कार्यकर्ते पोट्टी श्रीरामुलु हे आंध्र राज्याच्या मागणीसाठी आमरण उपोषणाला बसलेले होते. दुर्दैवाने १५ डिसेंबर १९५२ रोजी त्या उपोषणातच त्यांचा अंत झाला आणि आंध्रात प्रचंड खळबळ माजली. लोकक्षोम जेव्हा उफाळून आला तेव्हा पंतप्रधान पंडित नेहरूंना तेलुगू भाषिक आंध्र प्रदेश हे राज्य निर्माण करण्याचा निर्णय घोषित करावा लागला. जुन्या मद्रास प्रांताची फाळणी करून निर्माण केलेल्या त्या आंध्र प्रदेशाची राजधानी हैदराबाद राज्याच्या सीमेजवळील कुर्नूल येथे स्थापन केली गेली. त्या वेळी मध्यप्रदेशात असलेल्या विदर्भातील लोकांनी मराठवाडा, खानदेश आणि विदर्भ हे प्रदेश एकत्र करून एक वेगळे राज्य निर्माण करण्याची मागणी केली. परंतु मराठवाड्यातील नेत्यांनी विदर्भ-खानदेश-पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबईसह होणाऱ्या संयुक्त महाराष्ट्रातच सामील होण्याची इच्छा वारंवार व्यक्त केलेली होती. जुलै १९५३ मध्ये मुंबईत झालेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या

बैठकीत मराठवाड्याची ही भूमिका पुन्हा एकवार स्पष्ट झाली. त्या नंतर शंकरराव देव, स्वामी रामानंदतीर्थ आणि मुंबई राज्याचे तत्कालीन भाऊसाहेब हिरे यांनी विदर्भातल्या नेत्यांशी चर्चा करून विदर्भासही संयुक्त महाराष्ट्रात सामील करून घ्यावे असे ठरले. १९५३ च्याच सप्टेंबर महिन्यात नागपूर येथे ती बैठक झाली. रा. कृ. पाटील यांच्या निवासस्थानी झालेल्या त्या बैठकीस विदर्भातील प्रमुख नेते उपस्थित होते. त्याशिवाय भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, नानासाहेब कुंटे आणि देवीसिंह चौहान हेही उपस्थित होते. त्या बैठकीत महाराष्ट्रात विलीन होण्याच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा झाली. विदर्भाने प्रदेशाच्या विकासाला प्राधान्य मिळण्याच्या काही अटींवर महाराष्ट्रात सामील होण्याचे मान्य केले. मराठवाडा प्रदेशही विदर्भाप्रमाणेच मागासलेला होता. विदर्भाने घातल्या तशा अटी मराठवाड्याच्या नेत्यांनी घातल्या नसल्या तरी प्रादेशिक असमतोल दूर करण्याला प्राथमिकता दिली जाईल हे मराठवाड्यालाही अपेक्षित होते. त्या बैठकीतील चर्चेची फलश्रुती २८ सप्टेंबर १९५३ रोजी विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यामधील एका करारात झाली. 'नागपूर करार' म्हणून प्रसिद्ध असलेल्या त्या करारात या तीनही प्रदेशांच्या विलीनीकरणाविषयीच्या शर्तीचा समावेश होता. त्या करारामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेचा मार्ग सोपा झाला. हैदराबाद राज्यातील पूर्वाश्रमीच्या काही मवाळ नेत्यांचा नागपूर कराराला विरोध होता. परंतु तो निष्प्रभ ठरला. नोंव्हेबर १९५३ मध्ये मराठवाड्यात जिल्हावार संयुक्त महाराष्ट्र परिषदांची स्थापना करण्यात आली. त्याच वर्षी एक डिसेंबर रोजी नांदेड येथे मराठवाड्यातील कार्यकर्त्यांचे एक संमेलन झाले. त्यात मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनीही नागपूर करारास आपला पाठिंबा जाहीर केला. १९५३ सालीच हैदराबाद येथे झालेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात स्वागताध्यक्ष स्वामी रामानंदतीर्थांनी संयुक्त महाराष्ट्राचा जोरदार पुरस्कार करून लोकशाही सुदृढ करण्यासाठी हैदराबाद राज्याचे विभाजन त्वरित व्हावे ही अपेक्षा व्यक्त केली. परंतु पंडित नेहरूंना ते आवडले नाही. त्यामुळे अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षाला पक्षाच्या कार्यकारिणीवर घेण्याचा संकेत असूनही स्वामीजींची कार्यकारिणीवर नियुक्ती केली गेली नाही. प्रांत पुनर्रचनेच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी दार आयोगाच्या पश्चात सरदार वल्लभभाई पटेल, पंडित नेहरू आणि पट्टाभि सीतारामय्या या तिघांची एक समिती नेमली गेली होती. परंतु ह्या समितीने दिलेला अहवाल हा पूर्वग्रहदूषित आणि लोकाकांक्षेच्या विरोधातला होता. त्यास गोविंदभाई आणि

मराठवाड्यातल्या इतर लोकांनी कडाडून विरोध केला होता. त्यामुळे डिसेंबर १९५३ मध्ये एका नव्या प्रांत पुनर्रचना आयोगाची नियुक्ती करण्यात आली. सय्यद फजल अलींच्या अध्यक्षतेखालील ह्या आयोगाचे सदस्य हृदयनाथ कुंजरू आणि सरदार के. एम. पणिक्कर हे होते. परंतु हा आयोगही हैदराबाद राज्यातील मराठी भाषिक जनतेला न्याय देऊ शकणार नाही अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये ठाम होती.

१९५४ च्या जानेवारी महिन्यात मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्र परिषदेची पुनर्रचना करण्यात आली. अध्यक्षपदी शंकरराव देव आणि कार्याध्यक्षपदी भाऊसाहेब हिरे यांची निवड करण्यात आली. त्या समितीवर मराठवाड्यातील कार्यकर्त्यांपैकी स्वामी रामानंदतीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, देवीसिंह चौहान, दिगंबरराव बिंदू, फुलचंद गांधी ह्यांचा समावेश होता. गोविंदभाई हे त्या नव्या कार्यकारिणीत एक संयुक्त कार्यवाह होते. त्यांनी ४ मार्च १९५४ रोजी मराठवाडा विभागाच्या संयुक्त महाराष्ट्र समितीची एक बैठक बोलावली. त्या बैठकीस स्वामीजींसह इतर विविध पक्षांचे लोक उपस्थित होते. नंतर अकरा मार्च रोजी मराठवाड्यातील सर्व आमदारांची बैठक घेतली गेली. त्या दोन्ही बैठकांमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला एकमुखाने पाठिंबा देण्यात आला. केंद्र सरकारने नेमलेल्या फजलअली प्रांत पुनर्रचना आयोगाला देण्याचे निवेदन तयार करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र परिषदेतर्फे डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली होती. त्या समितीची बैठक ९ मे १९५४ रोजी मुंबईत झाली. त्या बैठकीला जे नेते हजर होते त्यामध्ये ना. ग. गोरे, श्रीपाद अमृत डांगे, भाऊसाहेब डांगे, भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, नानासाहेब कुंटे, एस. एम. सुंठणकर, गोविंदभाई श्रॉफ इत्यादींचा समावेश होता. त्या बैठकीत फजल अली आयोगाला सादर करावयाच्या निवेदनाचा अंतिम मसुदा तयार करण्यात आला. संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या त्या निवेदनाला गोविंदभाईंनी एक पुरवणी जोडली होती. तीत म्हटले होते की हैदराबाद संस्थानातील तीनही भाषिक विभाग हे सांस्कृतिकदृष्ट्या एकमेकांपासून पूर्णपणे भिन्न असून त्यांच्या भौगोलिक स्थिती, शेतीव्यवस्था आणि उद्योग-उदीम यांमध्येही भिन्नता आहे. त्या तीन विभागांना त्यांच्या त्यांच्या भाषिक राज्यात सामील न करता तसेच एकत्र ठेवणे हे नुसते अन्यायाचेच आहे असे नाही, तर ते जुन्या सरंजामी व्यवस्थेची भलावण करणारे आहे. त्याच भूमिकेतून जुने हैदराबादी राज्यकर्ते हे 'आझाद हैदराबादची' मागणी करत होते. म्हणून स्वतंत्र भारतातील हैदराबाद राज्याचे भाषिक तत्त्वावर विभाजन करणे हे अत्यावश्यक आहे. भारत सरकारने

त्यास विरोध करू नये अशी मागणीही गोविंदभाईंनी त्या पुरवणी-निवेदनाद्वारे केली होती. स्वामीजी, गोविंदभाई आणि मराठवाड्यातील कार्यकर्त्यांप्रमाणेच हैदराबाद विधानसभेतील जनता लोकतांत्रिक आघाडीचे आमदारही विभाजनाच्या बाजूने होते. त्यांनीही भारत सरकारच्या त्या आयोगाला २४ मे १९५४ रोजी त्या अर्थाचे निवेदन केले. मराठवाड्यात लातूर, अहमदपूर आणि इतर तालुक्यांमध्ये जागोजागी भाषावार प्रांत पुनर्रचनेसाठी अधिवेशने घेतली जाऊ लागली. निरनिराळे पक्ष, वेगवेगळ्या संघटना, साहित्य परिषदा, नेते, लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक आणि सांस्कृतिक संस्था आणि नागरिक यांचे म्हणणे आयोगाने ऐकून घेतले. त्यानंतर ऑक्टोबर १९५४ मध्ये दिल्लीला झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंच्या उपस्थितीतच संयुक्त महाराष्ट्राची मागणी उचलून धरण्यात आली. त्या अधिवेशनाचे उद्घाटक पंडित नेहरू होते, तर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे अध्यक्ष आणि काकासाहेब गाडगीळ हे स्वागताध्यक्ष होते. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नोव्हेंबर १९५४ मध्ये हैदराबादच्या मराठी साहित्य परिषदेला भेट दिली तेव्हा त्यांनीही संयुक्त महाराष्ट्राच्या संकल्पनेला पाठिंबा व्यक्त केला. लोकमताचा एवढा मोठा रेटा असूनही १९५५ च्या ऑक्टोबर महिन्यात आयोगाने सादर केलेल्या आपल्या अहवालात संयुक्त महाराष्ट्राऐवजी मुंबई-गुजरात द्वैभाषिक राज्याच्या निर्मितीची शिफारस केली. या शिफारसीला संपूर्ण महाराष्ट्रातून कडवा विरोध सुरू झाला. तेव्हा अखिल भारतीय काँग्रेस वर्किंग कमिटीने ९ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबई, विदर्भासह महाराष्ट्र आणि महागुजरात अशी तीन वेगवेगळी राज्ये निर्माण करण्याचा घाट घातला. या निर्णयावर महाराष्ट्रातून लोकक्षोभाचा डोंब उसळला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने हा प्रस्ताव नाकारून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र करा असा ठराव केला. १८ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईत संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या वतीने एक प्रचंड मोर्चा निघाला. त्या मोर्चावर पोलिसांनी लाठीमार केला. अश्रुधूर सोडला. अनेक नेत्यांना अटक करण्यात आली. त्यामुळे जनतेचा प्रक्षोभ जास्तच वाढला. तमाम वृत्तपत्रांनी त्या चळवळीच्या बातम्या ठळक मथळ्यांनी छापल्या. सर्व मराठी भाषिक प्रदेशांतून हजारो कार्यकर्ते मुंबईच्या दिशेने निघाले. २१ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईत कडकडीत बंद पाळण्यात आला. देशाच्या सर्व भागांतून आलेल्या चारपाच लाख लोकांचा विराट मोर्चा निघाला. त्या मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला आणि त्यात चौदा सत्याग्रही मृत्यूमुखी पडले. परंतु आंदोलकांनी

माघार घेतली नाही. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची चळवळ चालूच राहिली. परंतु भारताच्या काँग्रेस पक्षीय सरकारवर गुजरातच्या हितसंबंधांचा दबाव मोठा होता. त्यामुळे पंतप्रधान पंडित नेहरू यांनी १६ जानेवारी १९५६ रोजी आकाशवाणीवरून केलेल्या आपल्या भाषणात मुंबई शहर हे केंद्रशासित राहील अशी घोषणा केली. पंतप्रधानांच्या या भाषणाने आगीत तेल ओतण्याचे काम केले. संपूर्ण राज्यभर हरताळ, मोर्चे आणि सभा यांचे सत्र सुरू झाले. नेहरूंच्या भाषणाच्या दुसऱ्याच दिवशी मुंबईत हरताळ पाळण्यात आला. १७ जानेवारीपासून २१ जानेवारी १९५६ या काळात मुंबईत अनेक मोर्चे निघाले, पोलिसांनी एकूण ४६१ वेळा गोळीबार केले, आणि त्यात ८० लोक ठार झाले तर ३८१ लोक जखमी झाले. साथी एस. एम. जोशी यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात एक प्रचंड निषेध सभा झाली. आणि त्यानंतर संपूर्ण राज्यात सत्याग्रहाचे लोण पसरले.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीशी हैदराबाद राज्याच्या विभाजनाचा प्रश्न निगडित होता. त्यामुळे मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यांतूनदेखील सत्याग्रह झाले. संयुक्त महाराष्ट्र परिषदेची जिल्हावार अधिवेशने सुरू झाली. गोविंदभाईंनी औरंगाबाद जिल्ह्याचे अधिवेशन घेतले. त्याचे अध्यक्ष नौशेर भरुचा हे होते. केंद्रात सत्तेवर असलेल्या काँग्रेस सरकारच्या धोरणांमुळे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबाबत हैदराबाद, महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील काँग्रेस नेत्यांनीही कचखाऊ भूमिका घेतल्याबद्दल या अधिवेशनात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. पंडित नेहरूंशी जुळते घेऊन त्यांना हा प्रश्न सोडवू द्यावा अशी भूमिका घेणाऱ्या शंकरराव देवांवर गोविंदभाईंनी सडेतोड टीका केली. पुढाऱ्यांशी जुळते घेण्यासाठी जनतेचा विश्वासघात करणे योग्य नाही असे प्रतिपादन त्यांनी केले. काँग्रेसच्या नेत्यांवर विसंबून न राहता मराठवाड्याच्या संयुक्त महाराष्ट्र लढ्याची जबाबदारी आता इतर कार्यकर्त्यांनी उचलून पुढे गेले पाहिजे असे गोविंदभाईंनी सांगितले. मराठवाड्यात एकूण ३३ केंद्रांवर तीव्र सत्याग्रह झाले. त्या अधिवेशनातील गोविंदभाईंच्या भाषणापासून प्रेरणा घेऊन २४ एप्रिल १९५६ रोजी मराठवाड्यातील कार्यकर्त्यांच्या एका तुकडीने दिल्ली येथे लोकसभेच्या प्रवेशद्वारावर सत्याग्रह केला. त्या तुकडीत अनंत भालेराव, नागनाथ परांजपे, अजहर खुर्शिद आदींचा समावेश होता. तेथे ४१ सत्याग्रहींनी स्वतःला अटक करवून घेतली. अशा सर्वत्र सुरू असलेल्या सत्याग्रहांमुळे लोकसभेत प्रांतपुनर्रचनेचा प्रश्न पुन्हा एकवार चर्चेस आला. फिरोज गांधी, हृदयनाथ कुंजरू या खासदारांनी मुंबई शहर महाराष्ट्रात सामील होण्याला

लोकसभेत पाठिंबा व्यक्त केला. त्यानंतरही केंद्रातील काँग्रेस सरकारची भूमिका बदलली नाहीच. काँग्रेसच्या महासमितीची बैठक मुंबईत झाली त्यावेळी तेथेही संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे सत्याग्रह केला गेला. त्या सत्याग्रहात मराठवाड्यातील अडीचशे सत्याग्रही सामील होते.

संयुक्त महाराष्ट्र परिषदेने १९५६ च्या जुलै महिन्यात 'मुंबई, बेळगांव, कारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र' या प्रश्नावर निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी इतर समविचारी पक्षांसोबत एक संयुक्त आघाडी स्थापन करण्याचे ठरले. परंतु निवडणुका जाहीर होण्याआधीच केंद्र सरकारने मुंबईसह द्वैभाषिक राज्याची घोषणा करून हैदराबाद राज्यातील मराठवाड्याचे पाच जिल्हे या द्वैभाषिक राज्यास जोडल्याचे लोकसभेत जाहीर केले. आणि १९५६ च्या एक नोव्हेंबर रोजी हे द्वैभाषिक राज्य अस्तित्वातही आले. यशवंतराव चव्हाण हे त्याचे मुख्यमंत्री झाले. मराठवाड्याचा समावेश महाराष्ट्रात झाल्यामुळे एका अर्थाने प्रांतपुनर्रचनेचा प्रश्न मराठवाड्यापुरता सुटलेला होता. परंतु खरा संयुक्त महाराष्ट्र अद्याप व्हावयाचा होता. त्यामुळे द्वैभाषिक राज्यातही संयुक्त महाराष्ट्राचा लढा चालूच राहिला. १९५७ मध्ये मुंबई राज्यात निवडणुका घेतल्या गेल्या. त्या निवडणुकांत संयुक्त महाराष्ट्र समितीने सर्व जागा लढवल्या. विधानसभेत काँग्रेसला १३६ जागा मिळाल्या तर संयुक्त महाराष्ट्र समितीला १२८ मिळाल्या. लोकसभेसाठी काँग्रेसला २० तर संयुक्त महाराष्ट्र समितीला २३ जागा मिळाल्या. लोकमताच्या विरोधात हटवादी भूमिका घेऊन शासन चालवले तर लोकाधार कसा नष्ट होतो याचे ते उत्तम उदाहरण होते. द्वैभाषिक राज्याला असलेला विरोध जनतेने त्या निवडणुकीत मतांद्वारे व्यक्त केला होता. काठावरचे बहुमत मिळालेले असले तरी हा निकाल म्हणजे काँग्रेसला बसलेला एक जबरदस्त धक्का होता. त्यामुळे स्वतःच निर्माण केलेल्या द्वैभाषिक राज्याचा पुर्नविचार करणे काँग्रेसला भाग होते. म्हणून ६ जून १९५९ रोजीच्या बैठकीत या द्वैभाषिकाच्या प्रश्नावर निर्णय घेण्याचे अधिकार काँग्रेस कार्यकारिणीने अध्यक्षा इंदिरा गांधी यांना दिले. द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची स्थिती मोठी अडचणीची झाली होती. त्यांच्यावर एकीकडे जनमताचा रेटा होता आणि दुसरीकडे काँग्रेसच्या केंद्रीय नेत्यांसमोर दंड थोपटण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यामुळे औरंगाबाद येथे सरस्वती भुवन शाळेच्या मैदानावर २१ नोव्हेंबर १९५९ रोजी झालेल्या त्यांच्या भाषणात त्यांनी लोकांना सबुरीचा सल्ला देत संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सामोपचाराने सोडवण्याचे

आवाहन केले. तसेच नागपूर करारानुसार मराठवाडा आणि विदर्भाच्या हक्कांचे संरक्षण करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. दरम्यान मुंबई विधानसभेत द्वैभाषिक राज्याच्या विभाजनाचा प्रस्ताव तयार केला गेला आणि तो केंद्र शासनाकडे पाठवण्यात आला. तेव्हाचे गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी तो प्रस्ताव लोकसभेसमोर ठेवला. तो प्रस्ताव लोकसभेने आधी अभ्यास समितीकडे पाठवला. नंतर त्या अभ्यास समितीच्या अहवालावर प्रदीर्घ चर्चा होऊन २१ एप्रिल १९६० रोजी मुंबई द्वैभाषिकाच्या विभाजनाचा ऐतिहासिक ठराव लोकसभेने संमत केला. २३ एप्रिलला तो ठराव राज्यसभेनेही मंजूर केला आणि मराठी भाषिकांचे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले.

✿

# मराठवाडा जनता विकास परिषदेचा जन्म

हैदराबाद संस्थान मुक्त होऊन स्वतंत्र भारतात दाखल झाल्यापासून मराठवाडा प्रदेशाच्या विकासासाठी गोविंदभाईंनी हरतऱ्हेचे प्रयत्न सुरू केले होते. हैदराबाद राज्यातील इतर विभागांपेक्षा मराठवाडा हा अत्यंत मागासलेला होता. दीर्घकाळच्या निजामी राज्यात अज्ञान, निरक्षरता, दारिद्र्य आणि उपेक्षा यांनी भरडल्या गेलेल्या ह्या प्रदेशात शिक्षण, शेती, उद्योगधंदे, रोजगार आणि वाहतुकव्यवस्था या बाबी विकसित होऊच शकल्या नव्हत्या. लोकांची आर्थिक स्थिती हलाखीची होती. जीवनमान अतिसामान्य आणि त्रासाचे होते. निजामाच्या सरंजामी राज्यपद्धतीमुळे झालेली अधोगती आणि कुचंबणा ही जनतेने निजामाविरुद्ध दिलेल्या लढ्याची प्रमुख कारणे होती. त्यामुळे निजामाच्या जोखडातून मुक्त झाल्यावर मराठवाड्याची भराभर प्रगती व्हावी अशी इथल्या लोकांची अपेक्षा होती. नव्याने स्वतंत्र झालेल्या हैदराबाद राज्यात बी. रामकृष्णराव हे मुख्यमंत्री तर डॉ. चेन्ना रेड्डी हे नियोजन मंत्री होते. सर्वसामान्य जनतेच्या गरजा आणि आकांक्षा ह्या गोष्टींच्या आधारे विकासाचे नियोजन व्हावयास हवे अशी गोविंदभाईंची ठाम श्रद्धा होती. तीनुसार, १९५५ साली मराठवाड्यातील लोकांच्या मागण्या हैदराबाद राज्याच्या नियोजनमंत्र्यांपर्यंत पोहोचवाव्यात असे गोविंदभाईंनी ठरवले. त्यासाठी त्यांनी एक शिष्टमंडळ गठित केले. त्या शिष्टमंडळात गोविंदभाईंखेरीज स्वतः स्वामीजी, राघवेंद्रराव दिवाण, कॉ. व्ही. डी. देशपांडे, माधवराव नेरळीकर, बॉ. श्रीधर वामन नाईक, शंकरराव चव्हाण, नरसिंगराव काटीकर आणि देवीसिंह चौहान ही मंडळी होती. गोविंदभाईंनी तयार केलेल्या एका प्रदीर्घ निवेदनावर सगळ्यांनी चर्चा करून त्यास अंतिम स्वरूप दिले, आणि ३० एप्रिल १९५५ रोजी नियोजनमंत्र्यांना भेटून ते निवेदन

सादर केले. मराठवाड्यातील शेतीसिंचन आणि जलविद्युतनिर्मितीसाठी धरणे बांधावीत, बहुतांशाने कोरडवाहू असलेल्या शेतजमिनीत नालाबंडिंगची कामे हाती घ्यावीत, मराठवाड्यातील पीकरचना ध्यानी घेऊन सूत, कापड, तेल आणि साखरउद्योग सुरू करावेत, आणि सुचविलेल्या मार्गांवर रस्ते आणि लोहमार्ग बांधावेत अशा विकासविषयक मागण्या त्या निवेदनात होत्या. त्याचप्रमाणे मराठवाड्यातील शिक्षणाच्या वाढीसाठी एक विद्यापीठ, आणि तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि शेतकी महाविद्यालये सुरू करावीत अशीही मागणी त्यात होती. १९५५ सालचे ते निवेदन म्हणजे मराठवाड्याच्या विकास चळवळीच्या इतिहासातला एक महत्त्वाचा दस्तऐवजच आहे. त्यानिमित्ताने मागासलेल्या मराठवाड्याच्या सर्वंकष विकासासाठी गोविंदभाईंनी अनेक कार्यकर्त्यांना पक्षीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र आणले. अशा तऱ्हेने एकत्रित झालेल्या कार्यकर्त्यांचे एक 'मराठवाडा विकास मंडळ' बनले. त्या विकास मंडळाचे पहिले संमेलन १९५६ साली मार्च महिन्यात घेण्यात आले. गोविंदभाई हे त्या संमेलनाचे संयोजक होते तर बाबासाहेब परांजपे हे अध्यक्ष होते. त्या संमेलनात ज्या मागण्या करण्यात आल्या त्यांमध्ये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतहत मराठवाड्याच्या विकासासाठी ३५ कोटी रुपये द्यावेत, येथे ५०० खाटांचे एक सुसज्ज इस्पितळ उभारावे, विधी महाविद्यालयास परवागनी द्यावी, आणि विद्यापीठासोबतच शेतकी, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू करावीत अशा महत्वाच्या गोष्टी अंतर्भूत होत्या. त्याचप्रमाणे औरंगाबाद-परळी, सोलापूर-नांदेड, आदिलाबाद-माणिकगड या तीन रेल्वेमार्गांचीही मागणी केलेली होती. उपरोक्त मागण्यांसाठी मराठवाडा विकास मंडळातर्फे धरणे धरले गेले. आणि त्यानंतर १९ मार्च १९५६ रोजी त्यासंबंधीचे एक निवेदन हैदराबाद सरकारला देण्यात आले. हैदराबादचे तेंव्हाचे मुख्यमंत्री बी. रामकृष्णराव यांनी त्या निवेदनाचा विचार करून औरंगाबाद येथे एक वैद्यकीय आणि एक अभियांत्रिकी महाविद्यालय, परभणी येथे शेतकी महाविद्यालय, नांदेड येथे आयुर्वेद महाविद्यालय, लातूर येथे एक तंत्रनिकेतन, आणि मोमिनाबाद (आताचे अंबेजोगाई) येथे एक विज्ञान महाविद्यालय एवढ्या संस्था येत्या वर्षापासून सुरू करण्याची घोषणा ५ जून १९५६ रोजी केली. मात्र त्या वेळी मराठवाड्यासाठी विद्यापीठ देण्याच्या प्रश्नावर मात्र काही निर्णय झाला नाही. पूर्वीच्या निजामी राजवटीत शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. शालेय शिक्षण मराठीत होत नसे. आणि महाविद्यालयीन शिक्षणातही इंग्रजी ऐवजी उर्दू हेच माध्यम होते. त्यातही शालेय

शिक्षण पूर्ण करणाऱ्या मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणासाठी हैदराबादेस जावे लागे. हैदराबाद मुक्त झाल्यानंतर शाळांमधून मराठी आणि महाविद्यालयीन शिक्षणातही इंग्रजी माध्यम आले. परंतु मागास मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना एकाएकी झालेला हा माध्यम बदल जड जात होता. हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठांच्या परीक्षांमध्ये इतर विभागातील विद्यार्थ्यांसोबत परीक्षेला बसलेले मराठवाड्याचे विद्यार्थी तुलनेने मागे पडण्याचा धोका होता. इतरत्र सगळीकडे एकेका जिल्ह्यात दोन-तीन महाविद्यालये असत. परंतु मराठवाड्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कुठे एखादे महाविद्यालय निघालेले होते. येथील महाविद्यालयीन शिक्षणाची गती आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी मराठवाड्यात एक वेगळे विद्यापीठ स्थापन करण्याची गरज गोविंदभाईंना जाणवत होती. म्हणून मराठवाडा विकास मंडळाच्या व्यासपीठावरून त्यांनी मराठवाडा विद्यापीठ आणि मराठवाड्यासाठी वेगळे शिक्षण मंडळ मिळावे या मागण्या केल्या. त्यासाठी कार्यकर्त्यांचे एक शिष्टमंडळ २९ जुलै १९५६ रोजी मुख्यमंत्र्यांना पुन्हा भेटले. तसेच मराठवाड्यातील जनतेच्या सोयीसाठी हैदराबाद हायकोर्टाचे एक खंडपीठ औरंगाबाद येथे व्हावे म्हणून ८ ऑक्टोबर १९५६ रोजी मंडळाच्यावतीने दोन शिष्टमंडळांनी सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांची भेट घेतली. त्यानंतर हैदराबादचे भाषावार विभाजन झाले.

हैदराबादचे विभाजन करून विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रासह एकभाषिक राज्यात सामील होताना मराठवाड्याच्या विकासाला प्राधान्य देण्याची अट पश्चिम महाराष्ट्राने मान्य केलेली होती. १९५३ मध्ये झालेला नागपूर करार हा त्याचा साक्षी होता. त्याशिवाय देशातील अविकसित विभागांच्या विकासाला प्राधान्य देण्यासाठी काही खास तरतुदी करण्याची सोय नव्या राज्यघटनेने कलम ३७१ (२) अन्वये करून दिलेली होती. परंतु नोव्हेंबर १९५६ मध्ये स्थापन झालेल्या द्वैभाषिक राज्यात असो वा पुढे १९६० मध्ये झालेल्या संयुक्त महाराष्ट्रात असो, मराठवाड्याच्या विकासाची उपेक्षाच होत राहिली. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर १९६२ सालच्या विधानसभेच्या निवडणुकीत मराठवाड्याच्या विकासाच्या प्रश्नांवर गोविंदभाईंनी औरंगाबाद मतदारसंघातून निवडणूक लढवली. गोविंदभाई औरंगाबादचे होते, तोपर्यंतचे सारे आयुष्य त्यांनी मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी दिलेले होते. या विभागाच्या विकासाबद्दल त्यांना असणारी तळमळ लोकांना ज्ञात होती. त्यांच्या विरोधात काँग्रेसने डॉ. रफिक झकेरिया यांना उमेदवारी दिली. झकेरिया हे मुंबईचे,

औरंगाबादच्या जनतेला त्यांचा पूर्वपरिचय नव्हता आणि हैदराबादच्या मुक्तिसंग्रामाशी त्यांचा कोणताही संबंध नव्हता. त्यामुळे गोविंदभाई हमखास निवडून येणार असे सगळ्या कार्यकर्त्यांना वाटत होते. परंतु काँग्रेसने ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची बनवली होती. महात्मा गांधींच्या विचारांचा वारसा असलेला पक्ष असा काँग्रेसचा प्रचार होत असे. शिवाय भरपूर पैसा आणि मोठी प्रचार यंत्रणा काँग्रेसने त्या निवडणुकीत वापरली. झकेरियांच्या प्रचारासाठी दस्तुरखुद्द पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे औरंगाबादेत दाखल झाले. या साऱ्या गोष्टींचा प्रभाव मतदारांवर पडणे साहजिक होते. त्या निवडणुकीत अवघ्या चार हजार मतांनी गोविंदभाईंचा पराजय झाला.

परंतु निवडणुकीच्या काळात मराठवाड्याच्या विकासाचे जे प्रश्न गोविंदभाईंनी उभे केलेले होते त्यांची कांस त्यांनी सोडली नाही. मराठवाड्यातील दरडोई उत्पन्नाची सरासरी वाढवणे, राज्यघटनेतील तरतुदीनुसार मराठवाड्यासाठी वैधानिक विकास मंडळ स्थापन करणे, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांमधील विकासात असलेली तफावत दूर करण्यासाठी पावले उचलणे, गोदावरीच्या पाण्याचा न्याय्य वाटा मराठवाड्यासाठी मिळवणे, मराठवाड्यात विद्युतनिर्मिती प्रकल्पांच्या उभारणीस चालना देणे, कृषिउद्योग प्रस्थापित करणे, येथे मोठे सार्वजनिक उद्योग स्थापन होतील हे पाहणे आणि शिक्षणविकासासाठी संस्थांची उभारणी करून त्यांच्या वाढीसाठी शासकीय अनुदानाचा न्याय्य वाटा मिळवणे या गोविंदभाईंनी पुढे आणलेल्या निकडीच्या प्रश्नांचा रेटा जाणवल्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांनी ऑक्टोबर १९६४ मध्ये १९ व २० तारखांना दोन दिवसांची एक 'मराठवाडा विकास परिषद' औरंगाबादेत घेतली. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष विनायकराव पाटील आणि पाटबंधारेमंत्री शंकरराव चव्हाण यांनी ही परिषद भरवण्यात पुढाकार घेतला होता. या परिषदेच्या पूर्वतयारीसाठी आणि कार्यक्रम पत्रिकेच्या निश्चितीसाठी ज्या बैठका झाल्या त्यात विरोधी पक्षांच्या नेत्यांनाही पाचारण करण्यात आले. त्यामुळे स्वामीजी, गोविंदभाई, कॉ. चंद्रगुप्त चौधरी, कॉ. व्ही. डी. देशपांडे, अनंत भालेराव, विनायकराव चारठाणकर ह्या लोकांनी त्यात भाग घेतला. या मराठवाडा विकास परिषदेच्या अध्यक्षस्थानी विनायकराव पाटील होते तर बाळासाहेब पवार हे स्वागताध्यक्ष होते. आबासाहेब गरवारे आणि शंतनुराव किर्लोस्कर हे ख्यातनाम उद्योगपतीही या परिषदेस उपस्थित होते. शिवाय सुमारे ९०० प्रतिनिधी मराठवाडा आणि महाराष्ट्राच्या विविध भागांतून आले होते. या

परिषदेत मराठवाड्याच्या अनेक विकासप्रश्नांचा उहापोह झाला. अनंत भालेरावांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध होणाऱ्या 'दैनिक मराठवाडा' या वृत्तपत्राने १९ ऑक्टोबर १९६४ रोजी काढलेल्या खास विकास पुरवणीत त्या सर्व प्रश्नांचे स्वरूप स्पष्ट केले. त्यावेळी देशाच्या चौथ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार होऊ घातला होता. चौथ्या योजनेत मराठवाड्याला कोणकोणत्या गोष्टी प्राधान्याने मिळावयास हव्यात हा त्या मराठवाडा विकास परिषदेतील कळीचा मुद्दा होता.

या मराठवाडा विकास परिषदेनंतर २५ आणि २६ ऑक्टोबर १९६४ रोजी पुण्यात एक महाराष्ट्र औद्योगिक विकास परिषद झाली. त्या परिषदेत महाराष्ट्रातील मागास भागांच्या औद्योगिक विकासाचा विचार प्राधान्याने व्हावा असे प्रतिपादन गोविंदभाईंनी २५ ऑक्टोबरच्या 'दै. मराठवाडा' च्या अंकात लिहिलेल्या एका लेखात केले होते. राज्यातील मागास भाग कोणते हे ठरवण्यासाठी तेथील लोकसंख्येत आर्थिक मानाने उच्च, मध्यम आणि कनिष्ठवर्गीयांचे असलेले प्रमाण, कारखान्यांची संख्या, विजेचा खर्च, रस्ते आणि रेल्वेमार्गांची लांबी, शिक्षणाचा दर्जा, तंत्रशिक्षणसंस्थांची संख्या, साक्षरतेचे प्रमाण, कामगारांची उपलब्धता व त्यांचे जीवनमान, आणि लोकांची क्रयशक्ती असे नऊ निकष गोविंदभाईंनी सांगितले होते. मात्र शासनाने या निकषांनुसार विभागवार पाहणी न करता शहर आणि खेडेवार पाहणी केली. परिणामतः तुलनेने प्रगत असलेल्या पश्चिम महाराष्ट्रातही विदर्भ-मराठवाडा-कोकण या प्रदेशांप्रमाणे काही शहरे व खेडी अविकसित आहेत असे दाखवून 'संपूर्ण महाराष्ट्रच मागास आहे' असा चमत्कारिक निष्कर्ष काढला! राज्यातील विकसित आणि अविकसित भागांमधील तफावत शोधण्याच्या बाबीची सरमिसळ विकसित भागातील शहरे व खेडी यांमधील तफावतीशी करून शासनाने मराठवाड्याच्या तोंडाला पाने पुसली. मागास भागांच्या विकासाला चालना देण्यासाठी 'विकास महामंडळे' स्थापन करण्याची मागणी होती. तर शासनाने १९६८ साली मराठवाडा, विदर्भ, कोकण यांजबरोबर पश्चिम महाराष्ट्रातही विकास महामंडळ स्थापन केले. आणि विभागीय असमतोल दूर करण्याची गोष्ट बाजूलाच राहिली. देशाच्या सहाव्या पंचवार्षिक योजनेत जी दहा उद्दिष्टे नमूद होती त्यापैकी दोन अत्यंत महत्त्वाची उद्दिष्टे गाळून राज्यसरकारने आपला सहाव्या योजनेचा मसुदा तयार केला होता. विभागीय असमतोल नष्ट करण्यासाठी राज्याने केलेल्या तांत्रिक प्रगतीचे सर्व लाभ मागास विभागांना मिळतील याची व्यवस्था करणे, आणि विकासाबद्दल लोकांशी संवाद साधून विकासप्रक्रियेत संस्थात्मक पातळीवरील

लोकसहभाग वाढवणे ही ती उद्दिष्टे होती. राज्यसरकार विकासाबाबत लोकभावनेला डावलून मराठवाड्याची उपेक्षा करीत आहे अशी गोविंदभाईंची खात्री पटली. त्यामुळे त्यांनी मराठवाडाभर दौरा करून कार्यकर्त्यांशी चर्चा केली आणि जनतेच्या विकासाबाबतच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी एक सर्वपक्षीय जनता विकास परिषद उभी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १९७० साली गोविंदभाईंच्याच अध्यक्षतेखाली 'मराठवाडा जनता विकास परिषद' स्थापन झाली.

✿

# विकासाच्या चळवळी, आणि वैधानिक विकास मंडळे

१९७० पासून १९९४ पर्यंतच्या चोवीस वर्षांच्या काळात मराठवाड्यात विकासाची जी कामे झाली त्यांसाठी गोविंदभाईंनी केलेला सततचा पाठपुरावा, योजनांचे किचकट तपशील मुखोद्गत करून शासनाशी केलेल्या वाटाघाटी, आणि मराठवाडा जनता विकास परिषदेच्या माध्यमातून गरज पडेल तेव्हा उभी केलेली विभागव्यापी आंदोलने ह्या गोष्टी कारणीभूत आहेत हे एक ऐतिहासिक सत्य आहे. या साऱ्या काळात निरलस वृत्तीने परंतु कणखरपणा बाळगत गोविंदभाई मराठवाड्याच्या विकासासाठी झटले. स्वातंत्र्यासाठी जे झगडले त्यांची जबाबदारी स्वातंत्र्याची फळे सामान्यातल्या सामान्य माणसापर्यंत पोहोचतील हे पाहण्याची आहे असे ते मानत. विकास हवा, परंतु त्या विकासाला सामाजिक न्यायाची जोड मिळणे हे लोकशाहीत आवश्यक आहे असे ते सांगत. ते म्हणत की शासनानेही अशी प्रागतिक भूमिका घेणे आवश्यक आहे. जे मागे पडलेले आहेत त्यांना मदतीचा हात देऊन आपल्या बरोबर आणण्यातूनच खरी संस्कृती निर्माण होते हे विसरता कामा नये असे त्यांचे मत होते. म्हणूनच स्वत: कुठल्याही सत्तापदापासून दूर राहत त्यांनी समर्पित वृत्तीने मराठवाड्याच्या विकासाचे अनेक प्रश्न पुढे मांडले आणि काही सोडवले. जुन्या मराठवाडा विकास मंडळाच्या मागणीनुसार औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठ आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी महाविद्यालये स्थापन झाली होती. मराठवाड्यासाठी वेगळे माध्यमिक शिक्षण मंडळही मिळाले होते. परंतु विकासाच्या इतर अनेक मागण्या अद्याप पूर्ण झालेल्या नव्हत्या. परभणी येथे असलेल्या कृषिमहाविद्यालयात मराठवाड्याच्या विद्यार्थ्यांना सापत्नभावाची वागणूक मिळत असे. त्याबद्दल अनेक वर्षे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष होता. १९७२ साली त्या

असंतोषाचा भडका उडाला आणि त्या विद्यार्थ्यांनी न्यायासाठी आंदोलन सुरू केले. आंदोलक विद्यार्थी जेव्हा मार्गदर्शनासाठी गोविंदभाईंकडे आले तेव्हा मराठवाड्यासाठी वेगळ्या कृषिविद्यापीठाची मागणी गोविंदभाई करीत आलेले आहेत हे त्यांना उमगले. मग त्या आंदोलनाचे रुपांतरच "मराठवाडा कृषि-विद्यापीठ" आंदोलनात झाले. गोविंदभाईंच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग असलेले ते विकासाचेच एक आंदोलन बनले. मराठवाड्यातून जाणाऱ्या मनमाड - काचीगुडा मीटर गेज आणि लातूर - मिरज नॅरोगेज रेल्वेमार्गांचे रुंदीकरण व्हावे अशी मागणी गोविंदभाईंनी केलेली होती. त्याचप्रमाणे औरंगाबाद - परळी, सोलापूर - नांदेड आणि आदिलाबाद - माणिकगड या नव्या रेल्वेमार्गाची जुनी मागणीही अद्याप पूर्ण झालेली नव्हती. मराठवाड्यासाठी हायकोर्टाचे एक खंडपीठ औरंगाबादेत द्यावे ही मागणी देखील जुन्या हैदराबाद राज्यापासून प्रलंबित होती. महाराष्ट्रात शासनाने विभागीय असमतोल दूर करण्यासाठी पावले उचलावीत यासाठी वारंवार निवेदने देऊन, शिष्टमंडळे नेऊन आणि चर्चा घडवूनही उपयोग होत नव्हता. म्हणून १९७३ मध्ये गोविंदभाई मराठवाडा जनता विकास परिषदेचे एक शिष्टमंडळ घेऊन दिल्लीला तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना भेटण्यासाठी गेले. त्यावेळी पंतप्रधानांना दिलेल्या निवेदनात अभ्यासपूर्ण अशी आकडेवारी देऊन गोविंदभाईंनी महाराष्ट्र सरकार हे मराठवाड्याच्या विकासाकडे दुर्लक्ष करून राज्यातील विकासाचा असमतोल वाढवण्यास कारणीभूत होत आहे ही गोष्ट निदर्शनास आणून दिली. हा वाढत जाणारा असमतोल दूर करण्यासाठी राज्यघटनेतील कलम ३७१ (२) अन्वये मराठवाड्यासाठी वैधानिक विकास मंडळ स्थापन केले जावे, आणि त्या मंडळाने राज्यपालांच्या अधिकारकक्षेत राहून मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष दूर करावा अशी मागणी त्यांनी केली.

१९७४ साली मराठवाड्यात युवकांचे एक उग्र आंदोलन झाले. परभणी जिल्ह्यातील वसमत येथे एका खात्यात नोकरभरतीसाठी मुलाखती घेण्यात येत होत्या. तिथे मराठवाड्यातील हजारो बेकार तरुणांना मुलाखतीसाठी बोलावले गेले होते. प्रत्यक्षात तिथे अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारातून मराठवाड्याबाहेरच्या काही ठराविक व्यक्तींच्या नेमणुका होत आहेत हे जमलेल्या हजारो युवकांना दिसले. त्यांनी निदर्शने सुरू केली. काही वेळाने तरुणांचा तो जमाव प्रक्षुब्ध झाला. पोलिस आले आणि त्यांनी त्या बेकार युवकांवर गोळीबार केला. त्या गोळीबारात दोन माणसे ठार झाली. ते वृत्त मराठवाड्यात पसरले तसा सर्वत्र असंतोष पसरला. संपूर्ण

मराठवाड्यातून लोकांची आंदोलने सुरू झाली. वसमतची ती घटना मराठवाड्यातील बेकारांच्या अन्याय्य शोषणाचे द्योतकच होती. रोजगाराच्या संधींची कमतरता. गरीब आणि सामान्य युवकांना डावलून भ्रष्ट मार्गाने होणारी नोकरभरती आणि मराठवाड्यातील लायक उमेदवारांची उपेक्षा ह्या गोष्टींमुळे मराठवाडा जनता विकास परिषद त्या आंदोलनात सामील झाली. आंदोलनाचे नेतृत्व गोविंदभाईंकडे आले. मराठवाड्याचे आयुक्तालय औरंगाबादेत असल्यामुळे मराठवाडा जनता विकास परिषदेने तिथे सर्व शक्तीनिशी निदर्शनांना सुरुवात केली. लोकांमधील असंतोष एवढा मोठा होता की औरंगाबादच्या निदर्शनानेही उग्र स्वरूप धारण केले. जमावाला काबूत आणण्यासाठी म्हणून पोलिसांनी गोळीबार केला. त्यात चार युवक ठार झाले आणि अनेक जखमी झाले. संतप्त गोविंदभाईंनी 'मराठवाडा बंद'ची हांक दिली. संपूर्ण मराठवाड्यात एक अभूतपूर्व असा कडकडीत हरताळ पाळला गेला. बंदच्या दिवशी शेकडो लोकांना अटक झाली. ह्या आंदोलनांनंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांना चर्चेसाठी मुंबईस बालावले. मराठवाड्यातील बेकारीच्या मोठ्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी या विभागात औद्योगीकरणाला चालना देणे, मागणी केलेले काही सिंचनप्रकल्प त्वरित मान्य करणे, रेल्वेमार्गांचे रुंदीकरण हाती घेणे, १९ तालुके हे 'दुष्काळी तालुके' म्हणून केंद्रशासनास घोषित करावयास लावणे, आदि उपाययोजना मुख्यमंत्र्यांनी मान्य केल्या आणि ते शिष्टमंडळ परतले. परंतु राज्यशासनाने दिलेली आश्वासने निष्फळ ठरली.

१९७४ मध्येच मराठवाड्यातील मनमाड - काचीगुडा आणि लातूर मिरज या दोन रेल्वेमार्गांच्या रुंदीकरणासाठी गोविंदभाईंनी आंदोलन सुरू केले. आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी मराठवाड्यात अनेक ठिकाणी 'रेल्वे रोको' सत्याग्रह झाले. धर्माबाद, नांदेड, पूर्णा, परभणी, जालना, औरंगाबाद, रोटेगांव अशा निरनिराळ्या ठिकाणी आंदोलकांनी रेल्वेगाड्या रोकून धरण्यास सुरूवात केली. रेल्वेमार्गाच्या रुंदीकरणामुळे हैदराबाद, मुंबई, नागपूर आणि इतर सर्व मोठ्या शहरांसमवेत थेट व्यापारी संबंध प्रस्थापित होऊन मराठवाड्याच्या विकासाला जोमदार गती मिळू शकते हे गोविंदभाईंनी ताडले होते. त्या रेल्वे आंदोलनास समाजाच्या सर्वच स्तरांतून मोठा प्रतिसाद मिळाला. विद्यार्थी, शिक्षक, गृहिणी, डॉक्टर्स, वकील, सर्व पक्षांचे राजकीय कार्यकर्ते, कामगार, मजूर असे सगळ्या थरांतले लोक आंदोलनात उतरले. औरंगाबाद येथे स्वतः गोविंदभाईंच्या नेतृत्वाखाली रेल्वे रोको

सत्यागृह झाला. कोणत्याही कृतीचे नियोजन बारकाईने करून पद्धतशीर रीतीने त्याची अंमलबजावणी करण्याची हातोटी गोविंदभाईंजवळ होती. औरंगाबाद शहरात त्यावेळी संचारबंदी लागू झालेली होती. राखीव पोलिसदलाच्या दोन डिव्हिजन्स तळ ठोकून होत्या. रेल्वेस्टेशनच्या परिसरात जमावबंदी होती. गोविंदभाईंच्या सूचनेनुसार सर्व आंदोलक गाडी येण्याच्या एक तास आधी निरनिराळ्या मार्गांनी रेल्वेस्टेशनच्या पाठीमागे असलेल्या एका कारखान्याच्या आवारात जमले. काही कार्यकर्ते स्टेशनवर पाठवून कारखान्यात जेवढे लोक गोळा झाले होते त्या सर्वांची औरंगाबादपासून आठ किलोमीटर अंतरावरचे पहिले स्टेशन चिकलठाण्यापर्यंतची तिकिटे काढली गेली. प्लॅटफॉर्मवर प्रवेश करताच विनातिकिट आल्याबद्दल अटक केली जाऊ नये म्हणून ही खबरदारी घेतली गेली. मग ती तिकिटे घेऊन सगळे आंदोलक एकेक करून रेल्वेस्टेशनवर आले. स्टेशनात रेल्वे येताच कार्यकर्त्यांच्या घोषणांच्या कल्लोळात गोविंदभाई रुळांवर उतरले आणि आडवे झाले. त्यांच्या पाठोपाठ हजारो कार्यकर्तेही खाली उतरून रुळांवर झोपले. हळूहळू जवळ येणारी रेल्वेगाडी पूर्ण थांबली. त्यानंतर आंदोलकांनी सुमारे तासभर ती गाडी स्टेशनातच रोकून धरली. सर्व सत्याग्रही विकासाच्या घोषणा देत होते. रेल्वे रुळांवर उभे राहूनच गोविंदभाईंनी आंदोलकांसमोर एक छोटेसे भाषण केले. अखेर पोलिसांची कुमक आली आणि सर्व सत्याग्रहींना अटक करून हर्सूलच्या तुरुंगात नेण्यात आले. सायंकाळी जेव्हा पोलिसांनी सत्याग्रहींना सोडून दिले तेव्हा गावांत संचारबंदी होती. पायी घरी परतणाऱ्या सत्याग्रहींना पोलिस नाहक मारहाण करतील ही चिंता गोविंदभाईंना वाटत होती. त्या वेळचे विभागीय पोलिस महासंचालक चौबळ यांनी गोविंदभाईंना घरी पोहोचवण्यासाठी एका वाहनाची व्यवस्था केली होती. गोविंदभाईंनी ते वाहन नाकारले. ते चौबळांना म्हणाले की सर्व आंदोलकांना सुरक्षित घरी पोहोचवण्याची व्यवस्था तुम्ही करणार असाल तरच मी वाहन स्वीकारतो. अन्यथा मीही पायीच घरी जाईन. गोविंदभाईंच्या निग्रहामुळे शेवटी चौबळांनी एस.टी.च्या काही बसगाड्या आणवून घेतल्या आणि सर्व सत्याग्रहींना घरी पोहोचवण्याची व्यवस्था केली. रेल्वे रुंदीकरणासाठी मराठवाडा जनता विकास परिषदेने सातत्याने केलेल्या आंदोलनांमुळेच मनमाड ते मुदखेड ह्या रेल्वेमार्गाचे रुंदीकरण होऊ शकले. आता लातूर - लातूररोड या नव्या तीस किलोमीटर लोहमार्गामुळे लातूर स्टेशन हे परळी - हैदराबाद लोहमार्गाला जोडले गेले आहे. आणि लातूर - मिरज रेल्वेमार्गाच्या

रुंदीकरणासाठीही सर्वेक्षण पार पडले आहे.

त्यानंतर १९८१ आणि १९८४ या सालांत आलेल्या महाराष्ट्राच्या दोन मुख्यमंत्र्यांनी मराठवाड्यासाठी अनुक्रमे ३५ कलमी आणि ४२ कलमी असे दोन विकास कार्यक्रम जाहीर केले. पण ते कागदावरच राहिले. हळूहळू पश्चिम महाराष्ट्राच्या नेतृत्वाची भूमिका बदलू लागली. प्रादेशिक असमतोल वगैरे काही अस्तित्वात नाही. मागास भागांची ओरड ही अनाठायी आहे असा पवित्रा ते घेऊ लागले. विदर्भ आणि मराठवाड्याशी केलेला नागपूर करार, त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांनी मागास विभागांना दिलेली वचने, नंतरच्या मुख्यमंत्र्यांनी वेळोवेळी दिलेली आश्वासने या साऱ्या गोष्टी अनावश्यक होत्या असेच पश्चिम महाराष्ट्राच्या नेतृत्वाला वाटू लागले. नंतरचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी मागास विभागांचा नेमका अनुशेष किती आहे हे शोधण्यासाठी अर्थतज्ज्ञ डॉ. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. मराठवाड्याचे एक निवृत्त सनदी अधिकारी भुजंगराव कुलकर्णी हेही त्या समितीचे सदस्य होते. विभागीय अनुशेष काढावयास नेमलेल्या दांडेकर समितीने तालुका हा घटक धरून अनुशेष काढला होता. मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या तीनही विभागांचा १९८२ सालच्या किंमतींवर आधारित एकत्रित अनुशेष हा तीन हजार एकशे शहाऐंशी कोटी रुपयांचा आहे असा दांडेकर समितीचा निष्कर्ष होता. त्या अनुशेषात मराठवाड्याचा वाटा २३ टक्के, विदर्भाचा ३९ टक्के तर पश्चिम महाराष्ट्राचा ३७.५ टक्के दाखवलेला होता. हा अनुशेष पंचवार्षिक योजनेच्या काळात दूर करून नंतर दर पांच वर्षांनी आढावा घ्यावा अशी शिफारस दांडेकर समितीने केलेली होती. परंतु ती महाराष्ट्र शासनाने मान्य केली नाही.

गोविंदभाई हे दांडेकर समितीच्या निष्कर्षांवर समाधानी नव्हते. खेडे हा घटक धरून विभागाचा अनुशेष काढण्याची पद्धत सदोष आहे असे त्यांचे ठाम मत होते. तसे केल्याने एखाद्या अत्यंत पुढारलेल्या प्रदेशाचा अनुशेष मागास विभागापेक्षा मोठा दाखवता येतो, आणि दांडेकर समितीने नेमके तेच केले आहे अशी त्यांची भूमिका होती. अर्थात, जे हाती आहे त्याच्या सहाय्याने पुढे जात राहिले पाहिजे ही गोविंदभाईंची वृत्ती होती. दांडेकर समितीने मराठवाड्याचा जो काही अनुशेष काढलेला आहे त्याची भरपाई महाराष्ट्राचे राज्यसरकार करणार नाही याची त्यांना खात्री होती. त्यासाठी राज्यसरकारच्या अखत्यारीबाहेरची यंत्रणा असणे गरजेचे होते. म्हणून गोविंदभाईंनी मराठवाडा जनता विकास परिषदेमार्फत वैधानिक विकास

मंडळाची मागणी रेटणे सुरू ठेवले. राज्यघटनेच्या ३७१ (२) या कलमान्वये स्थापन करता येणारे हे मंडळ सिंचन, तंत्रशिक्षण आणि लोकसंख्येच्या प्रमाणांत शासकीय नोकऱ्यांतील वाटा या गोष्टी राज्यपालांच्या अखत्यारीत उपलब्ध करून देईल अशी तरतूद भारताच्या संविधानात आहे. त्या तरतुदीचा फायदा मराठवाड्याला मिळावा असा गोविंदभाईंचा प्रयत्न होता. त्यांनी लोकप्रतिनिधींकडे त्याबाबत सतत पाठपुरावा केला. अखेर महाराष्ट्राच्या विधिमंडळाने २६ जुलै १९८४ रोजी दोन्ही सभागृहांमध्ये मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र यांसाठी तीन वैधानिक विकास मंडळे स्थापन केली जावीत असा ठराव करून ते केंद्र सरकारकडे पाठवला. गोविंदभाईंच्या मते मराठवाडा आणि विदर्भासमवेत कोंकण विभागासाठी वैधानिक विकास मंडळ मागणे हे संयुक्तिक ठरले असते. पण महाराष्ट्राच्या चतुर राजकारण्यांनी ते पश्चिम महाराष्ट्रासाठी मागितले. अर्थात्, ती गोष्टही गोविन्दभाईंनी स्वीकारली आणि त्या मागणीची पूर्तता होण्यासाठी तीनही विभागांची एक संघर्ष समिती स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्या प्रयत्नांतून तीनही विभागांची एकत्रित अशी ''महाराष्ट्र राज्य वैधानिक विकास मंडळ कृति समिती'' स्थापन केली गेली. या कृतिसमितीने वैधानिक विकास मंडळांची रचना आणि त्यासाठी राष्ट्रपतींनी काढावयाच्या अध्यादेशाचे स्वरूप यांबद्दल महत्त्वाच्या सूचना २० एप्रिल १९८८ रोजी केंद्र शासनाकडे पाठवल्या.

मंत्रीपदावर असलेले मराठवाड्याचेच शंकरराव चव्हाण यांचा वैधानिक विकास मंडळांच्या स्थापनेला कडवा विरोध होता. त्यामुळे राज्यशासन आणि लोकप्रतिनिधींच्या अधिकारांचा अधिक्षेप होऊन लोकशाहीचा संकोच होईल आणि राज्यपालांचे अधिकार वाढून राज्यपाल आणि राज्यशासन यांच्यात नाहक तंटा उभा राहील असे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या आक्षेपांबाबत गोविंदभाईंचे म्हणणे असे होते की घटनाकारांनी मागास भागांसाठी वैधानिक विकास मंडळांची तरतूद विचारपूर्वक केलेली असून त्यांच्या कार्याची तत्त्वेही निश्चित केलेली आहेत. ज्या तत्वांच्या आधारे अल्पसंख्यांकांना खास सवलती देण्याचे आपण मान्य केले आहे त्याच तत्त्वांनुसार ही वैधानिक विकास मंडळेही मान्य करावयास हवीत. मागास विभागांना बरोबरीच्या स्थानावर आणावयाचे प्रयत्न राज्य सरकारनेच करावयास हवेत. परंतु ते करण्यात राज्यसरकार हयगय करीत असेल तर मग वैधानिक विकास मंडळांमार्फत ते करण्याचे अधिकार राज्यपालास देणेच योग्य आहे, असे गोविंदभाईंचे मत होते. पुढे १९९० साली शरद पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.

त्यांच्या सरकारने वैधानिक विकास मंडळांच्या रचनेचा जो आराखडा तयार केला तो सदोष होता. वैधानिक विकास मंडळांचे स्वरूप मंत्रिमंडळाच्या एखाद्या उपसमितीसारखे राखून त्यांची मुदत केवळ पाच वर्षांपुरतीच ठेवली गेली होती. शिवाय त्या मंडळांचा राज्यपालांशी कोणताही संबंध ठेवलेला नव्हता. आणि दांडेकर समितीने शोधलेला अनुशेष भरून काढण्यापुरतीच त्यांची कार्यकक्षा मर्यादित केलेली होती. तशा पद्धतीने स्थापन होणाऱ्या वैधानिक विकास मंडळांचा मागास विभागांना काही उपयोग नव्हता. त्यामुळे घटनेच्या कलम ३७१ (२) मधील तरतुदीमध्ये अनुस्युत असलेल्या मूळ तत्त्वाचाच भंग होत होता. म्हणून गोविंदभाईंनी त्या शिफारसींना विरोध केला. मराठवाडा जनता विकास मंडळाच्या एका शिष्टमंडळाने दिल्लीस जाऊन तेव्हाचे पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंह, अर्थमंत्री आणि कायदामंत्री यांची भेट घेतली. वैधानिक विकास मंडळांची स्थापना आणि रचना यांबाबत केन्द्र सरकारकडे कोणताच तपशील उपलब्ध नव्हता. तेव्हा गोविंदभाईंनी ६ फेब्रुवारी १९९० रोजी पंतप्रधानांना एक पत्र पाठवून घटनेतील तरतूद, तीनुसार स्थापन करण्याच्या वैधानिक विकास मंडळांची उद्दिष्टे, त्यांची रचना, राष्ट्रपतींच्या अध्यादेशाचे स्वरूप, राज्यपालांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या, वैधानिक मंडळाची कार्यपद्धती, इत्यादी गोष्टींचा तपशील त्यांना सादर केला.

त्यानंतर १९९० च्या मे महिन्यात पाच आणि सहा तारखांना मराठवाडा जनता विकास परिषदेचे एक मराठवाडा पातळीवरचे अधिवेशन गोविंदभाईंनी औरंगाबाद येथे घेतले. त्या अधिवेशनात परिषदेच्या वाटचालीचा आढावा घेऊन पुढील कामांची दिशा, समोर उभ्या असलेल्या समस्या, वैधानिक विकास मंडळांची अपेक्षित रचना आणि कार्यपद्धती या गोष्टींवर चर्चा झाली. त्याचप्रमाणे मराठवाड्याच्या संबंधात नियोजनात अपेक्षित असलेले अग्रक्रम, तंत्रशिक्षणाची स्थिती, रोजगाराच्या संधी, शासकीय नोकऱ्यांतील वाटा, किमान आवश्यक असे लोहमार्ग या विषयांवर अभ्यासपूर्ण निबंध सादर केले गेले. दरम्यान केन्द्रात काँग्रेसचे पी. व्ही. नरसिंहराव हे पंतप्रधान म्हणून आले. त्यांच्या मंत्रिमंडळात शंकरराव चव्हाण हे गृहमंत्री होते. पी. व्ही. नरसिंहराव हे हैदराबादचे, हैदराबाद मुक्तिसंग्रामातले एक स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांनी गोविंदभाईंना त्यांच्या जीवनकार्याचा गौरव म्हणून 'पद्मविभूषण' हा किताब देण्याचे ठरवले. हा किताब स्वीकारण्यास गोविंदभाईंनी संमती द्यावी यासाठी प्रयत्न सुरू झाले. पंतप्रधानांच्या

वतीने शंकरराव चव्हाण हे गोविंदभाईंना भेटले. परंतु ''मला कोणताही किताब नको, त्या ऐवजी मराठवाड्यासाठी वैधानिक विकास मंडळ द्या'' असा निरोप देऊन गोविंदभाईंनी 'पद्मविभूषण' किताबासाठी संमती देण्याचे टाळले. एव्हाना गोविंदभाईंच्या वयाची ऐंशी वर्षे पूर्ण झाली होती. १९९१ साली मराठवाडयातील जनतेने गोविंदभाईंचा अमृतमहोत्सवी सत्कार करण्याचे ठरवले. सत्काराची तयारी जोरात सुरू झाली. पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहरावांच्या हस्ते हा सत्कार करण्याचे समितीने ठरवले. पंतप्रधानांनीही होकार दिला. मग १८ जानेवारी १९९२ रोजी औरंगाबादेत सरस्वती भुवन संस्थेच्या पटांगणावर हा भव्य सत्कारसमारंभ पार पडला. सत्कारास पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव, गृहमंत्री शंकरराव चव्हाण, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक ही मंडळी हजर होती. मराठवाड्यातील लोकांनी गोविंदभाईंना पंचवीस लाख रुपयांची थैली अर्पण केली. तेव्हा त्यात स्वत:च्या पाच हजार रुपयांची भर टाकून गोविंदभाईंनी ती रक्कम स्वामी रामानंद तीर्थ यांच्या स्मरणार्थ सुरू केलेल्या संशोधन संस्थेला प्रदान केली. त्या समारंभाच्या निमित्ताने नरसिंहरावांनी पुन्हा एकदा गोविंदभाईंचे मन वळवण्याचा प्रयत्न केला आणि त्यांनी पद्मविभूषण किताब स्वीकारावा या साठी आग्रह केला. तेव्हा ''मराठवाड्याला वैधानिक विकास मंडळ देण्याचे मान्य केलेत तरच मी पद्मविभूषण स्वीकारेन, अन्यथा नाही''. असे गोविंदभाईंनी सांगितले. शेवटी पंतप्रधान नरसिंहरावांनी गोविंदभाईंची ती मागणी मान्य केली. त्यांनी वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याचे अभिवचन दिले तेव्हा कुठे गोविंदभाईंनी पद्मविभूषण हा किताब स्वीकारला. त्यानंतरही तब्बल तीन वर्षे प्रतीक्षेत गेली. नंतर १९९४ साली भारताच्या राष्ट्रपतींनी मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र यांच्यासाठी वैधानिक विकास मंडळे अस्तित्वात येत असल्याचा ऐतिहासिक अध्यादेश ९ मार्च रोजी काढला. त्या अध्यादेशाच्या प्रतिपालनार्थ महाराष्ट्राच्या राज्यपालांनी ३० एप्रिल १९९४ रोजी उपरोक्त तीन वैधानिक विकास मंडळे कायम केल्याबद्दलचा आदेश जारी केला. विभागातील सिंचनाचा अनुशेष भरून काढणे. व्यावसायिक आणि तंत्रशिक्षणाच्या सोयी समन्यायी तत्त्वावर उपलब्ध करून देणे आणि शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांमध्ये विभागाला पुरेसे प्रतिनिधित्व देणे या गोष्टींची पूर्तता वैधानिक विकास मंडळांच्या द्वारे करण्याची जबाबदारी राज्यपालांकडे आली. प्रत्येक वैधानिक विकास मंडळाच्या संरचनेत तीन तज्ज्ञ व्यक्ती, एक आमदार. एक स्थानिक स्वराज्यसंस्थेचा प्रतिनिधी, विभागाचा

आयुक्त आणि एक उपायुक्त असे सात सदस्य समाविष्ट केले गेले. वरचेवर वाढत जाणारा आपला अनुशेष भरून काढून ही वैधानिक मंडळे न्यायबुद्धीने महाराष्ट्रातील विकासाचा असमतोल नष्ट करतील अशी अपेक्षा मराठवाड्याची जनता करू लागली.

✿

# विकासप्रक्रियेचे पुनरावलोकन

१९७२ मध्ये झालेल्या मराठवाडा जनता विकास परिषदेच्या स्थापनेपासून १९९४ साली झालेल्या वैधानिक विकास मंडळांच्या स्थापनेपर्यंत मराठवाडा विभागात निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये घडलेला विकास हा काही सहजगत्या घडलेला नव्हता. मराठवाडा जनता विकास परिषदेच्या झेंड्याखाली गोविंदभाईंनी जिल्हावार संघटित केलेले कार्यकर्ते आणि विषयतज्ज्ञ यांचा सखोल अभ्यास, गोविंदभाईंनी चिकाटीने केलेला प्रत्येक प्रश्नाचा पाठपुरावा, आणि त्यांच्या हांकेसरशी मराठवाड्यातील लोकांनी उभारलेली आंदोलने यांचे ते फलित होते. गोविंदभाई प्रश्नांचा अभ्यासपूर्वक विचार करून विकासाच्या मागण्या केवळ पुढे आणत असे नव्हे, तर त्यांच्यासाठी वर्षानुवर्षे प्रयत्नही करीत असत. त्याचप्रमाणे ते झालेल्या चळवळीच्या फलितांचेही विश्लेषणात्मक दृष्टीने पुनरावलोकन करीत असत. मराठवाड्यातील बहुतांश ग्रामीण जनतेची उपजीविका शेतीवर चालते. परंतु इथल्या शेतीचा विकास दीर्घकाळपर्यंत होऊ शकला नव्हता. मराठवाड्यातील लागवडीयोग्य क्षेत्रापैकी निम्मे क्षेत्र हे उथळ आणि हलक्या जमिनीचे आहे. उरलेले खोल, काळ्या जमिनीचे क्षेत्रही नत्र, स्फुरद आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे म्हणावे तसे सुपीक नाही. या खोल काळ्या जमिनीत पाण्याचा निचरा नीट होत नाही. एक पीक घेतल्यानंतरही जमिनी ओल्या राहतात. त्यामुळे दुबार पीक घेता येत नाही. हवामानात कमी आर्द्रता आणि जास्त तापमान असते. पर्जन्यमान परभणी-नांदेड जिल्ह्यात जास्त आणि इतर जिल्ह्यांत कमी असते. त्यातही वरचेवर बदल घडतात. त्यामुळे हिवाळा आणि थंडीही अनियमित स्वरूपाची असते. त्यामुळे निरनिराळ्या जिल्ह्यांत वेगवेगळी पीकरचना असते. परंतु कोणत्याही

पिकाचे उत्पादन स्थिर नसते. या सर्व गोष्टींचा अभ्यास मराठवाडा जनता विकास परिषदेने करून मराठवाड्यातील शेतीचे एकात्मिक नियोजन व सुयोग्य व्यवस्थापन करण्याची गरज स्पष्ट केली. उपलब्ध वैज्ञानिक माहितीचा सुयोग्य वापर करणे, मातीच्या, पाण्याच्या निचऱ्याच्या, आणि उचित बियाण्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पाण्याचा काटकसरीने वापर, पुनर्भरण, जलसंवर्धन इत्यादी उपाय अवलंबणे, आदि गोष्टींचा पुरस्कार परिषदेने केला व त्यासंबंधी जनजागरण केले. मराठवाड्यातील शेतीव्यवस्था सुधारता यावी यासाठीच चळवळीच्या मार्गाने परभणी येथील कृषि-विद्यापीठ स्थापन करावयास लावले. परंतु त्या पलिकडे शेतीसुधारणेसाठी परिषदेला फारसे काही करता आले नाही याची त्यांना खंत वाटत असे. सिंचनाच्या क्षेत्रात मराठवाड्यात जायकवाडी, पूर्णा, विष्णुपुरी, उर्ध्व पेनगंगा, मांजरा आणि निम्न तेरणा हे प्रकल्प पूर्ण झालेले होते. यातील बहुतेक प्रकल्प मराठवाडा जनता विकास परिषदेच्या पाठपुराव्यामुळे झाले. परंतु निम्न दुधना, लेंडी, उर्ध्व मानार आणि नांदूर-मधमेश्वर हे प्रकल्प अद्याप पूर्ण व्हावयाचे आहेत. त्याशिवाय मराठवाड्यात ७४ मध्यम प्रकल्प आणि ६१२ लघुप्रकल्प पूर्ण झाले आणि ५ मध्यम व ९५ लघुप्रकल्प व्हावयाचे आहेत. जून १९९४ पर्यंत मराठवाड्यात सुमारे आठ लाख हेक्टरांची सिंचनक्षमता विकसित झाली. परंतु काही मोठ्या धरणांच्या पाणलोटक्षेत्रांमध्ये राजकीय हस्तक्षेपांमुळे नियोजनबाह्य अशी अनेक नवी धरणे उभी केली गेल्यामुळे मराठवाड्यातील सिंचनक्षमता पुन्हा घटू लागली आहे याचीही खंत गोविंदभाईंना होती. पैठणचे जायकवाडी धरण हे त्यास आश्वासित पाणी मिळू शकत नसल्यामुळे ठरलेली सिंचनउद्दिष्टे गांठू शकत नाही हे ते नेहमी सांगत. या परिस्थितीवर मात करण्यासाठी संपूर्ण मराठवाड्यातील सर्व पाण्याचे पुनर्नियोजन करणे, कृष्णा खोऱ्यात समाविष्ट होणाऱ्या तुळजापूर, उमरगा, आष्टी, परांडा आणि भूम या मराठवाड्यातील तालुक्यांना कृष्णा खोऱ्यातील ५९४ टी.एम.सी. पाण्यातला न्याय वाटा मिळवणे, शासनाकडे मराठवाड्यासाठी भूजलविकास महामंडळ मागणे, जुन्या प्रकल्पांची कार्यक्षमता वाढविणे, पश्चिम महाराष्ट्र आणि कोंकणातील अतिरिक्त पाण्यापैकी शंभर टी.एम्सी. पाणी मराठवाड्याकडे वळवणे आदि उपाययोजना मराठवाडा जनता विकास मंडळाने सुचविलेल्या आहेत.

मराठवाड्यासाठी राज्याच्या उच्चन्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्यात यावे

ही लोकांची जुनीच मागणी होती. इथल्या गोरगरीब लोकांना जमिनीची आणि कूळकायद्याची प्रकरणे अपिलात गेली की दूरवर हैदराबाद येथे जावे लागत असे. त्यामुळे हैदराबाद उच्चन्यायालयाचे खंडपीठ इथे व्हावे असे निवेदन गोविंदभाईंनी १९५६ साली प्रथम सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना दिले होते. नंतर मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाल्यावरही ही मागणी अपूर्णच राहिली होती. जुन्या मराठवाडा विकास मंडळाच्या काळापासून गोविंदभाई त्या मागणीचा पाठपुरावा सरकारदरबारी करीत आले होते. १९८२ साली जेव्हा बॅ. अंतुले हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. तेव्हा त्यांनी या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घातले. योगायोगाने त्यावेळी मराठवाड्याचेच न्यायमूर्ती व्यंकटराव देशपांडे हे मुंबई उच्चन्यायालयाचे मुख्य न्यायाधीश होते. त्यांनी या प्रकरणी तत्परतेने आवश्यक ती कारवाई करून मराठवाड्याला हे खंडपीठ मिळवून दिले. १९८२ सालच्या ऑगस्ट महिन्यात औरंगाबादच्या खंडपीठाचे मोठ्या दिमाखाने उद्‌घाटन झाले. आणि संपूर्ण मराठवाडा व आसपासच्या अहमदनगर, जळगांव इत्यादी जिल्ह्यांमधील लोकांना कोर्टदरबारीचा न्याय सुलभ झाला. रेल्वेविषयक मागण्यांपैकी मराठवाड्यातील मनमाड - मुदखेड रेल्वेमार्गाचे रुंदीकरण पूर्ण झाले, आणि लातूर - मिरज लोहमार्गाच्या रुंदीकरणास सुरुवात झाली. परंतु पूर्वीपासून मागणी केलेले औरंगाबाद - परळी, सोलापूर - नांदेड, आणि आदिलाबाद - माणिकगड हे नवे रेल्वेमार्ग मात्र अद्याप प्रलंबित आहेत याचीही बोचणी गोविंदभाईंना होती.

महत्प्रयासाने स्थापन झालेल्या वैधानिक विकास मंडळाच्या कामाकडेही गोविंदभाई चिकित्सक नजरेने बघत. १९९४ नंतर वैधानिक मंडळाच्या प्रारंभिक काळात जेव्हा लोक त्याच्या फलिताविषयी शंका उपस्थित करत तेव्हा गोविंदभाईच त्यांना समजावत. मे १९९४ मध्ये मराठवाडा जनता विकास परिषदेच्या नांदेड येथे झालेल्या एका अधिवेशनात वैधानिक मंडळाविषयी असलेले लोकांचे समज-अपसमज दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. हा एक नवीन प्रयोग असल्यामुळे त्याची चांगली फळे मिळण्यास अवधी लागेल. तोपर्यंत सर्वांनी संयम राखून वैधानिक विकास मंडळास सहकार्य करावयास हवे अशी त्यांची भूमिका होती. परंतु चार वर्षांनंतर वैधानिक मंडळाची कामगिरी पाहून मात्र त्यांची निराशा त्यांना लपवता आली नाही. ९८ साली दिलेल्या एका मुलाखतीत गोविंदभाईंनी सांगितले होते की वैधानिक विकास मंडळांचे काम अपेक्षेनुसार होत नाही. ही वैधानिक विकास मंडळे एकापरीने राज्यपालांचे डोळे आणि कानच होत. विभागातील

विकासाच्या गरजा त्यांनी जोखावयाच्या आणि त्यानुसार राज्यसरकारकडे शिफारसी करावयाच्या. मंडळावर शासनाचे कोणतेही नियंत्रण असणार नाही पण त्याच्या शिफारसी मात्र शासनावर बंधनकारक राहतील अशी त्यांची अपेक्षित रचना होती. परंतु राज्यशासनाने सुरुवातीपासूनच त्या मंडळांचे अध्यक्ष आणि बहुतांश सदस्य हे आपल्या स्वतःच्या कह्यातील असतील याची खबरदारी घेतली. त्याबाबत अधिकार असूनही राज्यपाल मूग गिळून गप्प बसले. एका भुजंगराव कुलकर्णींचा अपवाद वगळला तर मंडळावर ज्या प्रकारची तज्ञ मंडळी अपेक्षित होती तशी उपलब्ध झाली नाहीत. जी माणसे नेमली गेली आहेत त्यांच्यामध्ये हे एवढे मोठे काम पेलून धरण्याची पात्रता नाही, अशी विचित्र परिस्थिती आहे असे गोविंदभाईंनी सांगितले होते. अर्थात् मराठवाडा वैधानिक विकास मंडळाने सुरुवातीच्या काळात काही शिफारसवजा ठराव निश्चितच केले होते असेही त्यांनी सांगितले. मंडळ निर्माण होण्याआधी दांडेकर समितीने काढलेला अनुशेष भरून काढण्यासाठी राज्यशासनाने विभागवार ज्या रकमा दिल्या होत्या त्यात ११२ कोटी रुपये पश्चिम महाराष्ट्राला जास्त दिले आहेत ही गोष्ट मराठवाडा वैधानिक मंडळानेच लक्षात आणून दिली होती. मग त्या रकमेची भरपाई करून देण्याचे शासनाने मान्य केले होते. जायकवाडी धरणाच्या वरच्या भागात केवळ राजकीय महत्त्वाकांक्षेपोटी जास्तीची धरणे बांधल्यामुळे जायकवाडीला आश्वासित पाणी मिळू शकत नाही ही बाबही वैधानिक मंडळानेच ठराव करून निदर्शनास आणली. १९९३ सालापर्यंत तीनही विभागांच्या एकत्रित अनुशेषापैकी २६७३ कोटी रुपयांची भरपाई शासनाने केल्यानंतर प्रत्यक्ष कामांच्या स्वरुपातील भौतिक अनुशेष ५०% शिल्लक होता. त्या शिल्लक कामांचे १९९४ सालच्या किंमतींवर आधारलेले मूल्य १५३५५ कोटी रुपये आहे हे मराठवाडा वैधानिक विकास मंडळानेच शोधून काढले होते. त्यात मराठवाड्याचा वाटा ३०% असून विदर्भाचा ४५% तर पश्चिम महाराष्ट्राचा २४% आहे हे या मंडळानेच सप्रमाण दाखवून दिले होते, हे गोविंदभाई सांगत. या सर्व शिफारसी मंडळाने केल्या. पण अनेकदा त्या राज्यपालांपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत, मधल्यामध्येच दाबल्या गेल्या याचे दुःखही गोविंदभाईंनी व्यक्त केले होते. या वैधानिक विकास मंडळांच्या भवितव्याबद्दल गोविंदभाईंना चिंता वाटत असे. ही मंडळे नीट चालू राहावीत यासाठी काय करावयास हवे याबद्दल कोणताही राजकारणी नेता काहीच बोलत नाही, कोणास जणु त्याचे सोयरसुतकच नाही अशी अवस्था आहे असे ते म्हणत. परंतु ही मंडळे टिकली पाहिजेत आणि ती

राज्याच्या नियोजनप्रक्रियेचा एक भाग बनली पाहिजेत अशी त्यांची धारणा होती. मागास भागांच्या विकासासाठी इतर कुठला पर्याय सांपडेपर्यंत वैधानिक विकास मंडळे असणे निकडीचे आहे अशी त्यांची भूमिका होती.

मराठवाड्याच्या राजकीय नेतृत्वाबद्दल गोविंदभाई असमाधानी होते. पश्चिम महाराष्ट्रातील नेतृत्व जास्त सबळ आहे. त्यामुळे ते लोक विकासाच्या बाबतीत जास्त जागरूक आहेत असे ते सांगत. त्या तुलनेत मराठवाड्यातील राजकीय नेतृत्व हे अनभिज्ञ आणि दुबळे आहे असे त्यांचे मत होते. कृष्णा पाणीवाटप प्रश्नांवर पश्चिम महाराष्ट्रातल्या नेत्यांनी शासनाला जसे ''संपूर्ण निधी पश्चिम महाराष्ट्रासाठी द्या, अन्यथा आम्ही महाराष्ट्रातून फूटून निघू'' हे ठणकावून सांगितले तसे सांगू शकणारा एक तरी नेता मराठवाड्यात आहे कां, असा प्रश्न गोविंदभाई विचारत. विकासाच्या प्रश्नांचा नीट आणि सांगोपांग अभ्यास करणे, त्यांवर जनमत संघटित करणे. शासनासमोर ते प्रश्न संगतवार मांडणे आणि त्यासाठी लोकांच्या चळवळी उभ्या करणे या गोष्टी मराठवाड्यातले लोकप्रतिनिधी करीत नाहीत. आरामखुर्चीत बसून राजकारण करणे एवढेच त्यांना जमते असे मोठ्या उद्वेगाने गोविंदभाई म्हणत. मराठवाड्याचा विकास घडवावयाचा असेल आणि इथे प्रगती साधावयाची असेल तर लोकप्रतिनिधींना प्रसंगी रस्त्यावर येऊन लढा दिला पाहिजे. मग ते कोणत्याही पक्षाचे असोत असे त्यांचे परखड मत होते.

स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक आणि विकासाच्या प्रश्नांप्रमाणेच सामाजिक प्रश्नांबद्दलही ते शांतपणे आणि विश्लेषक पध्दतीने विचार करीत. समाजात जातिभेद, फुटीरवाद, परस्परांबद्दल द्वेषभाव यांच्या झालेल्या प्रादुर्भावामुळे ते कधी विचलित होत नसत. देशाचा स्वातंत्रलढा जेव्हा झाला त्यावेळी त्याचे उद्दिष्ट केवळ राजकीय स्वातंत्र्याचे होते. त्याही वेळी विघटनवादी सांप्रदायिक शक्ती आपल्या समाजात होत्या. पण त्यांना त्या राजकीय लढ्यात फारसा वाव नव्हता. स्वातंत्र्यानंतर समाजात जो भेदभावाचा प्रादुर्भाव झाला त्याला अध:पतन म्हणणे योग्य होणार नाही. मुळातच आपल्या समाजात समतेचे आधुनिक मूल्य मानणारी माणसे थोडीशीच होती. तेव्हा मतदानाचा हक्क मिळताक्षणी निवडणुकीच्या माध्यमातून जातिभेद आणि धर्मभेद या पारंपारिक वृत्ती प्रकट झाल्या असे गोविंदभाई म्हणत. लोकांना ज्याची छायादेखील पडलेली पूर्वी चालत नसे तो दलित माणूस आज आपल्या हक्कांसाठी संघटितपणे संघर्ष करून लागला आहे ही मोठी जमेची बाजू आहे असे त्यांना वाटे. समता आणि लोकशाहीची आधुनिक मूल्ये

विषमतेने भारलेल्या आपल्या या समाजात रुजवण्याचे काम हे स्वातंत्र्यलढ्यापेक्षाही मोठे आणि महत्त्वाचे आहे अशी त्यांची धारणा होती. गणितामधील पदव्युत्तर पदवी घेतलेले गोविंदभाई हे त्यांच्या काळाच्या मानाने खूप जास्त प्रगत अशा विचारांची कास धरून जगत गेले असेच म्हणावे लागेल. विज्ञानाचे शिक्षण घेऊनही कर्मकांड आणि अंधश्रद्धा या गोष्टींचा मनावर पगडा कायम असणाऱ्या असंख्य प्रतिष्ठितांनी धडे घ्यावेत अशी त्यांची विचारसरणी आणि राहणी होती. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या साहाय्याने विकास घडवला म्हणून आपोआप समाजात वैज्ञानिक मानसिकता येत नसते असे ते म्हणत. वैज्ञानिक सुखसोयींमुळे व्यक्तिगत भोगवाद वाढतो. त्यामुळे विषमतेची दरी जास्तच रुंदावून समाजाचे संतुलन बिघडते. म्हणूनच विज्ञानाची विचारपद्धती आणि त्यातील सत्यशोधनाच्या ऊर्मी या गोष्टी जीवनात आत्मसात केल्या गेल्या पाहिजेत. तरच समाजातील वैज्ञानिक मानसिकता वाढीला लागेल असे त्यांचे मत होते.

✿

# शिक्षण आणि साक्षरतेच्या क्षेत्रातील योगदान

गोविंदभाईंचा पिन्ड हा मुळात शिक्षकाचा होता. आपल्या कार्याची सुरुवातच त्यांनी शाळेतल्या शिक्षकाच्या नोकरीने केली होती. तरुण वयात ज्ञानसाधनेची प्रचंड ओढ असलेल्या गोविंदभाईंना शिक्षणक्षेत्राबद्दल अत्यंत आस्था असणे स्वाभाविक होते. त्यामुळेच ते एक विद्यार्थीप्रिय शिक्षक बनू शकले होते. अडतीस साली स्वातंत्र्याच्या चळवळीत ओढले गेल्यानंतर काही काळ त्यांचा औरंगाबादच्या सरस्वती भुवन शिक्षणसंस्थेशी संबंध आला होता. त्यानंतरची अनेक वर्षे चळवळीत गेली. परंतु त्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या धकाधकीत लोकजीवनाच्या विविध पैलूंचा स्पर्श झाल्यामुळे शिक्षणाच्या उद्दिष्टांबद्दलच्या त्यांच्या धारणा पक्क्या झालेल्या होत्या. समाजात औपचारिक शिक्षण हे आवश्यक आहेच. साक्षरता, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, माध्यमिक शिक्षण, उच्चशिक्षण, तंत्रशिक्षण आणि संशोधन या सगळ्या गोष्टी टाळता न येणाऱ्याच आहेत. जगात होत जाणाऱ्या ज्ञानाच्या विस्फोटांच्या बरोबरीने आपली ज्ञानग्रहणाची गती राखण्यासाठी त्या आवश्यक आहेत. परंतु त्यांच्या पलिकडे जाऊन या शिक्षणाचे आपल्या देशाशी, समाजाशी आणि माणसांच्या जगण्याशी काय नाते आहे हे दाखवणारा दुसरा भागही त्या शिक्षणासोबत आला पाहिजे असे गोविंदभाई आग्रहाने सांगत. शिक्षणातून व्यक्तीची प्रगल्भता, तिचे शहाणपण, चातुर्य आणि उपयोजनकौशल्य वाढले पाहिजे, तरच त्या शिक्षणाचा तिला उपयोग होईल असे ते म्हणत. आज शिक्षणाची व्यापकता वाढली आहे. संख्यात्मक वाढ खूप झालेली आहे. परंतु हे शिक्षण आमच्या दैनंदिन जीवनाशी संबध्द राहिलेले नाही याची खंत ते व्यक्त करीत असत. हे जसे झाले त्याचप्रमाणे केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञान यांमधील

औपचारिक शिक्षणाने समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजत नाही याचे भान आम्हाला राहिले नाही असे ते म्हणत. ''भरपूर पैसा आणि ऐहिक सुखे प्राप्त व्हावीत म्हणून शिक्षण घ्यावयाचे ही वृत्ती आजच्या मुला-मुलींमध्ये संस्कारांच्या रूपांत बाणवली जात असेल तर तो दोष त्यांचा की शिक्षण देणाऱ्यांचा?'' असा प्रश्न ते नेहेमी विचारत. वैज्ञानिक सुखसोयी ह्या वैज्ञानिक मानसिकतेशिवायच समाजाला उपलब्ध करून दिल्या तर व्यक्तिगत भोगवाद वाढणारच, आणि त्यामुळे विषमतेची दरी आणखीनच रुंदावत जाऊन सामाजिक संतुलन बिघडत जाणार, म्हणून वैज्ञानिक विचार आणि सत्यशोधन यांच्या पद्धती विद्यार्थ्यांना शिक्षणाद्वारे दिल्या गेल्या पाहिजेत, असे सांगून ते विचारत, ''आपल्या अभ्यासक्रमांमधून या पद्धती दिल्या जातात काय?'' शिक्षणाचा उपयोग मानवता आणि समता ही दोन महत्त्वाची जीवनमूल्ये विद्यार्थ्यांच्या अंगी बाणवण्यासाठी होणे गरजेचे आहे. या मूल्यांचा व्यक्तिगत पातळीवर केलेला पुरस्कार हा आपोआपच सामाजिक पातळीवरील आविष्कारात रुपांतरित होतो. बौद्ध तत्वज्ञानातल्या प्रज्ञा आणि करुणा या गोष्टी मूल्यसंवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत अशी गोविंदभाईंची धारणा होती. प्रज्ञा आणि करुणा ही मूल्ये जोपासल्याने व्यक्ती ही आत्मकेन्द्रित न राहता इतरांच्या जीवनाशी तिची बांधिलकी निर्माण होते. आजच्या संदर्भात मानवता, समता, प्रज्ञा आणि करुणा ही मूल्ये जास्त महत्त्वाची आहेत. परंतु आजच्या आपल्या शिक्षणात ती कुठेही प्रतिबिंबित झालेली दिसत नाहीत याचा विषाद त्यांना वाटत असे.

औरंगाबादच्या सरस्वती भुवन शिक्षणसंस्थेशी गोविंदभाईंचा संबंध १९३९ सालापासून होता. सरस्वती भुवन प्रशालेची अर्धवर्तुळाकार अशी जी जुनी इमारत आज दिसते तिच्या बांधकामासाठी निधी उभा करण्याची जबाबदारी गोविंदभाईंनी १९३९ साली घेतली होती. निजामी राज्यात अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्थाचालकांना ही शाळा चालवावी लागली. सरकारची मदत नव्हती. शिक्षकांचे पगारही वेळेवर देणे दुरापास्त झाले होते. पोलिस ॲक्शनपर्यंत संस्थेची आर्थिक स्थिती इतकी खालावली होती की संस्था सरकारकडे सुपूर्द करावी की काय असा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी स्वातंत्र्यसैनिक स. कृ. वैशंपायन यांनी संस्थेची जबाबदारी स्वीकारली आणि ही ढासळती संस्था सावरून धरली. १९५५ साली गोविंदभाईंनी पुन्हा संस्थेतील काही जबाबदाऱ्या उचलल्या. पंचावन्नमध्येच संस्थेने औरंगाबाद जिल्ह्याच्या ग्रामीण भागांत शाखा सुरू करण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणे १९६३ साली संस्थेने औरंगाबादेत एक कला-वाणिज्य-विज्ञान

महाविद्यालय सुरू केले. १९६७ साली गोविंदभाई सरस्वती भुवन शिक्षणसंस्थेचे सरचिटणीस झाले. आणि नंतर १९७३ पासून जीवनाच्या अंतापर्यंत ते संस्थेचे अध्यक्ष होते.

सरस्वती भुवन संस्थेचे सरचिटणीस झाल्यापासून गोविंदभाई शाळेच्या अर्धवर्तुळाकार इमारतीच्या उजव्या कोपऱ्यात तळमजल्यावर असलेल्या त्यांच्या कार्यालयात दररोज बसत. घेतलेले कोणतेही काम चिकाटीने आणि समर्पित वृत्तीने करण्याची सवय असल्यामुळे सकाळी दहा वाजल्यापासून दुपारी दोन वाजेपर्यंत आणि सायंकाळी सहापासून रात्री नऊ वाजेपर्यंत गोविंदभाई कार्यालयात असत. संस्थेचे कामकाज चालवण्यासाठी स्वत:चा इतका वेळ आणि एवढे परिश्रम देऊ करणारा स्वयंसेवी अध्यक्ष विरळाच होय. संस्थेच्या शाळा-महाविद्यालयांच्या सर्व शाखांच्या प्रवेशप्रक्रिया, त्यांचे अभ्यासक्रम, तेथील अध्यापन, इमारती, प्रयोगशाळा आणि शैक्षणिक सुविधा, निधी, अंदाजपत्रके, ताळेबंद, शिक्षकांचे प्रश्न, शासनाशी होणारे आदानप्रदान, ह्या सर्व गोष्टींवर गोविंदभाईंचे अत्यंत बारीक लक्ष असे. कोणत्याही शाखेतील प्रत्यक्ष स्थिती, समस्या, उपलब्धी आणि कार्यवाही या गोष्टी त्यांना मुखोद्गत असत. संस्थेच्या कामकाजात काही कडक असे दंडक गोविन्दभाईंनी रुजू केलेले होते. आणि जीवनाच्या अंतापर्यंत त्यांनी ते स्वत:ही पाळले आणि इतरांनाही पाळावयास लावले. संस्थेच्या कोणत्याही शाखेत प्रवेशासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मार्गाने देणगी स्वीकारावयाची नाही हा ठाम निर्णय त्यांनी केला होता. संस्थेला लागणारा निधी उभा करण्यासाठी आपण झोळी घेऊन फिरू, परंतु शाळेतील प्रवेश देणगीशी निगडित ठेवून पालकांना वेठीस धरण्याचे दुष्कृत्य करणार नाही अशी त्यांची भूमिका होती. गोविंदभाईंची स्वत:ची राहणी अत्यंत साधी होती. गरजा अतिशय किमान होत्या. त्यामुळे संस्थेच्या कारभारातही ते तेवढ्याच साधेपणाचा आणि काटकसरीचा पुरस्कार करीत. संस्थेतल्या त्यांच्या साथीदारांना ती त्यांची कंजूषी वाटे. परंतु सार्वजनिक कार्यात डामडौलावर अनाठायी केलेला खर्च समर्थनीय नाही अशी गोविंदभाईंची पक्की धारणा होती. शाळा-महाविद्यालयांच्या अनुदानसंहिताचा अभ्यास त्यांनी पुरेपूर केलेला होता. त्यामुळे मिळणारी अनुदाने आणि त्यातील त्रुटी यांबद्दल चर्चा करून ते संस्थाप्रमुखांना अनेक प्रश्न विचारत. त्या प्रश्नांची योग्य उत्तरे अभ्यासपूर्वक दिली गेली नाही तर मात्र ते संतापत. अनेकदा शासकीय नियम आणि अनुदानतत्वे यांतील दोष ते शोधून काढत. शासनाच्या हडेलहप्पी पद्धतीमुळे त्यांच्या नियमांचा

त्रुटींसह निमूटपणे स्वीकार करण्याची वृत्ती सहसा असते. परंतु गोविंदभाई त्या त्रुटींबद्दल शासकीय अधिकाऱ्यांना चांगले धारेवर धरीत. मग विभागीय अधिकाऱ्यांपासून ते मंत्र्यांपर्यंत जाऊन आपल्या अचूक विश्लेषणाने आणि बिनतोड युक्तिवादाने नियमांमध्ये योग्य ते बदल करण्यास त्यांना भाग पाडत. गोविंदभाईंची कळकळ आणि निस्वार्थी धडपड जाणून घेऊनच अधिकारी आणि मंत्री हे प्रसंगी वैतागले तरी त्यांना सहकार्य करीत. त्यामुळे आणखी एक गोष्ट झाली. ती ही की सरकारदरबारी असलेली सरस्वती भुवन संस्थेची सर्व कामे ही विनाभ्रष्टाचार पार पडत गेली.

संस्थेतील शाळा-महाविद्यालयांमध्ये उत्कृष्ट अध्ययन-अध्यापनाची जोपासना व्हावी अशी गोविंदभाईंची आंतरिक इच्छा असे. त्यामुळे ते शिक्षकांशी वेळोवेळी संवाद साधावयाचा प्रयत्न करीत. सरस्वती भुवनचे किंवा संस्थेतील घटकसंस्थांचे वर्धापन दिन असोत, रौप्यमहोत्सव असोत वा हीरक महोत्सव, ते प्रसंग नुसत्या जल्लोषाने साजरे करण्यास त्यांचा विरोध असे. अशा समारोहांत सर्वांनी एकत्र येऊन शिक्षणाशी संबंधित अशा महत्त्वाच्या बाबींवर गांभीर्याने चर्चा करावी, विचारांची देवाण-घेवाण करावी, आणि त्यातून संस्थेच्या भविष्यकालीन वाटचालीसाठी काही सूत्रे अंगिकारावीत असा त्यांचा प्रयत्न असे. सत्तरच्या दशकात जेव्हा सरकारने नवे शैक्षणिक धोरण जाहीर केले तेव्हा त्याचा सांगोपांग अभ्यास करून गोविंदभाईंनी त्यावरच्या अनेक चर्चांमध्ये संस्थाचालक आणि शिक्षकांना आपापल्या भूमिका स्पष्ट करावयासा लावल्या होत्या. १९७५ साली सरस्वती भुवन संस्थेचा हीरक महोत्सव झाला तेव्हाही ''युगानुकूल शिक्षण'' या विषयावर एक मोठे दोन दिवसांचे चर्चासत्र त्यांनी आयोजित केले होते. चर्चासत्राच्या तीन महिने आधीपासून ते दर आठवड्यात बैठका घेत असत. आणि त्या बैठकांमध्ये चर्चासत्राच्या प्रत्येक सत्रात करावयाची विषयांची मांडणी, चर्चेची अपेक्षित दिशा, वक्त्यांची नावे, आणि व्यवस्थापनाचे इतर तपशील ठरवत असत. शाळेतील शिक्षक असोत किंवा महाविद्यालयातील प्राध्यापक, त्यांना शिक्षणाशी निगडित असलेल्या प्रश्नांवर विचार करावयास लावणे, आपापली मते सुसंगतपणे मांडावयास लावणे, आणि त्यातून त्यांच्या निश्चित भूमिका बांधावयास मदत करणे याचे प्रयत्न गोविंदभाई नेहेमी करीत. १९७६ साली जेव्हा महाराष्ट्रातील विद्यापीठांसाठी एका नव्या समान कायद्याचा प्रस्ताव आला तेव्हाही त्या कायद्याच्या मसुद्यावर जागोजागी चर्चा घडवून आणून त्यात आवश्यक ते बदल शासनाला

सुचविण्याचे मोलाचे काम त्यांनी केले होते. नंतर झालेल्या संस्थेच्या अमृतमहोत्सवातही त्यांनी अभिनव अध्ययन-अध्यापन पद्धती आणि नियोजनबद्ध सहपाठ्यक्रमीय उपक्रम यांचा एक सर्वसंमत आराखडा तयार करून तो संस्थेच्या शाळा-महाविद्यालयांमधून तीन वर्षे राबवला होता. संस्थांतर्गत शैक्षणिक बाबींवर विचारविनिमय करून त्यांत सुधारणा सुचविण्यासाठी संस्थेच्या पातळीवर एक 'विद्यासमिती' त्यांनी कार्यान्वित केली होती. त्याचप्रमाणे स.भु.संस्थेचे स्वत:चे असे एक संशोधन प्रतिष्ठान निर्माण करून त्यामार्फत शिक्षकांच्या छोट्या, समाजोपयोगी संशोधनप्रकल्पांना मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद केली होती. स.भु. संस्थेच्या भौतिक विकासाकडेही गोविंदभाईंचे पुरेपुर लक्ष असे. संस्थेच्या आवारातील इमारतींच्या बांधकामांवर त्यांची कायम देखरेख असे. तुटपुंज्या अनुदानात इमारती उभ्या करावयाच्या तर खर्चावर काटेकोर नियंत्रण हवे. गोविंदभाई ते अचूकपणे करीत. इमारतीचा नकाशा तयार करण्यापासून विटा, सिमेंट, लोखंड अशा बांधकामसाहित्याच्या खरेदीपर्यंत अत्यंत बारीकसारीक तपशीलांचाही ते विचार करत. दर्जाबाबत तडजोड न करता जास्तीत जास्त काटकसर कशी साधता येईल ते पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन असे. त्यामुळे बांधकाम सुपरवायझरकडून एकेका सिमेंट थैलीच्या विनियोगाचा हिशेब मागत. त्यांची ही पद्धत संबंधित माणसांना अनेकदा जाचक वाटत असे. परंतु ते बधत नसत. सार्वजनिक संस्थेच्या विश्वस्तांकडून व्हावयाची कामे अशा काटेकोरपणाने झाली तरच संस्थेचे भले होते ही त्यांची ठाम निष्ठा होती. त्यांच्या या चिकित्सक वृत्तीमुळेच गेल्या तीस वर्षांमध्ये औरंगाबादच्या सरस्वतीभुवन परिसरात दोन महाविद्यालये, दोन वसतीगृहे, तीन शाळा, दोन ग्रंथालये, जिम्नॅशियम, नाट्य-संगीत विभाग, व्यावसायिक शिक्षणविभाग अशा मोठमोठ्या इमारती उभ्या राहिलेल्या दिसतात. सरस्वतीभुवन शिक्षणसंस्थेप्रमाणेच नांदेड येथे स्वामीजींनी स्थापन केलेल्या नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्षपदही गोविंदभाईंकडे होते. त्या शिवाय सेलू येथील नूतन शिक्षणसंस्था आणि अंबेजोगाई येथील योगेश्वरी शिक्षणसंस्था यांच्याशीही गोविंदभाईंचा ऋणानुबंध होता. औरंगाबादेत गोविंदभाईंचे कार्यालय सरस्वती भुवन परिसरात असल्यामुळे ज्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये गोविंदभाईंचे कार्य पसरलेले होते त्या सर्वांचा स्पर्श या परिसराला होत असे. शैक्षणिक परिषदा असोत वा विकास परिषदा, सामाजिक परिवर्तनाची चर्चासत्रे असोत वा संशोधन परिषदा, सरस्वती भुवन परिसराकडे त्यांचे यजमानपद असे.

पर्यावरणापासून ते सामाजिक न्यायापर्यंतच्या निरनिराळ्या चळवळी, मोर्चे आणि सभांनी हा परिसार नेहेमी गजबजलेला असे. चर्चा-परिसंवाद असोत वा हौशी नाट्यप्रयोग, संस्थेचे सभागृह केवळ वीजखर्च भरून कोणालाही उपलब्ध होई. गोविंदभाईंमुळे औरंगाबाद शहरातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीचे अधिष्ठान कित्येक वर्षे सरस्वती भुवन परिसराला लाभले होते.

सरकारच्या १९६० सालच्या शैक्षणिक धोरणामध्ये सरकारी शाळांचे खासगीकरण करणे. शाळांमधील शुल्कांत वाढ करणे, शिक्षकांसाठी नव्या वेतनश्रेणी लागू करणे, आणि सरकारी अनुदानाची नवी संहिता लागू करणे या बदलांचा समावेश होता. शिक्षणक्षेत्रांतील लोकांचा या बदलांना विरोध होता. सरकारी शाळा खासगी संस्थांना चालवावयास देणे आणि शुल्कवाढ करणे या गोष्टींमुळे गोरगरीब शेतकरी, कामगार आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय लोक यांना आपल्या पाल्यांना शिक्षण देणे अवघड होणार असा त्यांचा आक्षेप होता. मराठवाड्यात आधीच शिक्षणाचे प्रमाण कमी आणि गळतीचे जास्त होते. त्यात शुल्कवाढीने परिस्थिती आणखीनच बिकट होणार होती. वार्षिक ९०० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या पालकांच्या पाल्यांना शुल्कमाफी देऊ केलेली होती. ती मर्यादा उचित नव्हती. म्हणून वार्षिक रु. १५०० पर्यंत उत्पन्न असलेल्यांना शुल्कमाफी मिळावी अशीही लोकांची मागणी होती. शिवाय वेतनेवर अनुदान, वर्गवार विद्यार्थ्यांची संख्या, संस्थाना देय असणारे इमारत-भाडे अनुदान, देखभालीचा खर्च अशा अनेक समस्या होत्या. सर्व शिक्षणसंस्थांनी एकत्र येऊन त्या प्रश्नांवर विचारविनिमय करणे आवश्यक होते. म्हणून गोविंदभाईंनी १९६७ सालच्या ऑक्टोबर महिन्यात महाराष्ट्रातील सगळ्या शिक्षणसंस्थांच्या फेडरेशनचे एक अधिवेशन औरंगाबाद येथे घेतले. हळूहळू संस्थाचालकांचे हे फेडरेशन सबळ होत गेले, आणि शिक्षणसंस्थांपुढील प्रश्नांवर सामुहिकरीत्या सरकारशी वाटाघाटी करून लागले. काही वर्षे त्या फेडरेशनच्या अध्यक्षपदी मधुकरराव चौधरी तर कार्याध्यक्षपदी गोविंदभाई होते. पुढे काही काळ गोविंदभाई अध्यक्ष होते.

साली भारत सरकारने प्रौढ शिक्षणाचा एक राष्ट्रीय कार्यक्रम व्यापक स्तरावर सुरू केला होता. त्या तहत काही विशिष्ट जिल्ह्यांची निवड करून तेथे 'संपूर्ण साक्षरता अभियान' राबविण्यात आले होते. त्या अभियानात औरंगाबाद जिल्ह्याचाही समावेश होता. महाराष्ट्राच्या निवडलेल्या इतर सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी हे साक्षरता अभियानाचे पदसिद्ध अध्यक्ष असत. परंतु औरंगाबाद

जिल्ह्यासाठी मानद् अध्यक्ष म्हणून गोविंदभाईंची नियुक्ती महाराष्ट्र शासनाने केली. त्या नेमणुकीमुळे औरंगाबाद जिल्ह्याच्या साक्षरता मोहिमेला एक वेगळेच परिमाण प्राप्त झाले. मोहिमेसाठी शासनाने साधनसामग्री पुरवावी आणि अनुषंगिक खर्च उचलावा. परंतु प्रत्यक्षात ही मोहीम स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी सेवाभावी तत्वावर, मानधन न घेता चालवावी असे आवाहन गोविंदभाईंनी केले. आजच्या काळात साक्षरता मोहिमेला स्वातंत्र्यलढ्याइतकेच महत्त्व आहे असे ते म्हणत. त्यांच्या प्रेरणेने जिल्ह्यातून अनेक सामाजिक कार्यकर्ते, कलावंत, स्वातंत्र्यसैनिक, निवृत्त व्यक्ती असे लोक पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून संपूर्ण साक्षरता अभियानाशी जोडले गेले. शासनाने नेमलेले शिक्षक, कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक असे लोक त्यांच्या मदतीला होते. औरंगाबाद जिल्ह्यात सुमारे एक लाख वीस हजार एवढे निरक्षर पुरुष आणि दोन लाख चौतीस हजार निरक्षर स्त्रिया आहेत असे आकडेवारी दाखवत होती. त्यापैकी पंधरा ते पंचेचाळीस वर्षे या वयोगटांतील निरक्षरांना साक्षर बनविण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले. गांव पातळीवर साक्षरत्या समित्या स्थापन केल्या गेल्या. शहरात वार्डनिहाय समित्या केल्या गेल्या. संपूर्ण जिल्ह्यासाठी म्हणून चाळीस हजार स्वयंसेवक तयार केले गेले. दहा स्वयंसेवकांमागे एक ह्या प्रमाणात चार हजार प्रशिक्षक नेमले गेले. चारशे साधनव्यक्ती आणि चाळीस प्रधान साधनव्यक्तींची नियुक्ती झाली. स्वतः गोविंदभाई दिवसरात्र साक्षरतेच्या कामात गढून गेले. स्वतःच्या कोटाला लावलेला संपूर्ण साक्षरता अभियानाचा गोल बिल्ला त्यांनी शेवटपर्यंत वापरला. त्यांच्या नेतृत्वाखाली भारलेल्या स्वयंसेवकांनी औरंगाबाद जिल्ह्याचे संपूर्ण साक्षरतेचे लक्ष्य पूर्णतः गाठले, हे विशेष होय.

✿

## स्वामी रामानंदतीर्थ स्मारक समिती व संशोधन संस्थेचे कार्य

गोविंदभाईंचे राजकीय गुरू असलेले स्वामी रामानंद तीर्थ हे २२ जानेवारी १९७२ रोजी निधन पावले. स्वामीजींबद्दल गोविंदभाईंच्या मनात नितांत आदराची भावना होती. हैदराबाद संस्थानातील निजामाच्या जुलुमी आणि सरंजामशाही राजवटीतून सर्वसामान्य, गरीब माणसांची मुक्तता करण्याचा विडा उचललेला तो संन्यासी प्रखर बुद्धिमत्ता, नीती आणि निश्चयाचे प्रतीक बनला होता. शरीराने अधू असूनही स्वातंत्र्यलढ्यात स्वत:ला पूर्णवेळ झोकून देऊन शरीराचे क्लेष अबोलपणे सहन करणारा तो क्रांतिकारक होता. मृदू स्वभावाचा असूनही लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्याबाबत 'मोडेन पण वाकणार नाही' असे म्हणत कोणतीही तडजोड न स्वीकारणारा तो एक द्रष्टा होता. अध्यात्माच्या ओढीने स्वत:पुरता संन्याशाश्रम स्वीकारूनही आत्मध्यानमग्न न राहता आयुष्यभर लोकांच्या दु:खनिवारणासाठी झटणारा योगी होता. गोविंदभाईंच्या जीवनांत स्वामीजींचे स्थान एखाद्या मित्राचे, मार्गदर्शकाचे आणि तत्ववेत्त्याचे होते. त्यामुळेच, स्वामीजी निधन पावले तेव्हा गोविंदभाईंना अतीव दु:ख झाले. ज्या हैदराबाद संस्थानाच्या मुक्ततेसाठी स्वामीजींनी आपले आयुष्य वेचले, त्या हैदराबादेत त्यांचे योग्य असे स्मारक व्हावे अशी गोविंदभाईंची तीव्र इच्छा होती. सामान्यत: एखादा पुतळा उभा करून, किंवा शोभिवंत समाधी बांधून नेत्याचे स्मारक करण्याची प्रथा प्रचलित होती. परंतु तसे प्रतीकात्मक स्मारक निर्माण करून थांबणे हे गोविंदभाईंना मंजूर नव्हते. स्वामीजींनी त्यांच्या जीवनात ज्या गोष्टींचा स्वीकार जीवितकार्याच्या स्वरूपात केलेला होता त्यापैंकी निदान काही गोष्टींमधील कार्य पुढे चालू ठेवता

येईल असे एक व्यासपीठ निर्माण करणे हे त्यांना अपेक्षित होते. म्हणून गोविंदभाईंनी स्वामीजींच्या हैदराबाद, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील अनुयायांशी चर्चा करून ''स्वामी रामानंदतीर्थ स्मारक ट्रस्ट'' या न्यासाची स्थापना हैदराबाद येथे केली. हैदराबाद खादी समितीने हैदराबादच्या बेगमपुरा भागातील एक एकर जमीन स्वामीजींच्या स्मारकासाठी दान दिली. पूर्वीच्या काळी त्या जागेतच स्वामीजींचे वास्तव्य असे. त्या जागेच्या आरंभीच एक छोटी, बैठ्या दोन खोल्यांची जुनी कौलारू वास्तू आहे. स्वामीजी त्या खोल्यांमध्ये राहात असत. त्या खोल्या तशाच जतन करून ठेवण्यात आल्या. त्यांच्या शेजारी स्वामी रामानंदतीर्थ स्मारक ट्रस्टची एक मोठी वास्तू उभी केली गेली. स्वामीजींचेच एक अनुयायी पी. व्ही. नरसिंहराव हे सत्तेत होते. त्यांनी त्या वास्तूच्या उभारणीत सहकार्य दिले. तीनही प्रांतांतल्या जुन्या स्वातंत्र्यसैनिकांचेही योगदान त्यासाठी लाभले. शिवाय त्या आवारातील एका छोट्या टेकडीवर स्वामीजींची समाधी आणि एक प्रार्थनागृह बांधले गेले. त्या टेकडीवर असलेल्या एका मोठ्या शिळेवर बसून स्वामीजी पूर्वी ध्यानधारणा करीत असत. या स्वामी रामानंदतीर्थ स्मारक ट्रस्टच्या अध्यक्षपदी पी. व्ही. नरसिंहराव यांची निवड करण्यात आली. गोविंदभाई हे त्याचे सरचिटणीस होते. त्याशिवाय केशवलू, भाऊसाहेब देऊळगांवकर आणि आंध्र, महाराष्ट्र व कर्नाटकातील अनेक जुने-नवे लोक ट्रस्टच्या कार्यात सहभागी झाले.

स्वामीजींच्या ह्या स्मारक न्यासाची जी उद्दिष्टे गोविंदभाईंनी निश्चित केली ती व्यापक स्वरूपाची होती. स्वत: स्वामीजी हे संन्यासी असल्यामुळे प्रार्थना, ध्यानधारणा आणि प्रवचनादि आध्यात्मिक कार्यक्रम घेणे हे तर उद्दिष्ट होतेच. परंतु तेथेच न थांबता सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा, परिसंवाद, शिबिरे यांचे आयोजन करणे हेही एक उद्दिष्ट होते. अशा कार्यक्रमांसोबतच त्या समाधीस्थळास आंतरभारती केंद्राचे स्वरूप देऊन विविध प्रांतांमधील विविध भाषिक लोकांचे परस्पर अभिसरण घडवून आणणारे कार्यक्रम तेथे होऊ लागले. निरनिराळ्या भाषांमधील पुस्तकांची भाषांतरे करून ती प्रकाशित केली जाऊ लागली. तसेच राष्ट्रीय एकात्मतेला पोषक असे उपक्रम राबवले जाऊ लागले. उस्मानिया, मराठवाडा आणि कर्नाटक विद्यापीठांमध्ये स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमाला सुरू केल्या गेल्या. हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा इतिहास आणि संग्रामातील स्वामीजींचे योगदान यांविषयी एच. व्ही. देसाई यांनी लिहिलेल्या तीन खंडांमधील ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट ही की

औरंगाबाद, गुलबर्गा आणि हैदराबाद अशा तीनही ठिकाणी ''स्वामी रामानंदतीर्थ संशोधन संस्थांची'' निर्मिती करण्यात आली. या संशोधन संस्थांतर्फे कृतिमूल्य असणारे संशोधन, सामाजिक आणि आर्थिक विकासाचे अध्ययन आणि राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करणारे उपक्रम हाती घेतले जाऊ लागले. या तीन संशोधन संस्थांपैकी औरंगाबाद येथे असलेली स्वा.रा.ती.संशोधन संस्था ही जास्त जोमाने कार्यरत होऊ शकली. याचे कारण एक तर ती गोविंदभाईंच्या थेट नियंत्रणाखाली होती आणि दुसरे म्हणजे तिला भुजंगराव कुलकर्णी, डॉ. ज्योत्स्ना घारपुरे, डॉ.रत्नाकर कुरुलकर अशा तज्ञांचे योगदान लाभले होते. औरंगाबादच्या या संशोधन संस्थेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची मान्यता प्राप्त झालेली होती. त्यामुळे या संस्थेतून आजवर चार संशोधकांनी डॉक्टरेट संपादन केलेली आहे. याच संस्थेच्यावतीने अनेक उपयुक्त अभ्यासप्रकल्प हाती घेऊन पूर्ण करण्यात आले आहेत. त्यातील महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे मराठवाड्यातील उच्च माध्यमिक शिक्षणाच्या दर्जाचा अभ्यास होय. पुण्याच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन या संस्थेचे संशोधक डॉ. वा. ब. गोगटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या अभ्यासाचे निष्कर्ष मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना अनेक न्याय्य सवलती मिळविण्यासाठी उपयुक्त ठरलेले आहेत.

औरंगाबादच्या स्वामी रामानंदतीर्थ संशोधन संस्थेचे कार्यालय सरस्वती भुवन संस्थेच्या परिसरातच आहे. शिवाय तेथेच तिचे एक सुसज्ज असे ग्रंथालयही आहे. या संशोधन संस्थेचे कार्य पूर्णवेळ, पगारी संशोधक नेमून चालवण्याऐवजी सेवाभावी वृत्तीने काम करू इच्छिणाऱ्या स्वयंसेवी-संशोधकांमार्फत व्हावे अशी गोविंदभाईंची धारणा होती. ज्या कार्यकर्त्यांना संशोधनप्रणालीचे ज्ञान आहे आणि शिवाय सामाजिक बांधिलकीची जाणीव आहे अशांकडूनच सामाजिक प्रश्नांबाबतचे उपयुक्त संशोधन चांगल्या तऱ्हेने होऊ शकते अशी त्यांची ठाम श्रद्धा होती. शिवाय, असे कार्यकर्ते या संशोधनाच्या कार्यात गुंतले तर आपोआपच त्यांचेही प्रबोधन होऊन समर्पित कार्यकर्त्यांची एक सांखळी तयार होऊ शकेल असे त्यांना वाटत असे. काही सहकाऱ्यांना हा त्यांचा दुराग्रह वाटे. विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनीही त्यांच्या नियमांनुसार पूर्णवेळ प्राध्यापक आणि प्रपाठक या संस्थेत नेमले जात नाहीत याबद्दल नाराजी होती. परंतु केवळ नोकरी म्हणून स्वतःला ज्ञात असलेल्या संशोधन पद्धतीचा उपयोग करून केले जाणारे संशोधन हे विद्यापीठाच्या नियमात बसणारे असले तरी अनेकदा उपयोजनशून्य आणि निष्फळ असते असे

गोविंदभाईंचे म्हणणे असे. म्हणूनच दृष्टी आणि बांधिलकी असलेल्या सेवाभावी आणि मानद् संशोधकांकडून काम करवून घेण्यावर त्यांचा भर असे.

औरंगाबादच्या या स्वामी रामानंदतीर्थ संशोधन संस्थेची स्वत:ची एक वास्तू असावी अशी गोविंदभाईंच्या मनात एक तीव्र इच्छा होती. त्यासाठी केन्द्र सरकारकडून जागा मिळवण्याचे प्रयत्न त्यांनी अनेक वर्षे केले. पण त्या प्रयत्नांना यश आले नाही. या संशोधन संस्थेने शेती आणि ग्रामोद्योगाचे नवे तंत्रज्ञान खेडोपाडी पोहोचवण्याचे काम करावे असे त्यांना वाटत असे. तसेच मराठवाडा विभागाच्या विकासाच्या प्रक्रियेचा सखोल अभ्यास करून आजवर घडलेल्या विकासाचे सूक्ष्मतर विश्लेषण केले जावे असेही ते म्हणत. स्वामीजींनी नव्या, प्रगत अशा मराठवाड्याचे जे स्वप्न पाहिले होते, ते पूर्ण करण्यासाठी काम करत राहणे, हेच त्यांचे उचित स्मारक, होय अशी गोविंदभाईंची श्रद्धा होती.

# खादी-ग्रामोद्योगातील योगदान

गोविंदभाईंच्या जीवनावर राष्ट्रपिता महात्मा गांधींचा फार मोठा प्रभाव होता. तरुण वयामध्ये मार्क्सच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित झालेले गोविंदभाई स्वातंत्र्य चळवळीच्या काळात जेव्हा गुजरातमध्ये गेले तेव्हा त्यांना गांधीजींच्या विचारांची ओळख झाली. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतून हिन्दुस्तानात आल्यानंतर देशभर प्रवास करून इथल्या ग्रामीण जीवनाची ओळख करून घेतलेली होती. अज्ञान, गरिबी, आणि गुलामगिरी यांनी पिचलेल्या खेड्यातल्या माणसांत त्यांना खरा हिन्दुस्तान दिसला होता. भारतातल्या खेड्यापाड्यांमध्ये उपलब्ध साधनांमधून स्वतःच्या हस्तकौशल्याने वापरायोग्य वास्तू निर्माण करून उपजीविका करणाऱ्या भूमिहीन मजुरांमध्ये विणकर, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, धोबी, गवंडी, रंगारी अशा कैक श्रमजीवींचा समावेश होता. खेड्याच्या व्यापार आणि अर्थव्यवस्थेत त्यांचे स्थान अनिवार्य असे होते. परंतु तरीही हे सारे लोक कमालीचे उपेक्षित आणि दरिद्री होते. त्यामुळे गांधीजी त्यांना ''दरिद्रीनारायण'' असे संबोधत. या दरिद्रीनारायणाचा चरितार्थ चालावा असे वाटत असेल तर जनतेने त्याची उत्पादने वापरली पाहिजेत हे गांधीजींना पटलेले होते. त्यामुळेच त्यांनी सूत कातणे आणि खादी वापरणे या दोन गोष्टी आयुष्यभर एखाद्या व्रतासारख्या पाळल्या होत्या. गांधीजींच्या त्या कल्पनेतूनच खादी आणि ग्रामोद्योगाची चळवळ सुरू झाली. त्यांच्या ग्रामस्वराज्याच्या कल्पनेत खादी-ग्रामोद्योगाचे स्थान फार मोठे होते.

गांधीजींच्या आग्रहामुळे १९२२ साली अखिल भारतीय काँग्रेस समितीने खादीचा एक स्वतंत्र विभाग स्थापन केला. त्यानंतर एका वर्षातच अखिल भारतीय खादी बोर्डाची स्थापना झाली. त्या खादी बोर्डाने पंचवीस वर्षे खादीच्या प्रसाराचे

काम केले. त्या कामात १९२५ साली स्थापन झालेल्या अखिल भारतीय चरखा संघानेही मोठा हातभार लावला. त्यानंतर खादी बोर्डाच्या विकेंद्रीकरणाच्या निर्णयानुसार १८ एप्रिल १९५१ रोजी हैदराबादेत एक ''हैदराबाद खादी समिती'' स्थापन केली गेली. स्वामी रामानंदतीर्थ हे त्या समितीचे अध्यक्ष झाले. वासुदेव नाईक हे चिटणीस झाले. या समितीने त्या काळात परिश्रमपूर्वक मराठवाडा आणि तेलंगणात खादीच्या उत्पादन-वितरणाची केन्द्रे वाढवली. तेलंगणात सहा ठिकाणी उत्पादन केन्द्रे स्थापन झाली. मराठवाड्यात कताई आणि विणाईची कामे परंपरागत करीत आलेली कतिन-विणकरांची अनेक घराणी होती. परंतु निश्चित उत्पन्नाची शाश्वती नसल्यामुळे त्यांचे काम वाढत नव्हते. त्या सगळ्या कतिन-विणकरांना संघटित करून त्यांना पुन्हा कार्यप्रवण करण्याचे काम हैदराबाद खादी समितीने केले. खादी समितीचे एक कार्यकर्ते बाबूराव कानडे यांच्या प्रयत्नांतून लातूर तालुक्यातील औसा येथे खादी व ग्रामोद्योगाचे एक मोठे उत्पादन केन्द्र उभे राहिले. तिथे कताई, विणाई, हातकागद कारखाना, तेलघाणा, तागाच्या वस्तूंची निर्मिती, लोकरी कपड्यांची निर्मिती असे विविध उपक्रम सुरू झाले. त्यानंतर हैदराबाद राज्यात सुमारे वीस विक्री केंद्रामधून खादीची विक्री होऊ लागली. नंतर १९५७ साली हैदराबाद खादी समितीशी संलग्न अशी 'मराठवाडा खादी व ग्रामोद्योग उपसमिती' स्थापन करण्यात आली. त्या समितीचे चिटणीस गोविन्दभाई होते. औरंगाबाद येथे खादी विद्यालय सुरू करण्याचा आणि परभणी येथे खादी उत्पादन केन्द्र प्रस्थापित करण्याचे निर्णय त्यावेळी गोविंदभाईंनी घेतले. मराठवाड्यात वसमत आणि बीड येथेही खादी उत्पादन केन्द्रे स्थापन करण्यात आली. त्याशिवाय नव्याने निघालेल्या अंबर चरख्याचा प्रचार करणे आणि गावोगावी खादी भांडारे स्थापन करणे हेही निर्णय घेण्यात आले. एव्हाना पूज्य विनोबा भावे यांनी देशभरात भूदान चळवळ सुरू केली होती. १९५७ सालच्या एप्रिल महिन्यात भूदान चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी औरंगाबादमध्ये एक भूदान शिबिर घेतले. गांधीजींच्या ग्रामविकासाच्या संकल्पनेला भूदान आणि ग्रामदान या चळवळी पूरकच आहेत हे गोविंदभाईंना जाणवले. त्या शिबिरापासून गोविंदभाईंनी स्वत:ला खादी-ग्रामोद्योगासोबतच भूदान चळवळीलाही जोडून घेतले. मराठवाडा खादी व ग्रामोद्योग उपसमितीचे अध्यक्ष या नात्याने गोविंदभाईंनी खादीच्या कार्याला मोठी चालना दिली. औसा आणि वसमत येथे सूतकताईसाठी चारशे सभासद नोंदले गेले. तसेच सुमारे दोनशेपन्नास विणकरही कामाला लागले.

औसा, वसमत, लातूर, परभणी आणि औरंगाबाद येथे खादी समितीची 'परिश्रमालये' कार्यरत झाली. १९५८ सालाच्या अखेरपर्यंत मराठवाड्यात एक हजार अंबर चरखे सुरू करणे आणि खादीचे उत्पादन तीन लाख रुपयांपर्यंत वाढवणे ही उद्दिष्टे गोविंदभाईंनी नजरेसमोर ठेवली. खादीच्या चळवळीचा जनसामान्यांमध्ये प्रसार व्हावा या उद्देशाने आणखी एक अभिनव योजना गोविंदभाईंनी राबवली होती. खादी भांडारातून किमान पन्नास रुपये किंमतीची खरेदी करणाऱ्या लोकांना सदस्य करून त्यांची एक 'मराठवाडा विधायक समिती' स्थापन केली गेली. देशातील कष्टकऱ्यांच्या हाताला काम देण्यासाठी आणि पर्यायाने देशातील दारिद्र्य नष्ट करण्यासाठी जनतेने खादी व ग्रामोद्योग भांडारातून खरेदी करावी असे आवाहन ही विधायक समिती करीत असे. ५८ साली जानेवारी महिन्यात परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथे खादी कार्यकर्त्यांचे दोन दिवसांचे एक शिबिर घेण्यात आले. गोविंदभाईंनी आयोजित केलेल्या या शिबिराचे उद्‌घाटन स्वामीजींनी केले होते. त्या शिबिरात काका अत्रे आणि गंगाप्रसाद अग्रवाल यांनी मार्गदर्शन केले. खादी व ग्रामोद्योगाच्या कार्याने समाजात नवी मूल्ये बाणवून सामाजिक क्रांती घडवून आणता येईल अशी गोविंदभाईंची धारणा होती. त्यासाठी कार्यकर्त्यांनी आत्मनिर्भर होऊन स्वत:ला क्रांतीसाठी समर्पित केले पाहिजे असे ते सांगत.

१९५८ नंतर हैदराबाद चळवळीतल्या अनेक कार्यकर्त्यांनी स्वत:ला खादीच्या कार्यात जोडून घेतले. श्रीनिवासराव बोरीकर, बाबासाहेब परांजपे, भगवानराव गांजवे, बाबूराव कानडे, शामराव बोधनकर, गंगाप्रसाद अग्रवाल, अच्युतराव खोडवे, नारायणराव लोहारेकर, शामराव कदम, रघुनाथराव रांजणीकर, गुलाबचंद नागोरी, काशीनाथ कुलकर्णी हे आणि यांसारखे अनेक निष्ठावान कार्यकर्ते खादीप्रसाराच्या कामात गुंतले. दरम्यान औरंगाबाद येथे सराफा विभागात खादी व ग्रामोद्योग भांडाराची भव्य वास्तू उभी राहिली. खादी समितीचे एक कार्यकर्ते राणे यांच्या प्रयत्नांतून नांदेड येथेही एक मोठे खादी उत्पादन केन्द्र उभे राहिले. उदगीर, लातूर, कंधार आणि धर्माबाद येथे खादी समितीच्या मालकीच्या इमारती बांधल्या गेल्या. त्यांत उत्पादन-वितरण केंद्रे स्थापन झाली. काही ठिकाणी दान मिळालेल्या जागांवर तर काही गावांमध्ये भाड्याने घेतलेल्या जागांवर खादी-ग्रामोद्योग भांडारे सुरू करण्यात आली. एकूणच मराठवाडा खादी ग्रामोद्योग उपसमितीच्या स्थापनेनंतर गोविंदभाईंच्या नेतृत्वाखाली संपूर्ण मराठवाड्यात खादी

उत्पादन, विक्री आणि प्रसाराचे कार्य जोमाने होऊ लागले.

कोणत्याही वाढत्या चळवळीमध्ये असंतुष्टांचा समावेश असतोच आणि मतभेदांमुळे काही प्रमाणात चळवळीची पीछेहाटही होते. मराठवाड्यातील खादीच्या कार्याचेही तसेच झाले. १९६५ साली मतभेद टाळण्यासाठी गोविंदभाई काही काळ मराठवाडा खादी-ग्रामोद्योग उपसमितीच्या कार्यातून बाजूला झाले. त्यानंतर उपसमितीचे कार्यालय औरंगाबादहून हैदराबादला हलवले गेले. एव्हाना मराठवाडा प्रदेश हैदराबाद राज्यातून अलग होऊन महाराष्ट्रात विलीन झाला होता. मतभेदही संपावेत आणि खादीचे काम मराठवाड्यात पूर्ववत सुरू राहावे यासाठी पूर्वी हैदराबादमध्ये समाविष्ट असलेल्या मराठवाडा आणि कर्नाटकाच्या जिल्ह्यांसाठी पूर्णपणे स्वतंत्र खादी समित्या स्थापन केल्या जाव्यात अशी कल्पना स्वामी रामानंदतीर्थांनी मांडली. त्यासाठी १८ जानेवारी १९६७ रोजी त्यांनी मराठवाड्यातील कार्यकर्त्यांची एक बैठक त्यांनी घेतली. त्या बैठकीत स्वतंत्र अशी ''मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती'' स्थापन करण्यात आली. संस्थापक सदस्यांमधून अध्यक्ष म्हणून दिगंबरराव बिन्दू आणि मंत्री म्हणून भगवानराव गांजवे यांची निवड झाली. कार्यकारी समितीत अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, गोविंदभाई, शंकरराव चव्हाण, दामोदर पांगरेकर, देवीसिंग चौहान आणि नारायणराव लोहारेकर यांचा समावेश केला गेला. समितीचे मुख्यालय नांदेड येथे ठेवण्यात आले. नव्याने सगळी जुळवाजुळव करून प्रत्यक्षात १९६७ च्या मे महिन्यापासून या मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीचे कार्य सुरू झाले. ऑगस्ट १९६७ मध्ये या संस्थेचे रीतसर पंजीकरण करण्यात आले. १९६९ सालापर्यंत टप्प्याटप्प्याने मराठवाड्यातील सगळी खादी उत्पादन आणि विक्री केन्द्रे ह्या समितीच्या ताब्यात आली. याच काळात नांदेडचे धडाडीचे कार्यकर्ते नागनाथ परांजपे यांनी इन्सुलेशन कागदाच्या निर्मितीची एक प्रक्रिया शोधून काढली. त्या प्रक्रियेचे हक्क त्यांनी निष्ठेने मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीला सुपूर्द केले. तसेच त्या कागदाच्या उत्पादनातही त्यांनी मोलाचे सहकार्य केले. इन्सुलेशन कागदाच्या निर्मितीमुळे समितीला मोठी परकीय बाजारपेठ उपलब्ध झाली. समितीला देशविदेशात एक प्रतिष्ठा प्राप्त झाली. पुढे चालून नांदेडचे पद्मश्री शामराव कदम हे समितीचे अध्यक्ष आणि दामोदर पांगरेकर हे मंत्री झाले. त्यांच्या काळात समितीच्या कार्याचा मोठा विस्तार झाला. कालांतराने पांगरेकरांची नियुक्ती केन्द्र सरकारच्या खादी-ग्रामोद्योग आयोगाच्या सदस्यपदी झाली. हा एकापरीने मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीचा

गौरवच होता.

१९७२ साली जेव्हा स्वामीजींचे निधन झाले तेव्हा कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे या खादी समितीच्या कार्यात गोविंदभाईंनी जास्त लक्ष घालण्यास सुरुवात केली. बदलत्या परिस्थितीत नव्या ग्राहकांच्या आवडीनिवडीनुसार खादी समितीच्या उत्पादनांतही बदल व्हावयास हवेत असे गोविंदभाईंना जाणवले. यासाठी समितीने आता परिवर्तनाला सामोरे जाणे अगत्याचे होते. समितीच्या संरचनेत काही अनुषंगिक बदल करण्यात आले. गोविंदभाई, शंकरराव चव्हाण आणि भगवानराव गांजवे या संस्थापक सदस्यांना आजीव विश्वस्त केले गेले. स्वातंत्र्यलढ्यातील एक कार्यकर्ते नारायणराव लोहारेकर यांना समितीचे मंत्री करण्यात आले. शिवाय एक व्यवस्थापक मंडळ स्थापन करून त्यावर मराठवाड्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची आणि खादी कामगार प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आली. हळूहळू समितीच्या कार्याचा व्याप आणखी वाढीस लागला. औसा, उदगीर, नांदेड, कंधार, हिंगोली वगैरे ठिकाणी खादी भांडारांच्या इमारती बांधल्या गेल्या. नित्याच्या उत्पादनांखेरीज मसाले, अगरबत्त्या, आसनपट्ट्या, गालिचे आणि सतरंज्यांचे उत्पादनही होऊ लागले. उत्पादन आणि विक्रीकेन्द्रांतील कामगारांसाठी विविध प्रकारच्या कल्याण योजना राबवण्यात येऊ लागल्या. सतत विस्तार पावत गेलेल्या या मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीची वार्षिक विक्री आता दोन कोटी रुपयांवर गेली आहे. मराठवाड्यात तिची आठ उत्पादन केन्द्रे आणि बावीस विक्री केन्द्रे आहेत. गोविंदभाईंनी समितीला जी आर्थिक शिस्त लावून दिली आणि व्यवस्थापनात जी कार्यक्षमता आणली त्यामुळेच ही संस्था आपल्या उद्दिष्टांशी प्रामाणिक राहून भरभराटीला पोहोचू शकलेली आहे.

✿

# अस्त

स्वतःच्या व्यक्तिगत जीवनात गोविंदभाईंनी साधेपणा, कठोर निग्रह, आणि स्वच्छ चारित्र्य या मूल्यांचे पालन कसोशीने केले. *''सत्य, अहिंसा, चारित्र्य, स्वातंत्र्य, समता आणि धर्मनिरपेक्षता या आधुनिक मूल्यांच्या पुरस्काराने नवा समाज निर्माण करण्याचे काम हे स्वातंत्र्य-संग्रामापेक्षाही मोठे आहे हे आम्ही विसरतो. जातिभेद आणि धर्मभेद यांच्या जोडीला स्वार्थाची जोड असलेले अनेक लोक आपल्या सभोवताली असणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे समाजाच्या पुनर्रचनेचे काम हे अत्यंत कठिण अशा संघर्षामधूनच पुढे न्यावे लागत असते.''* असे उद्‌गार गोविन्दभाईंनी त्यांच्या एका मुलाखतीत काढले होते.

स्वातंत्र्यानंतरच्या पंचावन्न वर्षातील गोविंदभाईच्या कार्याचा पसारा सरस्वती भुवन शिक्षण संस्था, नांदेड एज्युकेशन सोसायटी, स्वामी रामानंदतीर्थ संशोधन संस्था, मराठवाडा जनता विकास परिषद, मराठवाडा खादी समिती अशा अनेक संस्थांच्या रूपात उभा दिसतो. या साऱ्या संस्था गोविंदभाईंनी लोकाश्रयावरच तगवलेल्या होत्या. प्रत्येक संस्थेसाठी त्यांनी शेकडो लोक जोडले. अथक परिश्रम करून त्या संस्था नांवारुपाला आणल्या. पण हे सारे करत असताना त्यांची भूमिका मात्र नेहेमी एका विश्वस्ताचीच राहिली. संस्थांचे हितसंबंध त्यांनी जरूर जपले. पण त्यांतल्या कोणत्याही संस्थेवर कधी मालकीहक्क सांगितला नाही. त्यांनी ज्या संस्था उभ्या केल्या अगर चालवल्या त्या लोकांच्या आणि लोकांसाठी असलेल्या होत्या. त्या संस्था वेगवेगळ्या उद्दिष्टांसाठी चालवल्या जात असल्या तरी त्या सर्वांना आधुनिक लोकशाही मूल्यांचा आणि समतावादी दृष्टीचा आधार होता. त्या संस्थांमार्फत शिक्षण आणि विकास यांच्या जोडीने जो एक महत्त्वाचा वारसा

गोविंदभाईंनी तरुण पिढीला दिला तो विचारांचा वारसा होय. शिक्षण, समाजकारण, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सार्वजनिक नीतिमूल्ये, वैयक्तिक आचरणमूल्ये इत्यादींबद्दल त्यांच्या धारणा अगदी पक्क्या होत्या. आपल्या देशात लोकशाही ही फक्त निवडणुकांपुरतीच शिल्लक राहिलेली आहे हे खास मध्यमवर्गीय मत त्यांना मान्य नसे. ते म्हणत की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशाच्या नेत्यांसमोर फाळणी, जातीय दंगे, संस्थाने खालसा करण्याचे प्रश्न, संस्थांनांमधील प्रजेला देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम, अशा अनेक महत्त्वाच्या समस्या होत्या. त्यामुळे लोकशाही मूल्ये जनमानसात रुजवण्याचे प्रयत्न टोकदारपणे होऊ शकले नाहीत. आपण अंगिकारलेल्या प्रौढ मतदान पद्धतीमध्ये फक्त लोकशाही मूल्यांवर श्रद्धा असणाऱ्यांनाच मतदानाचा अधिकार मिळेल असे नाही. त्यामुळे जनमानसात परंपरेने रुजलेल्या इष्ट-अनिष्ट गोष्टी आणि नेत्यांच्या व्यक्तिगत महत्वाकांक्षा यांची छाया मतदान प्रक्रियेवर पडणे अत्यंत साहजिक होते. तीत तात्कालिक लाभांसाठी हितसंबंधांचे राजकारण करणारे प्रवाह दुर्दैवाने जास्त क्रियाशील झाले आणि प्रभावी बनले. परंतु ह्या लोकशाहीविरोधी प्रवृत्ती काही नव्याने निर्माण झालेल्या नाहीत असे ते सांगत. पूर्वापार चालत आलेल्या जातिभेद, वंशभेद, आर्थिक विषमता, सामंतशाही या आपल्या प्रथांचे प्रतिबिंब जर आपल्या निवडणूक प्रक्रियेत उमटले तर त्यात आश्चर्य नाही, असे ते म्हणत. समाजातील हे सारे दोष स्वातंत्र्यानंतर अवघ्या चाळीस-पन्नास वर्षांच्या कालखंडात दूर होणे अवघड आहे. त्यासाठी समाजातल्या लोकशाहीवादी शक्तींनी संघटितपणे नवी मूल्ये रुजवण्याचे काम सातत्याने केले पाहिजे असे ते आग्रहाने सांगत.

गोविंदभाईंच्या चेहेऱ्यावरून, अगर त्यांच्या बोलण्यातील आक्रमक आविर्भावांवरून हा माणूस अत्यंत कर्मठ, निष्ठुर, रुक्ष आणि एककल्ली असला पाहिजे असे तिऱ्हाइतांना वाटे. त्यामुळे अनेक लोक त्यांच्याशी बोलायला घाबरत असत. पण वास्तवात ते खूप सहृदय होते. आणि परिवर्तनशील अशा स्वभावाचे होते. एखाद्या मुद्यावर प्रचंड वाद घालूनही नंतर समोरच्या माणसाच्या बोलण्यात तथ्य आढळले तर ते स्वत:ची मते बदलत असत. अनेकदा स्वत:च विनोद करून ते मनमुरादपणे हसत. काही निवांत अशा विरळ्या क्षणीं विद्यार्थीजीवनातील स्वत:च्या फजितीचे प्रसंग ते चांगले रंगवून सांगत. मद्रास शहरात शिकत असताना त्या काळच्या महाग चायनीज् हॉटेलमध्ये जाण्याचे धाडस एका चिनी भाताला तब्बल सहा आणे मोजावे लागल्याने कसे त्यांच्या अंगलट आले होते ही हकीगत

ते स्वत: रंगवून सांगत. स्वत:ची फजिती स्वत:च सांगून मोकळेपणाने हसणे हे गुणी माणसाच्या मोठेपणाचेच एक लक्षण असते. ते गोविन्दभाईमध्ये दिसे.

आयुष्याच्या शेवटच्या कालखंडात गोविंदभाईंची तब्येत त्यांना मनासारखी साथ देईनाशी झाली होती. तरी वयाची एक्क्याणव वर्षे पूर्ण झाल्यानंतरही पूर्वीसारखेच पायांना भिंगरी लागल्यासारखे ते गावोगाव फिरत. त्यांचे मन आणि बुद्धी या गोष्टी पूर्वी इतक्याच तल्लख आणि कार्यक्षम होत्या. परिवर्तनाबाबतचा त्यांचा आशावाद हा खरोखरच दुर्दम्य असा होता. परंतु शरीर थकले होते. अविश्रांत श्रम, प्रवासात कुठल्याही जागी मिळेल ते खाऊन पुढे जात राहण्याची वृत्ती, सततचा अभ्यास आणि काम करत राहण्याचा ध्यास. या त्यांच्या जीवनपद्धतींशी जुळवून घेतांना त्यांच्या सोबत असणाऱ्या अगदी तरुण कार्यकर्त्यांचीही दमछाक होत असे. वयपरत्वे आलेल्या शारीरिक अशक्ततेची आणि व्याधींची तमा न बाळगता ते सतत कार्यरत असत. कामाच्या व्यापामुळे केवळ इच्छाशक्तीच्या बळावर स्वत:च्या शरीरावर अन्याय करण्याच्या त्यांच्या वृत्तीबद्दल कोणी त्यांना सबुरीचा सल्ला देऊ लागले तर ते म्हणत, की बिछान्यात पडून मरण्याने काही वेगळे सुख मिळते कां? त्यापेक्षा काम करतांनाच मरण आले तर जास्त चांगले आहे! असे हे मराठवाड्याचे गोविंदभाई २१ नोव्हेंबर २००२ रोजी काम करत असतानाच गेले आणि मराठवाड्याच्या इतिहासातले एक मोठे पर्व संपले. जी लढाई लढण्यात त्यांनी आपले सारे जीवन घालवले त्या लढाईची हार-जीत अद्याप दृष्टिक्षेपातही नसतांना हा शेवटचा शिलेदार धारातीर्थी पडला.

✿

## संदर्भ सूची

१. मागे वळून पाहतांना - हनुमंतराव वैष्णव, रामराज्य प्रकाशन, औरंगाबाद, १९८२.
२. हैद्राबाद : विमोचन आणि विसर्जन - नरहर कुरुंदकर, म.सा.प. हैदराबाद, १९८५.
३. हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा - अनंत भालेराव, स्वा. रा. तीर्थ संशोधनसंस्था, औरंगाबाद, १९८७.
४. गोविन्दभाई श्रॉफ गौरव ग्रंथ - संपा. दिनकर बोरीकर, गौरव ग्रंथसमिती, औरंगाबाद, १९९२.
५. निर्मोही - शिवाजीराव गऊळकर, निर्मल प्रकाशन, नांदेड, १९९८.
६. मुक्तिसंग्राम - संपा. लक्ष्मीकांत देशमुख, वि. ल. धारूरकर, मराठवाडा मुक्तिदिन सुवर्णमहोत्सव समिती, औरंगाबाद, १९९८.
७. 'मराठवाडा' स्वातंत्र्य सुवर्णमहोत्सव विशेषांक - संपा. अरविंद वैद्य, भारत मुद्रक आणि प्रकाशक लि. औरंगाबाद, १९९८.
८. Siver Jubilee Souvenir - Edi. Vijay Diwan, S.B.E.S. College of Science, Aurangabad, 1998.
९. Contribution of Shri. Govindbhai Shroff to the Hyderabad Freedom Struggle from 1938 to 1948.
-Dr. Shobha Koranne, Ph.D. Thesis submitted to Dr. B.A.M. University, Aurangabad, 2003.
१०. Essence of Freedom - Edi. Dr. Shivajirao Gaulkar, Govindbhai Shroff Pratishthan, 2003.

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## महाराष्ट्राचे शिल्पकार योजनअंतर्गत चरित्रग्रंथ
## मालिकेतील चरित्रग्रंथ

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एस. एम. जोशी | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ४०/- |
| २) | साने गुरुजी | श्री. राजा मंगळवेढेकर | रु. ४०/- |
| ३) | दादा धर्माधिकारी | श्रीमती तारा धर्माधिकारी | रु. ४०/- |
| ४) | क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. भारत पाटणकर | रु. ४०/- |
| ५) | डॉ. विठ्ठलराव विखेपाटील | श्री. शिवाजी सावंत | रु. ३५/- |
| ६) | शंकरराव किर्लोस्कर | श्रीमती शांता किर्लोस्कर | रु. ४०/- |
| ७) | मामासाहेब जगदाळे | श्री. व. न. इंगळे | रु. ४५/- |
| ८) | तंट्या भिल्ल | श्री. बाबा भांड | रु. ४५/- |
| ९) | यशवंतराव चव्हाण | श्री. विठ्ठलराव पाटील | रु. ४०/- |
| १०) | दादासाहेब फाळके | श्री. बापू वाटवे | रु. ३५/- |
| ११) | ताराबाई शिंदे | श्री. इंद्रजित भालेराव | रु. २५/- |
| १२) | तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | सौ. विजया जहागीरदार | रु. ४५/- |
| १३) | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | डॉ. अरुंधती खंडकर | रु. ४०/- |
| १४) | स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. सुधाकर देशपांडे | रु. ४०/- |
| १५) | बॅ. राजाभाऊ खोब्रागडे | श्री. व्ही. डी. मेश्राम | रु. ३५/- |
| १६) | स्वामी रामानंद तीर्थ | श्री. प्रकाश मेदककर | रु. ४५/- |
| १७) | पठ्ठे बापूराव | श्री. चंद्रकुमार नलगे | रु. ४५/- |
| १८) | भाई उद्धवराव पाटील | श्री. व. न. इंगळे | रु. ५५/- |
| १९) | धोंडो केशव कर्वे | डॉ. न. म. जोशी | रु. ४०/- |
| २०) | लोकहितवादी | डॉ. निर्मलकुमार फडकुले | रु. ४०/- |
| २१) | यदुनाथ थत्ते | डॉ. मु. ब. शहा | रु. ४०/- |

***मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे***

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

***अधिक माहिती/चौकशीसाठी***

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व),
मुंबई-४०० ०१४
दूरध्वनी - २४१४४०२१, २४१४६००५

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १) महाराष्ट्राचा इतिहास प्रागैतिहासिक महाराष्ट्र (खंड पहिला भाग-१) | शां. भा. देव | रु. १२७/- |
| २) महाराष्ट्राचा इतिहास (मध्ययुगीन कालखंड भाग-१) | संपादक गो. त्र्यं. कुलकर्णी | रु. १४५/- |
| ३) मध्ययुगीन महाराष्ट्र (सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन) | प्रा. म. श्री. माटे | रु. ७५/- |
| ४) समाजशास्त्रीय विचारातील प्रमुख प्रवाह (भाग पहिला) | अनुवादक हेमकांत बळकुंदी | रु. २९५/- |
| ५) पं. जवाहरलाल नेहरू व्यक्ती आणि कार्य | संपादक बा. ह. कल्याणकर | रु. १४०/- |
| ६) भारताचा स्वातंत्र्यलढा | डॉ. वा. ना. कुबेर | रु. १०९/- |
| ७) मराठी वाङ्मयकोश खंड-४ | समन्वय संपादक डॉ. विजया राजाध्यक्ष | रु. ३२०/- |
| ८) दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तृत्व | संपादक मंडळ | रु. ६०/- |
| ९) भारतातील आदिवासी वंश | प्रा. वि. श्री. कुलकर्णी | रु. १२५/- |
| १०) खानदेशातील कृषक जीवन | डॉ. रमेश सूर्यवंशी | रु. ६०/- |
| ११) लैंगिक नीती आणि समाज | श्रीमती शकुंतला क्षीरसागर | रु. १४५/- |
| १२) मराठी वाङ्मयकोश खंड २, भाग - १ | डॉ. गो. म. कुलकर्णी | रु. १३०/- |

*मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे*

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

*अधिक माहिती/चौकशीसाठी*

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व),
मुंबई-४०० ०१४
दूरध्वनी - २४१४४०२१, २४१४६००५



विजय दिवाण

या पुस्तकाचे लेखक विजय दिवाण हे गेल्या तीन तपांपासून औरंगाबादच्या सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालयात प्राणीशास्त्राचे अध्यापन करीत आहेत. शिवाय त्यांच्या विद्यार्थीदशेपासून आजपर्यंत ते राष्ट्र सेवादल, युवक क्रांती दल, सोशलिस्ट पार्टी, नर्मदा बचाओ आंदोलन, जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय अशा समतावादी आणि सामाजिक न्यायाच्या चळवळींमध्ये सहभागी होत आलेले आहेत. औरंगाबाद येथे पर्यावरणाच्या क्षेत्रात गेली पंधरा वर्षे काम करणाऱ्या निसर्ग मित्रमंडळाचे ते अध्यक्ष आहेत. तसेच जायकवाडी प्रकल्पाच्या विस्थापितांनी स्थापन केलेल्या जायकवाडी प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे ते संघटक आहेत. मराठवाड्याचे लोकनेते पद्मविभूषण श्री. गोविंदभाई श्रॉफ यांच्या विचारांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या न्यासाचे ते एक संस्थापक सदस्य आणि कार्यवाह आहेत. गोविंदभाई श्रॉफ यांचा निकटचा सहवास तीस वर्षे त्यांना लाभला होता. गोविंदभाईंच्या मार्गदर्शनाखाली सरस्वती भुवन शिक्षणसंस्था, स्वामी रामानंदतीर्थ संशोधन संस्था, मराठवाडा जनता विकास परिषद ह्या संस्थांच्या कार्यातही त्यांचा सहभाग होता. निसर्ग संवर्धन, पर्यावरण संरक्षण, पाणीविकास, उच्चशिक्षण, समन्यायी विकास या विषयांवर त्यांनी अनेक वर्षे सखोल अभ्यास आणि विपुल लेखन केलेले आहे. पाणी, जमीन, जंगल ह्या संसाधनांच्या टिकाऊ विकासाबद्दल अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सभा-संमेलने-चर्चासत्रे यांमधून त्यांनी शोधनिबंध सादर करून व्याख्याने दिली आहेत. शिवाय ते एक कुशल रंगकर्मी आहेत. हौशी रंगभूमीवर सुमारे वीस नाटकांमध्ये त्यांनी अभिनय व दिग्दर्शनाचे पुरस्कार मिळवले आहेत. दूरचित्रवाणीवरील ''इतिहास के गवाह'' आणि ''कमला'' (पिंपळपान) या मालिकांमध्ये आणि 'भेट' या चित्रपटामध्ये त्यांनी भूमिकाही केलेल्या आहेत. ''...जलचक्रहि रुतले'', ''पाश्चिमालाप'' आणि इंग्रजीतील ``Jaikwadi - the dam that failed" ही त्यांची तीन पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.